आरंभ २०२६

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा

धाराशिव | गुरुवार, १ जानेवारी २०२६ | वर्ष ३ रे अंक ३०२ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com




सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## विचारपुष्प



भारतीय जीवन पद्धती माणसांमाणसांमध्ये फरक करत नाही अन्यथा चराचरात आत्मतत्त्वाचा अनुभव करण्याची शक्यताच राहिली नसती. ही पद्धती प्रत्येक नागरिकाला माणूस म्हणूनच वागवते. कोणाकडूनही त्याच्या उपासना पद्धती, भाषा, क्षेत्रीयता, जातीयता, गरीब-श्रीमंत असा भेदभाव होत असेल तर ते अमानवीयपणाचे लक्षण मानते.


**- भारतरत्न नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

# पंच परिवर्तनाने होईल राष्ट्र उन्नतीचा मार्ग प्रशस्त

### सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन

◆ **रायपूर, ३१ डिसेंबर**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने शताब्दी वर्षानिमित्त सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण रक्षण, स्व-विकास आणि नागरी कर्तव्य ही पंचसूत्री आचरणात आणण्याचे आवाहन केले आहे. हे पंच परिवर्तन स्वीकारल्याने आपण राष्ट्र आणि समाजाच्या उन्नतीत सहभागी होऊ शकतो. यातूनच आपल्या देशाच्या सर्वोच्च प्रगतीचा मार्ग प्रशस्त होईल, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.



रा. स्व. संघाच्या शताब्दीनिमित्त छत्तीसगडच्या रायपूर अंतर्गत अभनपूरच्या सोनपैरी येथील असंग देव कबीर आश्रमात विशाल हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री असंग देव आणि गायत्री परिवाराच्या समाजसेवी ऊर्मिला नेताम यांची प्रमुख उपस्थिती होती. संमेलनाला संबोधित करताना सरसंघचालक म्हणाले, संघ स्थापनेची शंभर वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त देशभरात हिंदू संमेलनांचे आयोजन होत आहेत. संघ स्थापनेचे शताब्दी वर्ष उत्सव नव्हे तर राष्ट्र आणि समाजकार्याला गती देण्याचा क्षण आहे. या निमित्ताने स्वयंसेवक पंच परिवर्तनाचा विषय घेऊन समाजात जात आहेत. आम्ही केवळ संकटाविषयी बोलत नाही तर उपाययोजनांचीही चर्चा करतो. कारण शेवटी आपण मजबूत राहू तेव्हाच संकटांचा आपल्यावर प्रतिकूल परिणाम होणार नाही.

**सरसंघचालकांनी सांगितला प्रेरक प्रसंग**

यावेळी सरसंघचालकांनी एक प्रेरक प्रसंग सांगितला. ते म्हणाले, एक ससा झोपला होता, अचानक एक झाडाचे पान पडले तर तो घाबरला. त्याने देवाला म्हटले की, देवा, तू मला इतके लहान का बनवले, हत्तीसारखे बनवायला हवे होते. त्यावर देवाने त्याला 'तथास्तु' म्हटले. नंतर तो तलावात आंघोळीसाठी गेला, तेव्हा बेडकांनी म्हटले, तेथे मगर असल्याने जाऊ नको. त्यावर ससा म्हणाला, देवा, मला मगरीसारखी जाड कातडी दिली असती तर बरे झाले असते. देवाने पुन्हा 'तथास्तु' म्हटले. एक दिवस तो जंगलात फिरत असताना प्राणी ओरडायला लागले की, पळा, पळा जंगली म्हशींचा कळप येतो आहे, कोणतीही जाड कातडी कामी येणार नाही. यावर पुन्हा एकदा सशाने देवाचे स्मरण केले. तेव्हा देवाने म्हटले, तू वेगवेगळ्या रूपात शक्ती मागण्यापेक्षा भीती संपण्याचेच वरदान मागायला हवे होते. आपल्यालाही भय समाप्त होईल इतके सक्षम व्हायचे आहे, असा संदेश सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी आपल्या उद्बोधनातून दिला. (वृत्तसंस्था)

## 'अस्थिर परिस्थितीतही अर्थव्यवस्थेत होईल वाढ'

◆ **नवी दिल्ली, ३१ डिसेंबर**

अस्थिर आणि प्रतिकूल बाह्य परिस्थिती असूनही, मजबूत देशांतर्गत उपभोग आणि गुंतवणुकीमुळे भारतीय अर्थव्यवस्था उच्च वाढ नोंदवेल,असा अंदाज असल्याचे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी बुधवारी सांगितले.

आर्थिक स्थैर्य कायम ठेवणे आणि वित्तीय प्रणालीला बळकट करणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे, असे मल्होत्रा यांनी रिझर्व्ह बँकेच्या वित्तीय स्थैर्य अहवालाच्या ताज्या आवृत्तीतील प्रस्तावनेत म्हटले आहे. वित्तीय स्थैर्य हे अंतिम ध्येय नाही आणि नावीन्यपूर्णतेला व वाढीला चालना देणे, ग्राहकांचे संरक्षण करणे तसेच वित्तीय प्रणालीची कार्यक्षमता सुधारणारी नियमन आणि पर्यवेक्षणाची एक व्यवहार्य पद्धत अवलंबणे हे तितकेच महत्त्वाचे असल्याची जाणीव वित्तीय क्षेत्रातील नियामकांना असल्याचे मल्होत्रा यांनी सांगितले.

धोरणकर्ता जे सर्वांत महत्त्वाचे योगदान देऊ शकतात. ते म्हणजे एक अशी आर्थिक प्रणाली विकसित करणे आवश्यक आहे. (वृत्तसंस्था)

# भारतातही अवैध किडनी प्रत्यारोपण!

### तामिळनाडूतील स्टार किम्स हॉस्पिटलशी संबंध



पत्रपरिषदेत माहिती देताना मुमक्का सुदर्शन. सोबत ईश्वर कातकडे

### आरोपींच्या अटकेचे प्रयत्न सुरू

◆ **चंद्रपूर, ३१ डिसेंबर**

अवैधरीत्या किडनी प्रत्यार्पण प्रक्रिया करणाऱ्या भारतातील दोन डॉक्टरांची ओळख स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूरच्या पथकाला पटली आहे. रोशन कुळे यांच्या किडनी विक्री प्रकरणाच्या तपासातून कंबोडियानंतर आता भारतातही किडनी रॅकेट सक्रिय असल्याचे उघड झाले असून, त्यात तामिळनाडू राज्यातील त्रिचीच्या स्टार किम्स हॉस्पिटलचे संचालक डॉ. राजरत्नम गोविंदस्वामी, तर दिल्ली येथील डॉ. रवींद्रपाल सिंग यांचा समावेश आहे. या दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनी बुधवार, ३१ डिसेंबर रोजी आयोजित पत्रपरिषदेत दिली.

किडनी प्रकरणातील मुख्य आरोपी रामकृष्ण सुंचु उर्फ डॉ. क्रिष्णा व हिमांशु भारद्वाज यांना अटक करण्यात आली होती. पोलिस कोठडीत त्यांची चौकशी केली असता या किडनी प्रत्यार्पण रॅकेटचा संबंध भारताशी जुळला असल्याचे समोर आले आहे. रोशन कुळे व त्यांच्या इतर साथीदारांना कंबोडिया येथे घेऊन जाणारा (पान ५ वर)


### किडनीसाठी घेतले ८० लाख, विकणाऱ्याची केवळ पाच लाखांवर बोळवण!

**तामिळनाडू राज्यातील त्रिचीच्या स्टार किम्स हॉस्पिटल झालेल्या अवैध किडनी प्रत्यारोपन प्रक्रियेत किडनी घेणाऱ्या व्यक्तीकडून ५० लाख ते ८० लाख रुपयांपर्यंत रक्कम घेतली जात होती. त्यातील १० लाख रुपये आरोपी डॉ. रवींद्रपाल सिंग याला व २० लाख रुपये डॉ. राजरत्नम गोंविदस्वामी याला सर्जरी व हॉस्पिटल उपलब्ध करून देण्यासाठी दिले जात होते. दलाल आरोपी रामकृष्ण सुंचू यास व इतर लोकांना २० लाख रुपये मिळत होते. मात्र, किडनी विकणाऱ्या व्यक्तीस केवळ ५ ते ८ लाख रुपये देण्यात येत असल्याची माहिती पोलिस तपासात उघड झाली आहे.**

## महत्त्वाचे

### वर्षाअखेरीस बाजारात गुंतवणूकदारांची चांदी

**मुंबई** : भारतीय शेअर बाजाराने २०२५ या वर्षाचा निरोप अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात घेतला. वर्षाच्या शेवटच्या व्यवहाराच्या दिवशी गुंतवणूकदारांनी चौफेर खरेदी केल्याने निर्देशांक आणि निफ्टीने दमदार तेजी नोंदवली. मुंबई बाजारातील निर्देशांक ५४५ अंकांनी वाढून ८५,२२० वर बंद झाला तर निफ्टी १९० अंकांच्या वाढीसह २६,१२९ वर स्थिरावला. या तेजीमुळे गुंतवणूकदारांच्या मालमत्तेत एकाच दिवसात सुमारे चार लाख कोटी रुपयांची भर पडली आहे. बाजारातील तेजीमागे कच्च्या तेलातील घसरण आणि केंद्र सरकारने स्टील आयातीवर सेफगार्ड ड्यूटी लावल्याची बातमी हे दोन घटक प्रामुख्याने कार्यरत होते.



### अभिनेते मोहनलाल यांचा मातृशोक

**चेन्नई** : प्रसिद्ध मल्याळम अभिनेते मोहनलाल यांच्या मातोश्री आणि प्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेत्री संथाकुमारी यांचे कोची येथील एलामक्कारा येथे निधन झाले. त्या ९० वर्षांच्या होत्या. गेल्या काही काळापासून त्या आजारी होत्या. मोहनलाल आईच्या आजारपणात त्यांची काळजी घेत होते. व्यस्त वेळापत्रक असूनही त्यांनी आईसाठी वेळ काढण्याला प्राधान्य दिले. मोहनलाल यांचे वडील विश्वनाथन नायर यांचे २००५ मध्ये निधन झाले, तसेच मोठे बंधू प्यारीलाल यांचेही निधन झाले. त्यानंतर आता मोहनलाल यांच्यावर हा मोठा कौटुंबिक आघात आहे. संथाकुमारी यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करत दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील मान्यवरांनी मोहनलाल आणि कुटुंबीयांचे सांत्वन केले आहे.

### जर्मनीच्या बँकेतून २९० कोटींची चोरी

**बर्लिन** : जर्मनीतील गेल्सेंकिर्चेन शहरात असलेल्या स्पार्कस बँकेत २९० कोटी रुपयांची चोरी झाली. चोरांनी बँकेच्या पार्किंग गॅरेजच्या भिंतीला मोठे भगदाड पाडले आणि थेट तिजोरीपर्यंत पोहोचले. त्यानंतर त्यांनी ३,२५० हून अधिक सेफ डिपॉझिट लॉकर तोडले आणि त्यातील रोकड व मौल्यवान दागिने घेऊन पळ काढला. पोलिसांनुसार, चोरांनी ही चोरी ख्रिसमसच्या सुट्ट्यांमध्ये केली, जेव्हा बहुतेक दुकाने आणि कार्यालये बंद होती. असे मानले जात आहे की, गुन्हेगारांनी हा काळ जाणूनबुजून निवडला जेणेकरून कोणालाही संशय येऊ नये आणि परिसरात लोकांची वर्दळही कमी असावी.

### येमेनमधून आपले सैनिक परत बोलावणार यूएई

**अबू धाबी** : संयुक्त अरब अमिराती (यूएई) ने येमेनमधून आपले सैन्य मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. यूएईने म्हटले आहे की ते येमेनमध्ये सुरू असलेले आपले दहशतवादविरोधी अभियान संपवत आहे. हा निर्णय अशा वेळी आला आहे जेव्हा सौदी अरेबियाने यूएईवर येमेनमधील फुटीरतावादी गट एसटीसीला पाठिंबा दिल्याचा आरोप केला आहे. यापूर्वी, येमेनच्या आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त सरकारने यूएईला सांगितले होते की त्यांनी २४ तासांच्या आत आपले सैन्य येमेनमधून काढून घ्यावे. या मागणीला सौदी अरेबियाचाही पाठिंबा होता. यानंतर काही वेळातच यूएईने आपले सैन्य मागे घेण्याची घोषणा केली.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८५,२२०.६० (+५४५.५२) |
| निफ्टी | २६,१२९.६० (+१९०.७५) |

# निकालापूर्वीच भाजपाचे खाते उघडले

### राज्यात सहा उमेदवार बिनविरोध बनले नगरसेवक

मनपा निवडणूक रणधुमाळी

◆ **मुंबई, ३१ डिसेंबर**

राज्यातील महापालिका निवडणुका सर्वपक्षीय राड्यांमुळे गाजत असतानाच तीन महापालिकांमध्ये निवडणुकीपूर्वीच भाजपाचा विजय झाला आहे. सर्व छाननी प्रक्रिया पार पडल्यानंतर भाजपाचे सहा उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत. कल्याण-डोंबिवली, पनवेल आणि धुळे या महापालिकांमध्ये कमळ फुलले.

राज्यभरातील २९ महापालिका निवडणुकांमध्ये सध्या जागा कमी अन् इच्छुक जास्त अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. उमेदवारी न मिळाल्याने अनेक ठिकाणी कार्यकर्त्यांचा संताप दिसून येत आहे. अशा परिस्थितीत भाजपाचे उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत.

कल्याण-डोंबिवली महापालिकेत भाजपाच्या दोन उमेदवार विजयी झाले. भाजपाच्या रेखा चौधरी आणि आसावरी नवरे, अशी बिनविरोध विजयी झालेल्यांची नावे आहेत. आसावरी नवरे या पहिल्यांदाच नगरसेवक बनल्या आहेत, तर रेखा चौधरी दुसऱ्यांदा निवडून आल्या आहेत. भाजपाच्या रंजना पेणकर यादेखील विजयी झाल्या. अर्ज छाननीत इतर अर्ज बाद झाल्याने पेणकर यांच्या विजयावर शिक्कामोर्तब झाले. कल्याण डोंबिवली महापालिकेत भाजपाने महायुतीच्या विजयाचा शुभारंभ केला, अशी प्रतिक्रिया भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोघींचेही अभिनंदन केले. (वृत्तसंस्था)

### पनवेलमध्ये आघाडीचा उमेदवार बाद

पनवेलमध्ये निकालापूर्वीच महाविकास आघाडीला फटका बसला आणि भाजपाने विजयी सुरुवात केली. पनवेलमधून नितीन पाटील बिनविरोध विजयी झाले. शेकाप-महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा अर्ज छाननीत बाद झाला. धुळे महापालिकेत भाजपाच्या उज्ज्वला रणजित भोसले या विजयी झाल्या आहेत. अर्ज छाननीत केवळ त्यांचा अर्ज शिल्लक राहिला. त्यांच्यासोबतच ज्योत्स्ना पाटील याही विजयी झाल्या.

# 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये रामाच्या आदर्शानुसार कृती : राजनाथ

◆ **अयोध्या, ३१ डिसेंबर**

राममंदिर चळवळ भविष्याचा पाया रचणारी एक भव्य गाथा होती. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भगवान रामाच्या आदर्शांनुसारच कृती केली, असे प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी बुधवारी केले.

राममंदिर परिसरातील अन्नपूर्णा मंदिरात ध्वजारोहण झाल्यानंतर राजनाथसिंह एका सभेला संबोधित करीत होते. रामललाच्या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या दुसऱ्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित प्रार्थनेतही ते सहभागी झाले. विदेशी आक्रमकांनी सनातन परंपरा नष्ट करण्याचा वारंवार प्रयत्न करूनही, राममंदिरावर फडकत असलेला भगवा ध्वज हा सांस्कृतिक सातत्याचा संदेश देत आहे. भारताने भगवान रामाच्या आदर्शांनुसार कृती केली आहे, असे सिंह यांनी 'ऑपरेशन सिंदूर'चा संदर्भ देताना सांगितले.

राम नम्र आहे. राम दयाळू आहे. पण, गरज पडते तिथे राम दुष्टांचा पराभव करण्याची भूमिका घेतात, असे त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# सदानंद दाते महाराष्ट्राचे नवे पोलिस महासंचालक

**मुंबई, ३१ डिसेंबर**

मृदुभाषी पण अत्यंत कर्तव्यकठोर तसेच २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात निधड्या छातीने दहशतवाद्यांना सामोरे जाऊन शौर्यपदक मिळवणारे सदानंद वसंत दाते यांची बुधवारी राज्याच्या पोलिस महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली.

१९९० मधील तुकडीचे आयपीएस अधिकारी सदानंद दाते रश्मी शुक्ला यांची जागा घेतील. त्या ३ जानेवारी रोजी सेवानिवृत्त होणार आहेत. दोन लाखांपेक्षा जास्त सदस्यसंख्या असलेल्या महाराष्ट्र पोलिस दलाचे ते दोन वर्षांपेक्षा जास्त काळ नेतृत्व करतील. दाते यांची पोलिस महासंचालकपदी नियुक्ती ही त्यांच्या केंद्रीय प्रतिनियुक्तीवरून अलिकडेच मुदतपूर्व परत पाठवल्यानंतर झाली आहे. केंद्रीय प्रतिनियुक्तीत त्यांनी राष्ट्रीय तपास संस्थेचे प्रमुखपद भूषविले.

**आर्थिक गुन्हेगारीत डॉक्टरेट**

पुणे विद्यापीठातून आर्थिक गुन्हेगारीमध्ये



डॉक्टरेट मिळवलेले दाते, राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत असताना, कायदा आणि सुव्यवस्थेच्या यंत्रणेसाठी अत्यंत महत्त्वाच्या वेळी पदभार स्वीकारत आहेत.

# नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच आंदोलन पेटले

**सोलापूर/बार्शी, दि. ३१ऑक्टोबर,**

शेतकरी संघटनेच्या नवीन वर्षाची सुरुवात आंदोलनाने झाली असून ज्या ज्या साखर कारखान्यांनी उसाची पहिली उचल ३000च्या पुढे जाहीर केलेली नाही, अशा साखर कारखान्यावर शेतकरी संघटनेची राज्यभर आंदोलने सुरू असून आज बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांच्या बार्शीतील येडेश्वरी साखर कारखान्यावर शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शंकर गायकवाड यांचे नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी गव्हाणीत उड्या टाकून कारखाना बंद पाडण्यात आला.

खासदाराचा बार्शीतील येडेश्वरी शुगर पाडला बंद



त्यावेळी समाधान शिंदे, रणजीत शिंदे, अशोक कारकर, ज्ञानेश्वर शिंदे, संतोष किरडे, विजय शिंदे, आकाश नवले, हनुमंत शिंदे, नागेश शिंदे, श्रीधर शिंदे, प्रफुल्ल खैरे, नितीन शिंदे, विजय डमरे, संतोष शिंदे, दत्तात्रय शिंदे, नारायण तनपुरे, बाबा सांगडे, अनिल शिंदे, विष्णु शिंदे, गणेश नवले, अश्रूबा मोरे, शहाजी अडसूळ, सत्यवान शिंदे, श्रीहरी शिंदे, सिताराम लोंढे आदींसह पंचक्रोशीतील बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते. शेवटी रात्री उशिरा उर्वरित रक्कम देणे संदर्भात ९ जानेवारी ते १२ जानेवारीच्या दरम्यान सोनवणे यांचे सोबत बैठक घेण्याचे आश्वासन दिल्यानंतरच हे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.

यावेळी शंकर गायकवाड म्हणाले की, ठरल्याप्रमाणे १२ जानेवारीच्या आत उर्वरित दोनशे रुपये व अंतिम दर ३५०० चे आश्वासन न दिल्यास, १२ जानेवारी नंतर कुठलेही निवेदन न देता पुन्हा कारखाना बंद करणार असल्याचा इशारा यावेळी गायकवाड यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिला. पांगरी पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.



**चांगल्या, वाईट आणि विस्मयचकित घटनांनी भरलेले २०२५ हे वर्ष काळाच्या पोटात गुडूप झाले अन् उदय झाला तो २०२६ या नूतन वर्षाचा. नवीन वर्षाचा पहिला सूर्योदय पॅसिफिक महासागरातील किरीबाती देशात झाला. त्यानंतर न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियात सूर्याची किरणे पडली. गुरुवारी पहाटे बरोबर बाराचा ठोका पडताच सिडनी येथील जगप्रसिद्ध हार्बर पुलावर आतषबाजी करण्यात आली.**

# २६ माजी नगरसेवकांना भाजपाने दिली उमेदवारी

- यन्नम, वानकर, जाधव, कोल्हे, मानेंचा समावेश
- जुने, नवे आणि प्रवेशितांचा घातला मेळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ऑक्टोबर,**

सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाच्या १०२ उमेदवारांची यादी पक्षाच्या शहर अध्यक्ष रोहिणी तडवळकर यांनी जाहीर केली असून यामध्ये माजी महापौर श्रीकांचना यन्नम,माजी सभागृह नेते शिवानंद पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून आलेले माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, माजी गटनेते किसन जाधव, शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख गणेश वानकर यांच्यासह २७ माजी नगरसेवकांना संधी देण्यात आली आहे.

माजी आमदार दिलीप माने यांचे बंधु माजी नगरसेवक जयकुमार माने, नागेश ताकमोगे यांनाही भाजपाने संधी दिली आहे. भारतीय जनता पक्षाने ही निवडणूक स्वबळावर



लढण्याचा निर्णय घेतल्यानंतर २६ प्रभागातील १०२ जागांवर आपले उमेदवार उभे केले. निवडणुकीच्या तोंडावर अन्य राजकीय पक्षातील माजी नगरसेवकांना भाजपात घेण्यात आल्याने उमेदवारी यादीबाबत उत्सुकता होती. काल मंगळवारी उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस होता. परंतु काही जागांबाबत एकमत होत नसल्यामुळे काल उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली नव्हती. इतकेच नव्हे तर एबी फॉर्मबाबतही पक्षाने गुप्तता पाळली. कोणत्या माजी नगरसेवकांचा पत्ता कट करण्यात आला आणि इतर पक्षातून आलेल्या किती जणांना तिकीटे दिली याबाबतच्या चर्चेला उधाण आले होते. सोलापूर शहरात भाजपाचे तीन आमदार आहेत. उमेदवारी देताना कोणत्या आमदारांना किती जागा दिल्या याबद्दलही उत्सुकता होती. बुधवारी रात्री पक्षाच्या अध्यक्ष रोहिणी तडवळकर यांनी १०२ उमेदवारांची यादी जाहीर करुन या सर्व चर्चेला पुर्णविराम दिला.

गेल्या निवडणुकीत जे विजयी झाले होते त्यापैकी राजश्री कणके, अविनाश पाटील, नारायण बनसोडे, कल्पना कारभारी, डॉ. किरण देशमुख, संजय कोळी, वंदना गायकवाड, विनायक विटकर, अनंत जाधव, मंदाकिनी तोडकरी, गणेश वानकर, सुनील खटके, पद्माकर काळे, अमर पुदाले, मेघनाथ येमूल, प्रथमेश कोठे, विनायक कोंड्याल, विनोद भोसले, श्रीदेवी फुलारे, जुगनू आंबेवाले, श्रीकांचना यन्नम शिवानंद पाटील, किसन जाधव, अश्विनी चव्हाण, संगीता जाधव यांना यावेळी पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे.

अन्य पक्षातून भाजपात आलेल्यांमध्ये रंजीता चाकोते, गणेश वानकर, उत्तरा बरडे, पद्माकर काळे, मेघनाथ येमुल, प्रथमेश कोठे, विनायक कोंड्याल, विनोद भोसले, श्रीदेवी फुलारे, दिलीप कोल्हे, वहीदाबी शेख, किसन जाधव, अंबिका नागेश गायकवाड, वनिता संतोष पाटील, नागेश ताकमोगे, जयकुमार माने यांनाही भाजपाने उमेदवारी दिली आहे.

**डॉ.किरण देशमुख, यन्नम यांना उमेदवारी बहाल**

भारतीय जनता पक्षाने नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकीत मंत्री, आमदार यांच्या नातेवाईकांना उमेदवारी दिली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात टीका झाली होती. त्यामुळे पक्षाने महापालिका निवडणुकीत आमदारांच्या नातेवाईकांना तिकीट देणार नाही असा धोरणात्मक निर्णय घेतला होता. या धोरणामुळे आमदारांच्या नातेवाईकांना तिकीट मिळणे अवघड झाले होते. आमदार सुभाष देशमुख यांनी मनिष निवडणूक लढवणार नाही असे जाहीर केले होते. डॉ. किरण यांना मात्र पक्षाने उमेदवारी दिली आहे. विशेष म्हणजे किरण यांनी उमेदवारी मागणीसाठी पक्षाकडे अर्जही केला नव्हता आणि मुलाखतही दिली नव्हती. आमदार देवेंद्र कोठे यांच्या सासू माजी महापौर श्रीकांचना यन्नम यांनाही उमेदवारी देण्यात आली आहे.

# दिल्लीत ईडीचा छापा; पाच कोटींची रोकड जप्त

**नवी दिल्ली, ३१ डिसेंबर**

अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने अपोलो ग्रीन एनर्जी लिमिटेडचा प्रवर्तक इंद्रजीत सिंह यादव आणि त्याच्या सहकाऱ्यांचे घर आणि कार्यालयावर टाकलेल्या छाप्यात ५.१२ कोटींची रोख आणि ८.८० कोटींचे सोने जप्त केले. मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात ही कारवाई करण्यात आली.

ईडीच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, मनी लॉण्ड्रिंगच्या प्रकरणात केलेल्या कारवाईत इंद्रजित सिंह यादवच्या घरातून ५.१२ कोटींची रोख आणि ८.८० कोटी किंमतीचे सोने व हिरे जप्त करण्यात आले. त्याच्या साथीदारांच्या घरातून रोख, सोने आणि परकीय चलन आणि मालमत्तांचे दस्तावेज जप्त करण्यात आले. दिल्लीतील इंद्रजितच्या दुसऱ्या एका सहकाऱ्याच्या घरातून १ कोटींहून अधिक रोख देखील जप्त करण्यात आली आहे. ईडीने इंद्रजित यादव, त्यांचे सहकारी आणि अपोलो ग्रीन एनर्जी लिमिटेड कंपनीविरुद्ध पीएमएलए अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. या आधारे, ईडीने त्याच्याविरुद्ध मनी लॉण्ड्रिंगचा तपास सुरू केला.

आरंभ २०२६

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

HAPPY NEW YEAR

सोलापूर | गुरुवार, १ जानेवारी २०२६

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## भाजपा एबी फॉर्म प्रकरण तापले

# सोलापूर महापालिका निवडणूक रद्द करा

- आयुक्तांना पत्र; विरोधक जाणार हायकोर्टात
- ॲड. असीम सरोदे यांच्यामार्फत लढणार कायदेशीर लढाई



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

भाजपाचे एबी फॉर्म प्रकरण अधिक तापले असून शिवसेना शिंदे गट, कॉँग्रेस, शिवसेना उबाठा पक्ष, माकपा यांच्यासह विरोधकांनी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना नोटीस दिली. निवडणूक निर्णय अधिकारी दोन आणि चार मधील सर्व उमेदवारांची निवडणूक निवडणूक रद्द करण्याच्या मागणीसाठी हायकोर्टात जाण्याचा इशारा दिला आहे. ॲड. असीम सरोदे यांच्यामार्फत ही कायदेशीर लढाई लढण्यात येणार असल्याचे नेत्यांनी स्पष्ट केले. महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी भाजपकडून एबी फॉर्म वेळेत तसेच मुदत संपल्यानंतर स्वीकारण्यात आल्याचा आरोप करत विरोधी पक्षांनी अधिक आक्रमक भूमिका घेतली. या प्रकरणामुळे निवडणूक निर्णय अधिकारी क्रमांक एक व दोन यांच्या कार्यालयात मोठा गोंधळ उडाला होता. हा वाद आता कायदेशीर मार्गाने जात आहे.

कॉँग्रेस, शिवसेना (एकनाथ शिंदे गट), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने ॲड. असीम सरोदे यांच्या माध्यमातून राज्य निवडणूक आयोगाकडे दाद मागण्यात आली आहे. या संदर्भातील लेखी नोटीस बुधवार ३१ डिसेंबर रोजी महापालिका आयुक्तांना देण्यात आली. निवडणूक आयोगाने या गंभीर बाबीची दखल न घेतल्यास थेट उच्च न्यायालयात धाव घेऊन संबंधित प्रभागांतील निवडणूक प्रक्रिया रद्द करण्याची मागणी केली जाईल. दरम्यान, उमेदवारी अर्ज छाननीदरम्यान मुदत संपल्यानंतरही भाजपचे एबी फॉर्म स्वीकारले जात असल्याचा आरोप करत भाजपा सोडून इतर पक्षातील सर्व घटक पक्षांचे नेते बुधवारी दुपारी महापालिका आयुक्तांची भेट घेऊन आपली भूमिका मांडली. महाविकास आघाडीचे नेते अशोक निबर्गी यांनी आरोप केला की, एबी फॉर्म दाखल करण्याची अधिकृत अंतिम वेळ दुपारी तीन वाजेपर्यंत असताना त्यानंतरही भाजपचे फॉर्म स्वीकारण्यात आले. ही बाब निवडणूक नियमांची उघडपणे पायमल्ली करणारी आहे. एबी फॉर्म दाखल करण्याची अधिकृत अंतिम वेळ दुपारी तीन वाजेपर्यंत असताना त्यानंतरही भाजपचे फॉर्म स्वीकारण्यात आले.

ही बाब निवडणूक नियमांची उघडपणे पायमल्ली करणारी असून, लोकशाही प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी असल्याचा आरोप महाविकास आघाडीचे नेते प्रा. अशोक निबर्गी यांनी केला आहे. दरम्यान, उशिरा दाखल झालेले एबी फॉर्म तात्काळ रद्द करावेत, अशी ठाम मागणी कॉँग्रेससह शिंदे गटाची शिवसेना, उद्धव ठाकरे गटाची शिवसेना व अन्य विरोधी पक्षांनी केली आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना (शिंदे गट) आणि कॉँग्रेसने संबंधित प्रभागांतील निवडणूक रद्द करण्याची मागणी करत उच्च न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला आहे. यावेळी कॉँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे, आमदार अमोल शिंदे, अशोक निबर्गी, अरिफ शेख यांच्यासह विविध पक्षांचे नेते व कायदेशीर सल्लागार उपस्थित होते.

**अन्यथा न्यायालयात जाण्याचा मार्ग मोकळा : अमोल शिंदे :** निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिलेल्या पत्रानुसार एबी फॉर्म उशिरा आल्याचे हे सिद्ध होते.मात्र कार्यालयात टाकलेला गठ्ठा हा एबी फॉर्मचा होता की कशाचा होता या संदर्भात संभ्रम निर्माण खुलासा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा आहे. भाजपाने राजकीय दबाव वापरून हे कृत्य करून घेतले आहे.त्यामुळे त्या दिवशीच्या व्हिडिओ चित्रीकरण आम्हाला उपलब्ध करून द्यावे यासंदर्भातली नोटीस आम्ही निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना दिली आहे.अन्यथा मला न्यायालयात जाण्याचा मार्ग मोकळा आहे, असे शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी सांगितले.

## नववर्षाची आनंद वार्ता

# नाशिक-सोलापूर-अक्कलकोट सहा पदरी ग्रीनफील्ड कॉरिडॉरला मोदी सरकारचा हिरवा कंदील!



**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३१ डिसेंबर**

नाशिक-सोलापूर- अक्कलकोट या ३७४ किलोमीटर लांबीच्या सहा पदरी ग्रीनफिल्ड ॲक्सेस-कंट्रोल्ड मार्गिकेच्या बांधकामाला केंद्राचा हिरवा कंदील मिळाला आहे. बांधा वापरा हस्तांतरित करा या तत्त्वावर राबवल्या जाणाऱ्या या प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च १९ हजार १४२ कोटी इतका आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीने बुधवारी या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे.

नाशिक, अहिल्यानगर, सोलापूर महत्त्वाच्या शहरांसह पुढे कुर्नुलला जोडणारा हा प्रकल्प पायाभूत सुविधा पीएम गतिशक्ती राष्ट्रीय बृहद् आराखड्याच्या तत्त्वांतर्गत एकात्मिक वाहतूक पायाभूत सुविधा विकासाला गती देण्यासाठीचा एक महत्त्वपूर्ण निर्णय आहे. नाशिक ते अक्कलकोट दरम्यानचा हा ग्रीनफिल्ड मार्ग वाढवण बंदर इंटरचेंजजवळ दिल्ली- मुंबई एक्सप्रेसवेला, नाशिकमध्ये राष्ट्रीय महामार्ग -६० (आडेगाव) च्या जंक्शनवर आग्रा-मुंबई कॉरिडॉरला आणि पांगरी (नाशिक जवळ) येथे समृद्धी महामार्गाला जोडण्याचे प्रस्तावित आहे. हा प्रस्तावित मार्ग पश्चिम किनारपट्टीपासून पूर्व किनारपट्टीपर्यंत थेट दळण वळण उपलब्ध करेल. चेन्नई बंदराच्या बाजूने, तिरुवल्लूर, रेणिगुंटा, कडप्पा आणि कुर्नूलमार्गे चेन्नई ते हसापूर (महाराष्ट्र सीमा) पर्यंत (७०० कि.मी. लांब) चार पदरी मार्गिकेचे काम प्रगतीपथावर आहे.

महामार्ग क्षमता सुधारणे हा या प्रस्तावित ॲक्सेस-कंट्रोल्ड सहा-पदरी ग्रीनफिल्ड प्रकल्पाचा मुख्य उद्देश असून, यामुळे प्रवासाचा वेळ १७ तास आणि प्रवासाचे अंतर २०१ कि.मी. ने कमी होण्याची अपेक्षा आहे.

नाशिक-अक्कलकोट (सोलापूर) मार्गामुळे कोप्पर्थी आणि ओरवाकल या प्रमुख नॅशनल इंडस्ट्रियल कॉरिडॉर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (एनआयसीडीसी) नोड्सवर येणाऱ्या आणि जाणाऱ्या मालाची लॉजिस्टिक क्षमता सुधारणार आहे. नाशिक-तळेगाव दिघे हा भाग पुणे-नाशिक एक्सप्रेसवेच्या विकासाच्या दृष्टीने देखील महत्वाचा आहे. एनआयसीडीसीने महाराष्ट्र राज्य शासनाद्वारे हाती घेतल्या जाणाऱ्या प्रस्तावित नवीन एक्सप्रेसवेचा भाग म्हणून हा प्रकल्प असेल. या प्रकल्पामुळे सुधारित सुरक्षा आणि विनाव्यत्यय वाहतुकीसाठी द्रुत-गती मार्ग उपलब्ध होणार आहे. यामुळे प्रवासाचा वेळ, वाहतूक कोंडी आणि परिचालन खर्च कमी व्हायला मदत होईल. महत्त्वाचे म्हणजे, हा प्रकल्प या क्षेत्रातील पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्याबरोबरच नाशिक, अहिल्यानगर, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यांच्या सर्वांगीण आर्थिक विकासात मोलाचे योगदान देईल. हा सहा पदरी ॲक्सेस-कंट्रोल्ड ग्रीनफिल्ड कॉरिडॉर 'क्लोज टोलिंग' सुविधेसह असणार आहे. सरासरी ताशी ६० कि.मी. आणि ताशी १०० कि.मी. डिझाइन स्पीडची अनुमती असेल. यामुळे प्रवासाचा एकूण वेळ अंदाजे १७ तासांपर्यंत कमी होईल (३१ तासांवरून ४५ टक्केची घट), तसेच प्रवासी आणि मालवाहू वाहनांसाठी अधिक सुरक्षित, वेगवान आणि विनाव्यत्यय दळण वळणाची सुविधा उपलब्ध होईल.

**रोजगारासह विकासाला चालना**

या प्रकल्पामुळे सुमारे २५१.०६ लाख मनुष्य-दिवस प्रत्यक्ष रोजगार आणि ३१३.८३ लाख मनुष्य-दिवसांचा अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होईल. या प्रस्तावित मार्गिकेच्या परिसरात आर्थिक घडामोडी वाढल्यामुळे अतिरिक्त रोजगाराच्या संधी निर्माण होतील.

# भाषा, साहित्य, इतिहास चिंतनाचा ऱ्हास न थांबल्यास गंभीर परिस्थिती

**विश्वास पाटील**



**सातारा, दि. ३१ डिसेंबर-**

यशवंतराव चव्हाण हे केवळ उत्तम प्रशासक किंवा राजकारणी नव्हते, तर ते साहित्य, भाषा अन् संस्कृतीचे मनापासून जतन करणारे विचारवंत होते. मात्र, महाराष्ट्रात आज मराठी भाषेचा, साहित्याचा अन् इतिहासाच्या चिंतनाचा ऱ्हास होताना स्पष्टपणे दिसत आहे. ही घसरण वेळेत थांबवली नाही तर, भविष्यात फार गंभीर परिस्थिती निर्माण होईल, असे परखड मत ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी व्यक्त केले.

विश्वास पाटील यांनी माजी उपपंतप्रधान (कै.) यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिस्थळी बुधवारी अभिवादन केले. ज्येष्ठ साहित्यिक दि. बा. पाटील तसेच डॉ. माणिक बनकर, प्रा. बी. एस. खोत, ॲड. संभाजी मोहिते यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. विश्वास पाटील म्हणाले, मराठी भाषा, साहित्य, संस्कृती आणि इतिहासाकडे होत असलेले दीर्घकालीन दुर्लक्ष महाराष्ट्रासाठी धोक्याची घंटा असून, याची गंभीर फळे लवकरच समाजाला भोगावी लागतील.राज्यात गेल्या तीन- चार दशकांपासून ग्रंथालयांना घरघर लागली आहे. हरियाणात 'एक गाव- एक ग्रंथालय' अशी प्रभावी चळवळ उभी राहत असताना, महाराष्ट्रात मात्र, मोठ-मोठी ग्रंथालये बंद पडत आहेत. जी सुरू आहेत, त्यांच्याकडेही शासन, समाज आणि वाचकांचे दुर्लक्ष होत असल्याची खंत पाटील यांनी व्यक्त केली.




### सोलापूरसाठी तीन स्थानिक सुट्ट्या जाहीर

**सोलापूर :** जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी सोलापूरसाठी १४ जानेवारी मकर संक्रात, २५ सप्टेंबर अनंत चतुर्दशी आणि ६ नोव्हेंबर रोजी धनत्रयोदशी अशा तीन स्थानिक सुट्या जिल्हाधिकारी आशिर्वाद यांनी जाहीर केल्या आहेत.

### राऊतांच्या घराबाहेर 'बॉम्ब'ची धमकी!

**मुंबई :** मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अत्यंत सक्रिय असलेले शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आज सकाळी भांडुप येथील त्यांच्या निवासस्थानाबाहेर उभ्या असलेल्या एका गाडीवर 'बॉम्ब से उडा दुंगा' असे लिहिलेले आढळून आले. या घटनेची माहिती मिळताच मुंबई पोलिसांचे बॉम्ब शोधक आणि नाशक पथक संजय राऊत यांच्या घरी दाखल झाले असून संपूर्ण परिसराची तपासणी सुरू करण्यात आली आहे.

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

'सोलापूर तरुण भारतची दिनदर्शिका सांगे भविष्याची दिशा'

- नव्या वर्षाची नवी कोरी दिनदर्शिका
- वर्षभर संग्रही राहील अशा वाचनीय मजकुरासह २४ पानांची रंगीत दिनदर्शिका
- प्रत्येक तारखेचा बारीक-सारिक तपशील
- तिथी वार, नक्षत्र, बारा राशींचे भविष्य
- संकष्टी चतुर्थी, गावोगावचे चंद्रोदय
- आरोग्य विषय व बारा ज्योतिर्लिंग माहितीसह भरगच्च मजकूर

आजच आपल्या दिनदर्शिकेची अंक वितरकाकडे नोंदणी करा.



नोंदणीसाठी संपर्क : 8888847267



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# तिकिटांच्या तमाशाचे तात्पर्य

**"कुणी निष्ठेची गाठ सोडून पळाले,**
**कुणी खुर्चीच्या आशेने वेडे जाहले...**
**ज्यांनी जपली होती कधी तत्त्वे आणि मूल्ये,**
**त्यांच्याच हाती आज स्वार्थाचे निखारे आले!"**

१५ जानेवारीला महाराष्ट्र राज्यातील २९ महानगर पालिकांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. सर्व राजकीय पक्षांनी त्यासाठी आघाड्या व युतीचे प्रयत्न करून पाहिले. शेवटच्या दिवसापर्यंत त्यांच्यातील वाटाघाटी ताणल्या गेल्या होत्या. इतक्या की, अनेक ठिकाणी आघाड्या होता होता तुटूनही पडल्या. साऱ्याच पक्षांच्या पुढाऱ्यांनी एका जागेसाठी आपल्या पाच-सहा कार्यकर्त्यांना निवडणुकीसाठी जोरदार तयारीचे आश्वासन देऊन ठेवले होते. शेवटी जागा एकच असल्याने ज्यांना ज्यांना तिकीट मिळाले नाही, त्यांनी अक्षरशः राडा केला. कुणी हंबरडा फोडला, कुणी लगेच राजीनामा दिला, कुणी बंडखोरी केली, तर कुणी आपल्याच नेत्याला नाही नाही तसे बोलले. चारचौघात नेत्यांची खरडपट्टी काढली. तक्रारी, वाद साऱ्याच पक्षांत झाले. नेत्यांच्या घरावर धावून जाणे, पक्षश्रेष्ठींच्या गाड्यांचा पाठलाग करणे, उमेदवारी अर्जाची पळवापळव करणे, पक्ष कार्यालयांवर दगडफेक करणे, तिकीट मिळाले नाही म्हणून बेशुद्ध होणे, स्वतःला जाळून घेण्याचा प्रयत्न करणे असे सारेच प्रकार झाले आणि ते सुसंस्कृत महाराष्ट्राला लाजवणारे ठरले आहेत. राजकारण कोणत्या थराला पोहोचले आहे याचे हे प्रदर्शन होते. कधी नव्हे, तो तिकीट वाटपाचा जंगी जोरदार तमाशा महाराष्ट्र राज्याने यंदा बघितला. पूर्वी तमाशा बघायला पैसे लागायचे; पण मंगळवारी जनतेने तो फुकटातच बघितला आणि त्याचे कवित्व कित्येक वर्षे मनोरंजनाला पुरणार आहे! या घटना वरकरणी हास्यास्पद किंवा गमतीच्या किंवा भावनिक अतिरेकाच्याही वाटतील. प्रत्यक्षात त्या फार गंभीर आहेत.

महाराष्ट्र ही संतांची, विचारांची भूमी आणि प्रबोधनाची पंढरी मानली जाते. कधी काळी येथे राजकारण-समाजकारण बऱ्यापैकी नैतिक असायचे. आता सारेच संपल्यात जमा आहे. महानगरपालिका निवडणुकांच्या उमेदवारीचे तिकीट वाटपादरम्यान हा जो काही प्रकार घडला, तो केवळ राजकीय गोंधळ नव्हता; तर राजकारणातल्या नैतिक मूल्यांचा, वैचारिक भूमिकांच्या अंत्येष्टीचा सोहळा होता. पूर्वी निवडणुकीचे तिकीट म्हणजे जनसेवेची संधी मानली जायची. आता तो 'व्यवसाय' झाला आहे. राजकारण हे समाजसेवेचे माध्यम न राहता तो फायदेशीर 'धंदा' बनला आहे. अपवाद वगळता, तरुण कार्यकर्ते आज राजकारणाकडे आकर्षित होतात ते ध्येयवादामुळे नव्हे, तर आपल्या नेत्यांना अल्पावधीत 'गब्बर' होताना बघूनच! त्यांना दिसते, की अवघ्या पाच वर्षांत नेत्यांची संपत्ती जेमतेमवरून कोट्यवधीच्या घरात पोहोचली आहे. महागड्या गाड्या, बंगले आणि त्यांचे शाही राहणीमान कार्यकर्त्यांना भुरळ घालत असते. अनेकदा ईर्ष्याही निर्माण होत असते. मग तो कार्यकर्ताही नेत्याच्याच मार्गाने चालू लागतो. लहानमोठ्या समाजसेवेपासून सुरुवात करतो. संधी मिळताच राजकारणात प्रवेश करतो आणि कुठल्याही परिस्थितीत निवडणुकीची उमेदवारी मिळावी म्हणून वाट्टेल ते करायला तयार असतो. संधी हुकली की मग त्याला पक्षनिष्ठा, राजकीय शुचितेचे अजिबात भान उरत नाही. आपण काल अमक्या पक्षाचे किंवा विचारांचे निष्ठावंत होतो हे लगेच विस्मरणात जाते आणि सत्तेची खुर्ची तेवढी नजरेत आणि काळजात घर करून बसते. त्यातून असे वर्तन घडते. पोहऱ्यातच नसेल तर सुपात येणार कुठून? जेव्हा त्याचे हितसंबंध आणि मनसुबे धोक्यात येतात, तेव्हा मग असा 'राडा' होतो. मंगळवारी असेच काहीसे चित्र महाराष्ट्रापुढे आले. अगदी शेवटच्या क्षणापर्यंत उमेदवारांची यादी पक्षांनी जाहीर न केल्याने दिवसभर तिष्ठत राहिलेल्या संतप्त उमेदवारांनी आणि त्यांच्या समर्थकांनी गोंधळ घातला. तिकीट मिळाले नाही म्हणून अनेक लोक थेट नेत्यांच्या घरावर धावून गेले, अनेकांनी पक्षाच्या कार्यालयांची तोडफोड केली. आत्मदहनाचे, बेशुद्ध होण्याचे नाट्यही रंगले. हा तमाशा केवळ कार्यकर्त्यांचा नव्हता, तर तो विद्यमान राजकारणाच्या वैचारिक दिवाळखोरीचाही होता. नेत्यांच्या आश्वासनखोरीचे वाभाडे काढणाराही होता.

आज जे कार्यकर्ते उमेदवारी मिळाली नाही म्हणून रस्त्यावर राडा घालताहेत, नेत्यांच्या गाड्या अडवताहेत, तेच जर उद्याचे नेते होणार असतील आणि हीच जर येत्या काळाची राजकीय संस्कृती ठरणार असेल, तर ती अराजकतेची नांदी समजली पाहिजे. महाराष्ट्राच्या राजकीय भविष्याबद्दल तीव्रतेने चिंता वाटावी असेच हे चित्र आहे. पूर्वीच्या काळी पक्षात मतभेद असायचे. वादही व्हायचे. पण पक्ष, विचार आणि नेते यांच्याप्रति आदर होता. नेत्यांच्या शब्दाला मान होता. नेते कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभे राहायचे. समजून काढायचे. नेते व कार्यकर्ते दोघांतही पक्षनिष्ठा दिसायची. आज निष्ठा ही केवळ 'सत्तेच्या सोयीनुसार' बदलणारी वस्तू झाली आहे. राजकीय पक्षांचे नेते व्यासपीठावरून ओरडून सांगतात, की आमच्याकडे परिवारवाद, भाई-भतिजावाद, नातलगशाही नाही. आम्ही सामान्य कार्यकर्त्याला न्याय देतो. पण प्रत्यक्ष निवडणुकीच्या तिकीट वाटपाच्यावेळी आमदार-खासदारांच्या घरातच दोन-दोन, तीन-तीन जणांना उमेदवारी दिली जाते. अशात ज्या कार्यकर्त्यांनी वर्षानुवर्षे सतरंज्या उचलल्या, ज्यांनी पक्षाचा झेंडा खांद्यावर घेऊन उन्हातान्हात मिरवला, त्यांच्या वाट्याला केवळ नेत्यांच्या गाड्यांचा पाठलाग करणे आणि ऊर बडवणेच येत असेल, तर ते गंभीर दखल घेण्यासारखे आहे. आता तर हा 'भाई-भतिजावाद' इतका फोफावला आहे की, कर्तृत्वापेक्षा रक्ताच्या नात्याला आणि पैशाला जास्त महत्त्व आले आहे. पुढारी जे बोलतात आणि जे करतात, त्यात जमीन-अस्मानाचे अंतर असते. राजकारणाच्या बाजारात सारे एकाच माळेचे मणी असल्याचे दिसत असून, आतापर्यंत होते ते वैचारिक गांभीर्य राजकारणातून हरवत चालले आहे, असा या घटनांचा अर्थ आहे.

साऱ्याच पक्षांत गटबाजीचे स्तोम माजले आहे. कार्यकर्त्याने कायम कार्यकर्ता राहिले पाहिजे असे नेत्याला वाटते. कारण त्याला त्याची खुर्ची जाण्याचे कायम भय असते. एखादा कार्यकर्ता मोठा झाला की, मग गटबाजीचे राजकारण सुरू होते. आता राजकारणात विचारधारेला जागाच उरली नाही. निष्ठेला वाव नाही. जो निवडून येण्याची क्षमता ठेवतो; मग तो गुंड, भ्रष्टाचारी असो की, आयाराम-गयाराम असो; त्याच्यासाठी पायघड्या घातल्या जातात. ज्या राज्यात समाजसुधारकांच्या आणि ध्येयवादी नेत्यांच्या विचारांची चर्चा व्हायची आणि आचरणही व्हायचे, त्याच राज्यात आज 'एबी फॉर्म'साठी नेत्यांच्या गाड्यांचा जीवघेणा पाठलाग व्हावा, हे लोकशाहीतील वैचारिक भूमिका आणि निष्ठांच्या अधोगतीचे सर्वांत विदारक लक्षण मानले पाहिजे. मंगळवारी कार्यकर्त्यांनी जो राडा घातला, तो विचारधारेसाठी नव्हता. नेत्यांच्या मागे फिरण्यात आणि त्यांची सरबराई करण्यात जो खर्च झाला, त्या गुंतवणुकीच्या परताव्यासाठी होता. तिकीट मिळाले नाही म्हणून आत्मदहनाचा प्रयत्न करणे किंवा ढसाढसा रडणे, हंबरडा फोडण्याचे दृश्य निव्वळ हास्यास्पद नसून, ते भविष्यासाठी चिंताजनकही आहे. हेच कार्यकर्ते उद्याचे लोकप्रतिनिधी होणार असतील, तर महाराष्ट्राच्या भविष्यातील राजकारणात कितपत गांभीर्य उरेल याचा अंदाज न लावलेलाच बरा. साऱ्याच पक्षांसमोर बंडखोरीचे मोठे आव्हान आहे. ते शमवण्यासाठी शीर्ष नेतृत्वाला मोठी कसरत करावी लागेल. काही पक्ष 'डॅमेज कंट्रोल' करण्यासाठी पुढे सरसावले आहे. मात्र, या संपूर्ण तिकीट तमाशात सर्वाधिक नुकसान सामान्य जनतेचे आणि लोकशाहीच्या पावित्र्याचे झाले आहे. या राजकीय तमाशाची किंमत सर्वसामान्य मतदाराला आपल्या मूलभूत सोयीसुविधा आणि विकासाचा बळी देऊन मोजावी लागणार आहे. राजकारण जेव्हा ध्येयवादाकडून धंदेवाईकतेकडे झुकते, तेव्हा असा राडा अटळ असतो. आता प्रश्न हा उरतो की, जनता या तमाशाची मूक प्रेक्षक बनून राहते की लोकशाहीच्या मतपेटीतून या साऱ्या प्रवृत्तींना कायमचा धडा शिकवते? राजकारणाच्या या खालावलेल्या पातळीला वेळीच आवर घातला नाही, तर येणारा काळ सत्तेचा नक्की असेल, मूल्यांचा मात्र नक्कीच नसेल! तिकिटांच्या तमाशाचे तात्पर्य हेच. ■

## तंत्रवेध

### डॉ. दीपक शिकारपूर

# 'ध्रुव ६४' भारताचे धुरंधर यश

आजच्या आधुनिक युगात डाटा हे नवीन इंधन आहे आणि तो डाटा प्रोसेस करणारे मायक्रोप्रोसेसर हे त्या इंजिनाचे हृदय आहे. आतापर्यंत भारत प्रोसेसरसाठी इंटेल, एन्विडिया किंवा एएमडीसारख्या विदेशी कंपन्यांवर अवलंबून होता. परंतु, 'आत्मनिर्भर भारत' अभियानांतर्गत भारताने स्वतःचे स्वदेशी मायक्रोप्रोसेसर विकसित करण्यास सुरुवात केली आहे. याच प्रवासातील एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा म्हणजे ध्रुव ६४ मायक्रोप्रोसेसर. ध्रुव ६४ हे भारताचे पहिले स्वदेशी ६४ बिट ड्युअल कोअर मायक्रोप्रोसेसर आहे, ज्याची घोषणा डिसेंबर २०२५ मध्ये झाली. हे सी-डॅकने डिजिटल इंडिया रिस्क-व्ही (डीआयआर-व्ही) कार्यक्रमांतर्गत विकसित केले असून १.० गीगाहर्ट्झ क्लॉक स्पीडवर कार्य करते. आजचे युग हे सिलिकॉनचे युग आहे. ज्या देशाकडे स्वतःचे चिप तंत्रज्ञान आहे, तोच देश जगावर राज्य करेल अशी स्थिती आहे. त्यामुळे ध्रुवचे महत्त्व वाढले आहे. हा प्रोसेसर ६४-बिट क्षमतेचा आहे, याचा अर्थ तो एकाच वेळी मोठ्या प्रमाणात माहितीवर प्रक्रिया करू शकतो. ध्रुव ६४ हा रिस्क ५ (रिड्युस्ड इंस्टक्शन्स सेट कॉम्प्युटर ५) या ओपन-सोर्स आर्किटेक्चरवर आधारित आहे. यामुळे भारताला परवाना शुल्कासाठी परदेशस्थित कंपन्यांना पैसे द्यावे लागत नाहीत. हा प्रोसेसर अशा प्रकारे डिझाईन केला आहे ज्यामुळे अत्यंत कमी ऊर्जेवर काम करतो. परिणामी, बॅटरीवर चालणाऱ्या उपकरणांसाठी तो उत्तम ठरतो. स्वदेशी बनावटीचा असल्याने यामध्ये देशाचा डाटा सुरक्षित राहतो. ध्रुव ६४ केवळ प्रयोगशाळेपुरता मर्यादित नाही; त्याचा वापर अनेक क्षेत्रांमध्ये तसेच स्मार्ट वॉच, डिजिटल कॅमेरे आणि घरगुती उपकरणांमध्ये होऊ शकतो.

आणखी काही वैशिष्ट्ये म्हणजे राऊटर्स, मोडेम आणि स्विचमध्ये स्वदेशी प्रोसेसर वापरल्याने सायबर सुरक्षेचा धोका कमी होतो. भारतीय लष्कराची उपकरणे, क्षेपणास्त्र प्रणाली आणि इस्रोच्या उपग्रहांमध्ये ध्रुव ६४ सारखे स्वदेशी प्रोसेसर अत्यंत महत्त्वाचे ठरतील. कारखान्यांमधील रोबोट्स आणि कंट्रोल सिस्टिम्स चालवण्यासाठी याचा वापर होऊ शकतो. या उत्पादनामुळे आत्मनिर्भर भारत अभियानाला चालना मिळू शकते. आत्मनिर्भर भारत म्हणजे केवळ भारतात वस्तू बनवणे नव्हे, तर भारताची स्वतःची बुद्धिमत्ता विकसित करणे होय. ध्रुव ६४ या दिशेने टाकलेले एक मोठे पाऊल आहे. ध्रुव ६४ आत्मनिर्भर भारत अभियानाचे प्रतीक आहे, जे आयात अवलंबित्व कमी करून २० लाख कोटींच्या अर्थव्यवस्थेला गती देते. आयएसएम आणि डीएलआय योजनांखाली हे स्वदेशी उत्पादन, नोकऱ्या आणि निर्यात वाढवेल. हे अभियान ग्रामीण रोजगार, पायाभूत सुविधा आणि डिजिटल अर्थव्यवस्थेला मजबूत करेल. सी-डॅकसारख्या संस्था सेमीकंडक्टर कार्यबल तयार करतील. परिणामी, भारत जागतिक पुरवठा साखळीत मजबूत होईल. भारत दरवर्षी अब्जावधी डॉलर्सच्या सेमीकंडक्टर चिप्स आयात करतो. ध्रुव ६४ मुळे ही आयात कमी होऊन परकीय चलन वाचेल. एखादा स्वदेशी प्रोसेसर येतो, तेव्हा त्याच्यासोबत सॉफ्टवेअर डेव्हलपर्स, इंजिनीअर्स आणि मॅन्युफॅक्चरिंग युनिट्स असे मोठे जाळे तयार होते. यामुळे भारतीय स्टार्टअप्स आता स्वदेशी प्रोसेसरचा वापर करून नवीन उत्पादने बनवू शकतील.




भारत सध्या जगाचे सॉफ्टवेअर हब आहे, पण हार्डवेअरमध्ये आपण मागे होतो. ध्रुव ६४ मुळे हे चित्र बदलत आहे. जग सध्या चिप्ससाठी चीन आणि तैवानवर अवलंबून आहे. भारतीय बनावटीचे प्रोसेसर हे जागतिक दर्जाचे असूनही किमतीने स्वस्त असतील; ज्यामुळे विकसनशील देशांच्या बाजारपेठेत भारत नेतृत्व करू शकेल. कोणत्याही नवीन टेक स्टार्टअपसाठी लायसन्स फी हा एक मोठा अडथळा असतो. एखाद्या स्टार्टअपला परदेशी प्रोसेसर वापरायचा असल्यास कोट्यवधी रुपये रॉयल्टी म्हणून द्यावे लागतात. ध्रुव ६४ ओपन सोर्स तंत्रज्ञानावर आधारित असल्याने स्टार्टअप्सना परवाना शुल्काची चिंता करण्याची गरज नाही. यामुळे उत्पादनाचा खर्च ३० ते ४० टक्क्यांनी कमी होऊ शकतो. परिणामी, भारतीय स्टार्टअप्स आता स्वस्त दरात स्वतःचे मदरबोर्ड आणि कंट्रोलर बनवू शकतील. यामुळे स्मार्ट वॉच, ड्रोन किंवा ई-सायकल बनवणारे स्टार्टअप्स जागतिक बाजारात स्पर्धा करू शकतील. 'डिजिटल इंडिया' आणि 'चिप टू स्टार्टअप'सारख्या योजनांमुळे अशा स्टार्टअप्सना सरकारकडून आर्थिक मदत आणि तांत्रिक सहकार्य सहज उपलब्ध होत आहे.

सायबर सुरक्षेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संशोधकांसाठी स्वदेशी प्रोसेसर म्हणजे एक अभेद्य किल्ला आहे. परदेशी चिप्समध्ये बॅकडोअर असू शकतात, पण ध्रुव ६४ पूर्णपणे पारदर्शक असल्याने सुरक्षित डेटा प्रोसेसिंग शक्य आहे. डिझाइनर्स, स्टार्टअप्स आणि संशोधक एकत्रितपणे स्वदेशी चिप्सचा वापर करतात, तेव्हा देशाच्या अर्थव्यवस्थेवर थेट परिणाम होतो. यामुळे चिप डिझाइनिंग, फॅब्रिकेशन, असेम्बली आणि टेस्टिंग या क्षेत्रांमध्ये लाखो नवीन नोकऱ्या निर्माण होतील. केवळ सॉफ्टवेअरमध्येच नव्हे, तर हार्डवेअर इंजिनीअरिंगमध्येही भारत 'जॉब हब' बनू शकेल. आणखी एक दखलपात्र बाब म्हणजे भविष्यात भारत केवळ स्वतःच्या गरजा भागवून थांबणार नाही, तर आफ्रिका, दक्षिण आशिया आणि दक्षिण अमेरिकेतील देशांना ध्रुव ६४ वर आधारित स्वस्त आणि दर्जेदार उत्पादने निर्यात करू शकेल. ध्रुव ६४ ने मोठी संधी उपलब्ध करून दिली असली, तरी आपल्याला सेमीकंडक्टर फॅब्रिकेशन (चिप बनवण्याचे कारखाने) मध्ये अधिक गुंतवणूक करावी लागेल. स्टार्टअप्सना या चिप्सचा वापर करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षण कार्यक्रम राबवावे लागतील. ध्रुव ६४ नंतर धनुष आणि धनुष+ प्रोसेसर विकसित होत असून ऑक्टा-कोअरपर्यंत जाईल. डीआयआर-व्ही कार्यक्रमांतर्गत भारत ओपन प्रोसेसर तंत्रज्ञानाचे जागतिक केंद्र बनेल. इंडिया सेमीकंडक्टर मिशन (आयएसएम) अंतर्गत १.६० लाख कोटींच्या गुंतवणुकीसोबत हे २०३० पर्यंत ११० अब्ज डॉलरची बाजारपेठ साध्य करेल. ध्रुव ६४ सारख्या चिप्समुळे भारत स्वदेशी डिझाईन इकोसिस्टिम मजबूत करेल. धनुष+ सारख्या पुढील पिढ्या संरक्षण आणि हाय-परफॉर्मन्स कॉम्प्युटिंगसाठी तयार होतील.

गेल्या ३० वर्षांमध्ये आपण सॉफ्टवेअर क्षेत्रामध्ये बरीच प्रगती केली असून हजारो उद्योग तसेच लाखो रोजगार निर्माण केले. आता पुढील दशक इलेक्ट्रॉनिक्स आणि सेमीकंडक्टर उद्योगाचे असेल. याचा व्यूहात्मक फायदा आयात कमी करून स्थानिक व्यवसाय आणि रोजगारनिर्मिती हा पण असेल. या उद्योगांना शेकडोंच्या संख्येने अनेक प्रकारचे कौशल्यवान अभियंते लागतील. अनेक जागतिक चिप डिझाईन कंपन्यांची संशोधन आणि विकास केंद्रे भारतात आहेत. या संधीचा फायदा घेऊन भारत चिप डिझाईन आणि सॉफ्टवेअरच्या क्षेत्रात आपले स्थान अधिक मजबूत करू शकतो. भारतीय कंपन्या सेमीकंडक्टर फॅब्स उभारून फक्त उत्पादनच नाही, तर चिप डिझाईनमध्येही आपली क्षमता वाढवू शकतात. या गुंतवणुकीमुळे भारतातील तरुणांना उच्च दर्जाचे रोजगार उपलब्ध होतील आणि देश तंत्रज्ञानाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होईल. ■

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

### नंदकिशोर काथवटे

# नववर्ष : बदलाची वेळ

नवीन वर्ष दारात उभं आहे. प्रत्येक वर्षाच्या पहाटेसोबत आशा, अपेक्षा आणि प्रश्न एकत्र डोकं वर काढतात. गेल्या वर्षाचा विचार केला तर सरकारच्या घोषणा मोठ्या होत्या, पण परिणाम मात्र छोटा होता. विकासाच्या नादात पर्यावरणाचं नुकसान, शिक्षण क्षेत्रातील असमानता, आरोग्य सेवांतील तुटवडा आणि रोजगाराच्या संधींची कमतरता या गोष्टींनी नागरिकांच्या मनात निराशा निर्माण केली. केवळ घोषणांनी, जल्लोषांनी आणि जाहिरातींनी देशाचा कायापालट होत नाही, तर त्यामागच्या निर्णयक्षम कृतीने होतो. गेल्या वर्षी अनेक योजना आणल्या गेल्या, पण त्या कागदावरच ठरल्या. काही योजनांना निधीच मिळाला नाही, काहींची जाहिरात जास्त झाली पण अंमलबजावणी कमी. शेतकऱ्यांना मदत म्हणून जाहीर केल्या जाणाऱ्या योजनांमध्ये फॉर्म भरताना नागरिक थकले, पण त्यांच्या वाट्याला फक्त 'प्रतीक्षा'च आली. आरोग्य विभागात डॉक्टर नाहीत, औषधं नाहीत आणि रुग्णालये आहेत पण सेवा नाही. अशा परिस्थितीत नागरिकांचा विश्वास उडणं स्वाभाविक आहे. शिक्षण, आरोग्य आणि रोजगार ही तीन क्षेत्रे यंदाच्या वर्षी प्राधान्याने सुधारलेच पाहिजेत. शिक्षणात कौशल्यविकासाला महत्त्व देणे गरजेचे आहे. शहरी व ग्रामीण शाळांमधील तफावत कमी व्हायला हवी. शिक्षकांसाठी प्रशिक्षण, विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक साधने आणि अभ्यासक्रमात उद्योग-धंद्यांशी जोडणारे बदल घडवायला हवेत. शिक्षण केवळ परीक्षा पास होण्यासाठी नसून, जीवनासाठी तयार करण्यासाठी असले पाहिजे. आरोग्यसेवेबाबत सरकारने विम्याची भाषा वापरली, पण रुग्णालयात उपचारच मिळाले नाहीत तर विमा कशासाठी? गरीब रुग्णांची बिलांमध्ये दमछाक होते, एखादा गंभीर आजार त्याला दारिद्र्याच्या खाईत लोटतो. मध्यमवर्ग लाजत-लपवत कर्ज काढतो आणि श्रीमंतच फक्त सुरक्षित राहतो अशी व्यवस्था असणे म्हणजे हा विकासाचा पराभव आहे. जिल्हा रुग्णालयांमध्ये डॉक्टर, यंत्रसामग्री आणि औषधं उपलब्ध करण्यासाठी बजेट वाढवणे आणि त्याचे पारदर्शक लेखांकन नागरिकांसमोर ठेवणे आवश्यक आहे. रोजगार हा सर्वांत मोठा प्रश्न आहे. तरुणांमध्ये ऊर्जा आहे, स्वप्ने आहेत, पण संधी नाहीत. उद्योजक बना म्हणणे सोपे आहे, पण कर्ज, परवाने, जागा, कर आणि बाजारपेठ मिळावी यासाठी सरकारने सुगम मार्ग तयार केला नाही तर उद्योजकता स्वप्नातच राहते.

कौशल्यविकास कार्यक्रम, स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन आणि कंत्राटी नोकऱ्यांवरील नियमन हे निर्णायक पाऊल यंदा गरजेचे आहे. सोशल मीडिया आणि तरुणाई यावर आज गंभीर चर्चा आवश्यक आहे. तंत्रज्ञान हे साधन आहे, लक्ष्य नाही. पण आज तरुण वर्ग आणि समाजातील अनेक जण तासन्तास रील्स, ट्रेंड्स, वाद-विवाद आणि व्हर्च्युअल प्रसिद्धीच्या मागे धावताना दिसतात. त्यांची ऊर्जा, वेळ आणि लक्ष या आभासी जगात अडकून बसतंय. सोशल मीडिया कौशल्यासाठी, शिक्षणासाठी, नवीन संधी शोधण्यासाठी, आणि माहितीच्या देवाणघेवाणीसाठी वापरला तर तो सोनं आहे. पण स्वतःला विसरणाऱ्या व्यसनात बदलला तर तो आपल्या भविष्याचा घात करणारा आहे. प्रत्येकाने स्वतःला प्रश्न विचारायला हवा, मी सोशल मीडियाचा वापर करतोय का, की सोशल मीडिया मला वापरतंय? नववर्षात ही जाणीव, ही मर्यादा, ही सवय बदलण्याची गरज आहे. सोशल मीडियावर स्वातंत्र्य असलं तरी त्याचा अतिरेक होतो आहे. फेक न्यूज, अफवा, द्वेषपूर्ण पोस्ट्स आणि तात्कालिक रागाच्या भरात घेतलेले निर्णय समाजाला विभागत आहेत. स्वातंत्र्य म्हणजे मन मोकळं करणे, पण विचार मोकळे करणे अधिक महत्त्वाचे आहे. सोशल मीडियावर आदर, सत्याची पडताळणी आणि मर्यादा ही स्वतःवर घेतलेली जबाबदारी असली पाहिजे. समाजातही बदल हवा आहे. सरकारवर टीका करणे योग्यच आहे, पण आपल्या स्तरावर उपाय शोधणे त्याहून महत्त्वाचे आहे. गावात पाणी प्रश्न असेल तर समिती स्थापन करा, रस्ते खराब असतील तर प्रशासनाकडे नियमित पाठपुरावा करा, शाळेसाठी मदत हवी असेल तर स्थानिक योगदानाची मोहीम उभी करा. कुणीतरी करेल या विचारातून बाहेर पडले नाही, तर बदलाची सुरुवातही होणार नाही. गेल्या वर्षी सरकारने केलेल्या चुका झाकण्याचा प्रयत्न केला, हे नागरिकांना जाणवलं. चुकांची कबुली देणे ही कमजोरी नाही; ती जबाबदारी आहे. नवीन वर्षात ही पद्धत बदलावी. नागरिक हा केवळ प्रेक्षक नाही, तो या देशाचा मालक आहे. म्हणून नागरिकांच्या प्रश्नांना उत्तर देणं, त्यांच्या हक्कांचा आदर करणे आणि प्रशासन पारदर्शक ठेवणे हे कोणत्याही सरकारचे कर्तव्य आहे. नवीन वर्षाचे स्वागत करताना फक्त शुभेच्छा पुरेशा नाहीत. बदलाची दिशा ठरवणे, हक्कांसाठी आवाज उठवणे आणि कृतीतून बदल घडवणे हेच आपले खऱ्या अर्थाने नववर्षाचे स्वागत होईल. आशा आहे की यंदाचे वर्ष आरोप-प्रत्यारोपांचे नाही, तर उत्तरांच्या शोधाचे असेल. घोषणांचे नाही, तर निर्णयांचे असेल. आणि स्वप्नांचे नाही, तर पूर्ततेचे असेल. बदलाच्या पाऊलखुणा उमटवण्यासाठी, नव्या स्वप्नांना सचोटीची दिशा देण्यासाठी आणि या देशात खरं भविष्य उभारण्यासाठी नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा! ■

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

### श्यामकांत जहागीरदार

# दिग्गीराजा आणि संघ, भाजपाचे कौतुक

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने आपला १४० वा स्थापना दिन नुकताच साजरा केला. काँग्रेसच्या या स्थापना दिन समारंभाच्या आधी ज्येष्ठ काँग्रेस नेते आणि मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजयसिंह यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे एक छायाचित्र एक्सवर पोस्ट करत खळबळ उडवली. या छायाचित्रात भाजपाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी खुर्चीवर बसलेले दिसत असून त्यांच्यासमोर जमिनीवर मांडी घालून बसलेले नरेंद्र मोदी आहेत. जो नेता एकेकाळी काहीच नव्हता, म्हणजे फक्त पक्षाचा प्रामाणिक आणि निष्ठावान कार्यकर्ता होता, तो नंतर गुजरातचा मुख्यमंत्री झाला, देशाचा पंतप्रधानही झाला, असे फक्त रा. स्व. संघ आणि भाजपातच होऊ शकते, असे दिग्विजयसिंह यांना म्हणायचे होते.

असे करत दिग्गीराजा यांनी रा. स्व. संघ आणि भाजपाच्या कार्यपद्धतीची प्रशंसा करून काँग्रेसच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले, असे म्हणावे लागेल. काँग्रेसमध्ये सुधारणा करण्याची तसेच अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्याची मागणी करत काँग्रेसच्या नेतृत्वाला घरचा अहेरही त्यांनी केला होता. तळागाळातील कार्यकर्ता फक्त भाजपातच मुख्यमंत्री होऊ शकतो, पंतप्रधान बनू शकतो, काँग्रेसमध्ये ते शक्य नाही, असे दिग्गीराजा यांना म्हणायचे असावे. काँग्रेसमध्ये पंतप्रधानपद हे नेहरू आणि गांधी घराण्यातील लोकांसाठीच राखीव होते. त्यामुळे पंडित जवाहरलाल नेहरूनंतर त्यांच्या कन्या इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या आणि इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर राजीव गांधी यांच्या गळ्यात पंतप्रधानपदाची माळ पडली. राजीव गांधी यांच्या हत्येनंतर सोनिया गांधी यांनी पंतप्रधानपद मिळवण्याचा प्रयत्न केला. पण तत्कालीन राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी हा प्रयत्न हाणून पाडला. २०१४ पासून राहुल गांधी पंतप्रधानपदासाठी जीव तोडून प्रयत्न करत आहे, पण देशातील जनता त्यांना या पदावर येऊ देत नाही. आतापर्यंत भाजपमध्ये पक्षाच्या निष्ठावान कार्यकर्त्यांना फक्त सतरंज्याच उचलाव्या लागतात, असा आरोप केला जायचा. २०१४ मध्ये देशात पहिल्यांदा भाजपाचे स्वबळावर स्पष्ट बहुमताचे सरकार आल्यानंतर यास्थितीत बदल झाला आहे. पक्षाच्या तळागाळातील प्रामाणिक आणि निष्ठावान कार्यकर्त्यांना मान मिळू लागला, अधिकाराची पदे दिली जाऊ लागली. तसे नसते तर डॉ. मोहन यादव यांची मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून निवड झाली नसती, भजनलाल शर्मा यांच्याकडे राजस्थानचे मुख्यमंत्रिपद आले नसते आणि विष्णुदेव साय छत्तीसगडचे मुख्यमंत्री झाले नसते. मुख्यमंत्री होण्याआधी डॉ. मोहन यादव, भजनलाल शर्मा आणि विष्णुदेव साय यांचे नाव राज्याबाहेरच्या जनतेला फारसे माहीतही नव्हते. बिहारमधील युवा भाजपा नेते नितीन नबीन यांची भाजपाचे नवे कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड करत भाजपाच्या नेतृत्वाने पक्षातील प्रामाणिक, समर्पित आणि निष्ठावान कार्यकर्त्यांना संधी देण्याच्या आपल्या याच धोरणाचा परिचय करून दिला आहे. मोदी आणि शाह यांनी पक्षाचे नवे अध्यक्ष म्हणून नितीन नबीन यांची निवड कशी केली, याचे उत्तर राजधानी दिल्लीतील राजकीय वर्तुळाला तसेच माध्यमातील लोकांना अजूनही मिळाले नाही आणि बहुधा ते शेवटपर्यंत मिळणारही नाही. याचेच उत्तर दिग्विजयसिंह यांनी एक छायाचित्र एक्सवर पोस्ट करत देण्याचा प्रयत्न केला, असे म्हणावे लागेल. यातून त्यांनी रा. स्व. संघ आणि भाजपाच्या कार्यपद्धतीचाही गौरवपूर्ण उल्लेख केला, तसेच काँग्रेस पक्षात अशी कार्यपद्धती नसल्याबाबत खेदही व्यक्त केला, असे म्हणावे लागेल. त्यामुळेच काँग्रेसने आपल्या कार्यपद्धतीत सुधारणा करावी, तसेच अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्याचा सल्लाही दिला. सध्या काँग्रेस पक्षात अधिकारांचे केंद्रीकरण झाले असल्याचा टोला, यातून त्यांनी मारला आहे. मल्लिकार्जुन खडगे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत, पण पक्षात कोणताच निर्णय खडगे यांना आपल्या अधिकारात घेता येत नाही, प्रत्येक निर्णयासाठी त्यांना राहुल गांधी यांची परवानगी घ्यावी लागते. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निर्णय घेण्याचा अधिकार खडगे यांना मिळाला तर पक्षाचे आज जेवढे नुकसान होत आहे, तेवढे कदाचित झाले नसते.

राहुल गांधींना राजकीय अनुभव नाही आणि समज तर त्याहून नाही. त्यामुळेच दिग्विजयसिह यांच्यासारखे नेते आता उघडपणे बोलू लागले. खरं म्हणजे याची सुरुवात पाच सहा वर्षांपूर्वी काँग्रेसमधील 'जी २३' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गटाने एक पत्र पाठवून केली होती. पण नंतर 'जी २३' मधील बहुतांश नेते फार काळ आपल्या भूमिकेवर ठाम राहू शकले नाहीत. यातील काही नेत्यांना काँग्रेस नेतृत्वासमोर शरणागती पत्करावी लागली.

नंतर काँग्रेसमध्ये शशी थरूर यांनी आवाज उठवला. राहुल गांधी रा. स्व. संघ आणि भाजपाच्या कार्यपद्धतीवर हल्ला चढवत असताना काँग्रेसमधील काही नेते रा. स्व. संघ आणि भाजपाच्या कार्यपद्धतीची प्रशंसा करतात, यातून राहुल गांधी यांनी काय ते समजून घ्यायला पाहिजे. खरं बोलायला हिंमत लागत असते, ती हिंमत काँग्रेसमध्ये आज शशी थरूर, दिग्विजयसिंह आणि रशीद अल्वीसारखे नेते दाखवत आहेत, त्यामुळे त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. काँग्रेस नेते रशीद अल्वी यांनी काँग्रेसच्या दुर्दशेला पक्षाचे नेतृत्व जबाबदार असल्याचा आरोप केला. काँग्रेस नेत्यांचा रोष सोनिया गांधींपेक्षा राहुल गांधींवर जास्त आहे. याला राहुल गांधींची कार्यशैली जबाबदार आहे. ते पक्षातील नेत्यांना भेटत नाही. रशीद अल्वी यांनी हाच आरोप केला आहे. त्यामुळेच काँग्रेसचे नेतृत्व प्रियांका वढेरा यांच्याकडे सोपवण्याची मागणी केली जात आहे.

काँग्रेसच्या नेतृत्वाला घरचा अहेर करताना रशीद अल्वी यांनी रा. स्व. संघाची प्रशंसा केली. रा. स्व. संघ हे मजबूत संघटन आहे आणि संघामुळेच भाजपा सत्तेवर आहे, असे अल्वी म्हणाले. काँग्रेसच्या नेत्यांनी रा. स्व. संघ आणि भाजपाच्या कार्यपद्धतीची तसेच संघटनशक्तीची प्रशंसा करण्याची ही पहिलीच वेळ नाही. कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी विधानसभेत रा. स्व. संघाची प्रार्थना म्हणून दाखवली होती. नंतर त्यांनी यासाठी माफी मागितली, हा भाग वेगळा. कर्नाटकमधील काँग्रेसचे अन्य एक आमदार एच. डी. रंगनाथ यांनीही शिवकुमार यांच्यानंतर संघाची प्रार्थना म्हटली. विशेष म्हणजे या प्रार्थनेत गैर काही नाही, यात मातृभूमीची स्तुती आहे, असे ते म्हणाले होते. ओडिशातील ज्येष्ठ काँग्रेस नेते, माजी मंत्री आणि विधानसभेचे माजी सभापती किशोर पटेल यांनीही संघाची प्रशंसा केली होती. संघ १०० वर्षांपासून हिंदुत्वाचे रक्षण तसेच चरित्रनिर्माणाचे काम करत आहे, असे सांगत पटेल यांनी संघ स्वयंसेवकांमधील शिस्त, समर्पण आणि देशभक्तीच्या भावनेची स्तुती केली होती. मध्यप्रदेशमधील काँग्रेस आमदार भेरोसिंह परिमार यांनीही रा. स्व. संघाशी आपले जुने संबंध असल्याचा दाखला दिला होता. सध्या तेलंगणाचे मुख्यमंत्री असलेले काँग्रेसचे नेते रेवंथ रेड्डी विद्यार्थिदशेत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते होते. जो कधीकाळी संघाच्या संपर्कात आला, तोच संघाची प्रार्थना म्हणू शकतो, संघाशी ज्याचा दूरदूरपर्यंत संबंध नसतो, तो कधीच ही प्रार्थना म्हणू शकत नाही. त्यामुळे राहुल गांधी संघावर टीका करत असताना त्यांच्या काँग्रेस पक्षातील काही नेते संघाची जाहीरपणे प्रशंसा करतात, हे अतिशय बोलके म्हणावे लागले. ■

९८८१७१७८१७

## माणसाच्या निष्काळजीपणाचे भयावह दर्शन

नाणूस, वाळपई येथील 'जय श्रीराम अखिल गोमंतक गोसंवर्धन केंद्रात' घडलेली घटना समाजाला अंतर्मुख करणारी आहे. एका गायीच्या पोटातून तब्बल ४८ किलो ३०० ग्रॅम प्लॅस्टिक, पीव्हीसी पाईपचे तुकडे, चामड्याचा पट्टा, जुने रेनकोट, कापड, नायलॉन दोऱ्या व धातूची वायर शस्त्रक्रियेद्वारे काढण्यात आली. गोव्यातील अशा प्रकारची ही पहिलीच विक्रमी शस्त्रक्रिया मानली जात आहे.

रस्त्यावर टाकलेला कचरा, विशेषतः प्लॅस्टिकमध्ये गुंडाळलेले अन्न, गायी नकळत खातात आणि त्याचे दुष्परिणाम त्यांच्या जीवावर बेततात, याचे हे जिवंत उदाहरण आहे. या यशस्वी शस्त्रक्रियेमुळे गायीचा जीव वाचला असला, तरी मानवी निष्काळजीपणा आणि प्लॅस्टिक कचऱ्याचे वाढते संकट यावर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. ही घटना केवळ एका गायीपुरती मर्यादित नसून, पर्यावरण संरक्षण, कचरा व्यवस्थापन आणि मूक प्राण्यांबद्दलची आपली जबाबदारी याची जाणीव करून देणारी आहे. रस्त्यावर कचरा टाकणे थांबवणे आणि प्लॅस्टिकचा वापर कमी करणे, हाच अशा दुर्दैवी घटनांना आळा घालण्याचा खरा मार्ग आहे.

**रमा देशमुख**/नागपूर

●● ●●

## राजकारणाचा चोथा

महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी अर्ज भरणे प्रक्रिया नुकतीच संपली. या आधी कधी नव्हे तितका तमाशा हौशी कार्यकर्त्यांकडून आपण बघतो आहोत. जवळपास सर्वच मोठ्या पक्षांमध्ये तिकीट नाकारल्यावरून तुफान राडा सुरू आहे. कुणी ए-बी फॉर्मकरिता पाठलाग करतो, कुणी पदाधिकाऱ्याला अर्वाच्च भाषेत बोलतो, कुणी पक्ष कार्यालयातच उपोषणावर बसतो तर कुणी रडतो, आत्महत्येची धमकी देतो. हा आहे आजच्या राजकारणाचा स्तर! खरं तर राजकारणाच्या माध्यमातून समाजाची, देशाची सेवा करण्याची संधी मिळते. खरंच तिकिटाची अपेक्षा असणाऱ्यांना किंवा तिकीट वाटप करणाऱ्याला याचे भान आहे? नाही, इतका उदात्त विचार तर सोडाच निवडून पारखून कुणाला तिकीट मिळते आहे?, ज्यांच्याकडे प्रचंड माया आहे, गुन्हेगारी इतिहास आहे आणि चापलुसी करण्याची क्षमता आहे हेच सध्याच्या परिस्थितीवरून उघड होत आहे. हा प्रकार असाच सुरू राहिला तर पुढील काही निवडणुकांत तिकीट नाकारल्यास एकतर तिथेच जीव देतील किंवा पदाधिकाऱ्यांना जीवे मारतील. हा सर्व प्रपंच सेवा नव्हे मेवा खाऊन पिढ्यानं पिढ्यांसाठी माया जमाविण्याचा मार्ग दिसतो. कुठल्याच पक्षांकडे यासाठी मार्गदर्शक तत्त्वे नाहीत, प्रामाणिक आणि निष्ठावान कार्यकऱ्यांना न्याय देण्याची योजना नाही. होय, जनतेला मतदानातून निवडण्याचा अधिकार आहे पण एकंदरीत निवडणूक प्रक्रियाच संशयाच्या भोवऱ्यात आहे. सामान्य जनतेचा आता विश्वासच राहिला नाही. नुसताच धिंगाणा सुरू आहे आपल्या महाराष्ट्रात. ये कहाँ आ गये हम... काय म्हणावे?

**प्रा. विलास डोईफोडे**/सावनेर

●● ●●

## वाचक पत्रे



## इंग्रजी नववर्ष बदल, कॅलेंडरचा की माणसाचा

इंग्रजी नववर्षाचे आगमन होताच शहरापासून ग्रामीण भागापर्यंत जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. आतषबाजी, शुभेच्छा, सोशल मीडियावर संदेशांची रेलचेल दिसून आली. मात्र या उत्सवामागे एक प्रश्न उपस्थित होत आहे इंग्रजी नववर्षात खरंच काही नवीन बदल होतो का?

नववर्षाच्या पहिल्याच दिवशी अनेक नागरिकांकडून नवीन संकल्प जाहीर केले जातात. आरोग्य, शिक्षण, वेळेचे नियोजन, कुटुंबाला अधिक वेळ देण्याचे संकल्प घेतले जातात. मात्र काही दिवसांतच हे संकल्प विसरले जात असल्याचे चित्र नेहमीच दिसून येते. नववर्ष हा केवळ कॅलेंडरवरील बदल असून तो स्वतःहून कोणताही सामाजिक किंवा वैयक्तिक बदल घडवत नाही. शेतकरी, कामगार, बेरोजगार युवक तसेच सामान्य नागरिकांचे प्रश्न नववर्षाच्या आगमनाने आपोआप सुटत नाहीत. बदल घडण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आणि जबाबदार कृती आवश्यक आहे. काही नागरिक नववर्षाकडे सकारात्मक संधी म्हणून पाहत आहेत. मागील चुका सुधारण्याचा, जीवनशैलीत सुधारणा करण्याचा आणि समाजासाठी उपयुक्त उपक्रम राबवण्याचा निर्धार अनेकांनी व्यक्त केला आहे. सामाजिक कार्यकर्त्यांच्या मते, नववर्षाचा खरा अर्थ केवळ उत्सव साजरा करण्यात नसून, विचार, वर्तन आणि जबाबदारीत सकारात्मक बदल घडवण्यात आहे. नववर्षात जर संवेदनशीलता, प्रामाणिकपणा आणि माणुसकी वाढली, तरच तो बदल खरा ठरेल. एकूणच इंग्रजी नववर्षात बदल होतो तो कॅलेंडरवर मात्र खरा बदल माणसाच्या विचारात आणि कृतीत झाला, तरच नववर्षाला खरा अर्थ प्राप्त होतो. ■

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### दगडाने हल्ला केल्याप्रकरणी तिघे जखमी

**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

जुना हिरज नाका, निराळे वस्ती परिसरात घरातील सामानाची नासधूस केल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका तरुणाने दगडाने हल्ला करून तिघांना जखमी केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत उस्मान अल्लाऊद्दिन जमादार वय ५७, रा. रामवाडी, सोलापूर यांनी फिर्याद दिली असून जावीद सर्कोद्दिन रा. जुना हिरज नाका, निराळे वस्ती, सोलापूर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी हे त्यांच्या मुलीच्या घरातील सामानाची नासधूस केल्याबाबत तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्याकडे जात असताना आरोपीने फिर्यादीची मुलगी रेश्मा हिच्यावर मारहाण करण्याचा प्रयत्न केला. यावेळी हस्तक्षेप करणाऱ्या फिर्यादीचा मुलगा वसीम याच्या डोक्यात आरोपीने दगड मारून जखमी केले आहे. तसेच विठ्ठलसिंग विटे यांना शिवीगाळ करत दगडाने नाकावर मारल्याने त्यांच्या नाकातून व तोंडातून रक्तस्राव झाला. याशिवाय फिर्यादी उस्मान जमादार यांनाही आरोपीने लाथाबुक्यांनी मारहाण करून त्यांच्या उजव्या खांद्याला मुकामार लागला आहे.ही घटना दि. २८ डिसेंबर रोजी मध्यरात्री जुना हिरज नाका, निराळे वस्ती येथे घडली असून सदर गुन्हा दि. २९ डिसेंबर रोजी पहाटे १.२५ वाजता दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार खाटमोडे करीत आहेत.

### विवाहितेच्या छळप्रकरणी पतीसह चौघांविरोधात गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

विजापूर नाका पोलीस ठाण्यात विवाहित महिलेस हुंड्यासाठी मानसिक व शारीरिक छळ केल्याप्रकरणी पतीसह सासरच्या चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत फिर्यादी अश्विनी अमोल चव्हाण वय २९ वर्षे, सध्या रा. कमला नगर, विजापूर रोड, सोलापूर हे दि. २१ मे २०१९ पासून आजतागायत आरोपींनी तिला पाच लाख रुपयांच्या हुंड्यासाठी सातत्याने त्रास दिला. हुंड्याची मागणी पूर्ण न झाल्याने आरोपींनी तिचा मानसिक व शारीरिक छळ केला असल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. तसेच हुंड्यासाठी हाताने, लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ करण्यात आली असून, जीवे ठार मारण्याची धमकीही देण्यात आल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या प्रकरणी आरोपी अमोल चव्हाण पती, मायाबाई चव्हाण सासू, ज्ञानेश्वर चव्हाण सासरे, तसेच नणंद प्रियंका सर्व रा. इंद्रप्रस्थ हौसिंग सोसायटी, सागुर्डी फाटा, देहु, पुणे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याची नोंद दि. २९ डिसेंबर रोजी रात्री ८.३१ वाजता करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस हवालदार जाधव हे करीत आहेत.

### भरधाव ट्रकची दुचाकीस धडक; चालक फरार

**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

मडकी वस्ती परिसरात भरधाव ट्रकने दुचाकीस पाठीमागून धडक दिल्याची घटना दि. २८ डिसेंबर रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास घडली. या अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला असून ट्रकचालक तेथून फरार झाला आहे. याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी विजयकुमार भोजप्पा घोडके वय ४२, रा. मडकी वस्ती, भवानी पेठ, सोलापूर हे रुपाभवानी येथे दर्शन घेऊन दुचाकी क्रमांक एमएच १३ बीवाय २७३५ वरून घरी जात असताना मडकी वस्ती परिसरात मागून येणाऱ्या ट्रक क्रमांक केए ३२ एए ४०४९ च्या चालकाने भरधाव वाहन चालवत दुचाकीस धडक दिली. या अपघातात फिर्यादीच्या डोक्यास गंभीर दुखापत झाली असून नाकास तसेच दोन्ही हात व गुडघ्याला मार लागला आहे. मात्र ट्रकचालकाने जखमीला मदत न करता घटनास्थळावरून पलायन केले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल गायकवाड हे करीत आहेत.

# वळसंगमध्ये एकाचा खून; परिसरांत तणाव

## आरोपी स्वतःहून पोलीसांत दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग ३१ डिसेंबर :**



लक्ष्मण वाघमारे





वळसंग (ता.दक्षिण सोलापूर) येथे दि.३१ डिसेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास पोटात धारदार शस्त्राने भोसकून तसेच डोक्यात दगड मारून एकाची निर्घुण हत्या करण्यात आली. या हत्येमुळे वळसंग शिवारात एकच खळबळ उडाली आहे.

लक्ष्मण वाघमारे (वय-३३) असे मृताचे नाव आहे. वळसंग येथील श्री सिद्धरामेश्वर मंदिराच्या चौकात घरगुती कारण तसेच नशेच्या धुंदीत आरोपी रवी फुटके (वय ३७) याने धारदार शस्त्राने तसेच दगडाने वार करून लक्ष्मण वाघमारे यांची जागीच हत्या केली. हत्या करून स्वतःच वळसंग पोलीस स्टेशन येथे तो हजर झाला. सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल डोंगरे यांनी घटनास्थळी भेट देत तपास सुरू केला. अक्कलकोटचे उपविभागीय अधिकारी विलास यामावर यांनी पोलीस बंदोबस्त वाढवला आहे.

वळसंग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक डोंगरे करीत आहेत.

हत्येबाबत गावात उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे. ही हत्या तिघांनी केल्याची चर्चा असून एकजण पोलिसांत हजर झाला मात्र अन्य दोघे फरार असल्याचे बोलले जात आहे. तपासाअंतीच खरे कारण समजून या प्रकरणात किती जण सामील आहेत ते समोर येणार आहे.

# समाजविघातक ८३ आरोपींना केले तडीपार

## गुन्हे करणाऱ्या 3 हजार ६31 आरोपींकडून अंतिम बंधपत्र सादर

**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस उप-आयुक्त परिमंडळ कार्यालयाकडून यावर्षामध्ये मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. पोलीस उप-आयुक्त विजय कबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली समाजास घातक ठरणाऱ्या आरोपींवर कठोर पावले उचलण्यात आली आहेत. यामध्ये एकूण ८३ समाजविघातक आरोपींना तडीपार करण्यात आले आहे.

शरीराविषयी गुन्हे करणाऱ्या ३ हजार ६३१ आरोपींकडून सार्वजनिक शांतता राखण्यासाठी एक वर्ष मुदतीचे अंतिम बंधपत्र लिहून घेण्यात आले आहे. गर्दीच्या ठिकाणी संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या २५७ आरोपींकडून चांगल्या वर्तणुकीसाठी तर मालाविषयी गुन्हे करणाऱ्या ४१३ आरोपींकडून अंतिम बंधपत्रे घेण्यात आली आहेत. हातभट्टी दारू विक्री करणाऱ्या २४१ सराईत आरोपींवर कारवाई करून त्यांच्याकडूनही एक वर्ष मुदतीची बंधपत्रे घेतली आहेत. दरम्यान, दारूबंदी अंतर्गत ५ तसेच अन्य एकाने बंधपत्राचे उल्लंघन केल्याने त्याच्यासह एकूण ६ आरोपींना सोलापूर जिल्हा मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आले आहे.

# 'मी सावित्रीबाई जोतीराव फुले' मालिका ५ जानेवारीपासून स्टार प्रवाह वाहिनीवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

महाराष्ट्राच्या इतिहासातील एक तेजस्वी पर्व पुन्हा एकदा छोट्या पडद्यावर जिवंत होणार आहे. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षमय, प्रेरणादायी आणि क्रांतिकारी जीवनावर आधारित 'मी सावित्रीबाई जोतीराव फुले' ही भव्य मालिका ५ जानेवारीपासून सायंकाळी ७.३० वाजता स्टार प्रवाह वाहिनीवर प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. सुप्रसिद्ध अभिनेत्री मधुराणी गोखले क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या भूमिकेत दिसणार असून डॉ. अमोल कोल्हे महात्मा जोतीराव फुले यांच्या भूमिकेत प्रेक्षकांसमोर येणार आहेत.

गेली अनेक वर्षे स्टार प्रवाह वाहिनीने दर्जेदार आणि आशयघन कलाकृतींच्या माध्यमातून महाराष्ट्राचं मनोरंजन करताना समृद्ध इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. राजा शिवछत्रपती, जय भवानी जय शिवाजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या ऐतिहासिक मालिकांनंतर आता 'मी सावित्रीबाई जोतीराव फुले' ही महत्त्वपूर्ण मालिका स्टार प्रवाह प्रेक्षक भेटीस घेऊन येत आहे. साधारणतः दीडशे वर्षांपूर्वी, महिलांना चूल आणि मूल या मर्यादांमध्ये अडकवून ठेवणाऱ्या समाजव्यवस्थेविरोधात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा जोतीबा फुले यांनी ठामपणे एल्गार पुकारला. स्त्रीला विचार करण्याचं आणि स्वतःचं अस्तित्व घडवण्याचं स्वातंत्र्य मिळावं यासाठी या क्रांतिकारी दाम्पत्याने अपार संघर्ष केला. काळाच्या पुढचा विचार करणाऱ्या या विचारवंतांचा जीवनप्रवास मालिकेच्या रुपात उलगडणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रोजेक्टविषयी सांगताना स्टार प्रवाहचे व्यवसाय प्रमुख सतीश राजवाडे म्हणाले, 'रसिकांच्या मनोरंजनासोबतच सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्य स्टार प्रवाह वाहिनी सातत्याने करत आली आहे. आजच्या जगात सर्वत्र स्त्रीपुरुष समानतेची वाटचाल सुरू आहे. देशातील महत्त्वाच्या पदांवर स्त्रिया सक्षमपणे काम करताना दिसतात. परंतु काही काळापूर्वी त्यांची मर्यादा केवळ घर आणि मुलांपर्यंतच होती. ज्या समाजात मुलगी आठ वर्षांची झाली की तिला ''वयात आली'' असे म्हणत तिचे हसणे खेळणे रोखले जाई, जिथे शिक्षण ही फक्त काही विशिष्ट लोकांची मक्तेदारी होती अशा समाजात धैर्याने घराबाहेर पडून शिक्षणाचा मूलभूत हक्क मिळवून देणाऱ्या महात्मा जोतीबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी मोठी क्रांती घडवली. केवळ शिक्षणच नव्हे तर विधवा पुनर्विवाह, बालविवाह, सतीप्रथा अशा अनेक अमानुष रूढींना ठामपणे विरोध करून संतुलित समाज उभारण्याचा त्यांनी प्रयत्न केला. सावित्रीबाई संसार सांभाळून समाजपरिवर्तनाची लढाई लढल्या. त्यांच्यामुळेच आज प्रत्येक स्त्री समाजात मानाने जगू शकते. अशा महान क्रांतीज्योतीची कथा मांडणं क्रमप्राप्त होतं. माझी खात्री आहे की ही मालिका समस्त मालिका विश्वात मैलाचा दगड ठरेल.'

'मी सावित्रीबाई जोतीराव फुले' मालिका नक्की पहा ५ जानेवारीपासून सायंकाळी ७.३० वाजता फक्त स्टार प्रवाहवर.

# अभिप्राय सादर करा; सीईओंना अनुसूचित जाती आयोगाकडून आदेश

## मुख्याध्यापक कट्टीमनी यांचे निलंबन प्रकरण

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

मैंदर्गी (ता.अक्कलकोट) येथील जिल्हा परिषद कन्नड मुलीच्या शाळेचे मुख्याध्यापक महांतेश्वर कट्टीमनी यांच्यावर एक वर्षांपूर्वी झालेल्या निलंबन कारवाई विरोधात अनुसूचित जाती-जमाती आयोगाकडे दाद मागितल्याने आयोगाचे अधिकारी पोलीस निरीक्षक रमेश वळवी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी व प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना त्यांचे अभिप्राय सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

याबाबत जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अनेक विनंती अर्ज दिले. काहीही उपयोग न झाल्याने विभागीय आयुक्त यांच्याकडे दाद मागितली. त्यांच्याकडूनही दाद न मिळाल्याने हे प्रकरण अनुसूचित जाती-जमाती आयोगाकडे दाखल करण्यात आले होते. दरम्यान गेल्यावर्षी सहा जानेवारी २०२५ रोजी सदर मुख्याध्यापकावर नियोजित तक्रार दाखल करण्यास सांगून कुठल्याही प्रकारची चौकशी न करता कारवाई केली गेली आहे. अक्कलकोटचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे यांच्या वागणुकीने जिल्हा परिषदेतील अधिकाऱ्यांना त्रास सहन करावा लागत असल्याचे बोलले जात आहे.


**महापारेषण**
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**जाहीर सूचना**

आपणास कळविण्यात येते की, या विभागीय कार्यालयांतर्गत तांत्रिक व अतांत्रिक बाह्यस्रोत कर्मचारी यांच्या सन २०२५-२०२६ ची निविदा महापारेषण कंपनीच्या संकेतस्थळावर दि. २३.१२.२०२५ रोजी प्रसारित करण्यात आली होती. सदर निविदेची दुरुस्ती (Amendment for SRM E-Tender) करण्यात आलेली असून सदर निविदेची दुरुस्ती (Amendment for SRM E-Tender) कंपनीच्या संकेतस्थळावर पाहण्यात यावी.

सही/-
(श्री. एस. एफ. देशमुख)
कार्यकारी अभियंता
अउदा प्रकल्प विभाग-३, सोलापूर



**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि.कि. अर्ज क्र. ११५/२०२५.
पुढील नेमलेली तारीख :- ११/०२/२०२६ नि.क्र. ५

**बार्शी येथील मा. जिल्हा न्यायाधिश साहेब, यांचे न्यायालयात**

१) **श्रीमती आकांक्षा शेखर केसकर,**
वय - ४२ वर्षे, धंदा - गृहिणी,
रा. ९२८/१/३, फुले प्लॉट, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर ह.मु. फ्लॅट नं. २,
सर्व्हे नं. १२१, जलतरण तलावाजवळ, जुनी सांगवी,
आनंद नगर, पुणे शहर, पुणे.

२) **कु. शार्दुल शेखर केसकर,**
वय - १६ वर्षे, धंदा - शिक्षण,
रा. फ्लॅट नं. २, सर्व्हे नं. १२१,
जलतरण तलावाजवळ, जुनी सांगवी,
आनंद नगर, पुणे शहर, पुणे.
तर्फे अज्ञान पालनकर्ती आई अर्जदार क्र. १

— **अर्जदार**

विरुध्द

**महाराष्ट्र शासन** - **सामनेवाला**

ज्याअर्थी डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी बार्शी म्यु.पल हद्दीतील सि.स.नं. ७२५/१/२१ याचे एकूण क्षेत्र ६७३.५० चौ.मी. पैकी अर्जदार क्र. १ व २ व अर्जदार क्र. १ चा मोठा मुलगा आर्यन यांचे हिश्यास ७४.८३ चौ.मी. एवढी मिळकत कायद्याने येते. वर नमुद मिळकतीपैकी अविभक्त क्षेत्र २४.९४ चौ.मी. एवढी जागा अर्जदार क्र. २ शार्दुल शेखर केसकर याचे नावे असून, सदर मिळकत अर्जदार क्र. १ यांनी त्यांचे अज्ञान मुलाचे अन्न, वस्त्र, निवारा व शिक्षण देण्याकरीता व भविष्याचे योग्य संगोपनाकरीता विक्री करण्याचे ठरविल्याने कु. शार्दुल हा अज्ञान असल्याने अर्जदार क्र. १ आकांक्षा शेखर केसकर या कु. शार्दुल याची नैसर्गीक पालक असल्याचे जाहीर होऊन मिळणेकरीता व कु. शार्दुल याचा सि. स. नं. ७२५/१/२१ या मिळकतीतील अविभक्त हिस्सा विक्री करण्याकरीता मे. न्यायालयाची परवानगी मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाबाबत कोणाची कसलीही हरकत, तक्रार असल्यास त्यांनी सदर प्रकरणात प्रसिध्दीपासून ३० दिवसाच्या आत किंवा पुढील नेमलेल्या दि. ११/०२/२०२६ या तारखेस न्यायालयात हजर राहुन कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा कोणाची कसलीही हरकत नाही असे समजुन सदर प्रकरणी न्यायालय पुढील योग्य ते निर्णय पारीत करतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले असे. दि. ३०/१२/२०२५

सही/-
कनिष्ठ लिपीक
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी



**जाहीर नोटीस**

सर्वत्रास विशेषतः तालुका बार्शी व पांगरी भागातील सर्व लोकांस, जाहीर नोटीस देणेस सांगितलेवरुन, जाहीर नोटीस देणेत येते की,

जि. सोलापूर, पोट तुकडी व ता. बार्शी पैकी मौजे पांगरी हद्दीतील गट नं. ४५१ क्षेत्र हे ३.८९ आर आकार रुपये ५.४० पैसे यापैकी चंदू शामराव पवार यांचे नावे ७७ आर + अनिता युवराज शिंदे, दत्तात्रय मम्मा पवार वगैरे यांचे सामाईक नावे ७७ आर + गोपीनाथ शंकर पवार यांचे नावे ७७ आर एकूण क्षेत्र हे २.३१ आर बागायत जमीन तदंगभूत वस्तू वहीवाटीचे हक्कासह,

वरील जमीन नमुद मालकांनी विक्रीस काढली आमचे अशील व त्यांचेमध्ये जमीनीचे खरेदीविषयी बोलणी होऊन तसा ठराव, करार झालेला आहे; त्यांनी इसार घेतला आहे. त्याप्रमाणे आमचे अशील जमीन रजि. खरेदी करणार आहेत.

तरी वर नमूद जमीनीचे मालकी, कब्जे, वहिवाट, बँक व खासगी कर्जबोजा, दान, गहाण, टाच, लीन, लीज, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र पोटगी इ. किंवा तत्सम स्वरूपात कोणाचेही कसलेही कायदेशीर हक्क, अधिकार असतील तर त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांचे आत त्यांचे कायदेशीर हक्क, अधिकाराची कागदपत्र पुराव्यानिशी खातरजमा करून द्यावी नसता सदर जमीन ही निर्वेध, निजोखमी, बिनबोजाचे आहे, त्याबद्दल कोणाचेही कसलेही हक्क अधिकार नाहीत, असलेस त्यांनी ते स्वतःहून कायमस्वरूपी सोडून दिले आहेत, असे समजून खरेदी व्यवहार पूर्ण करतील मग नमूद मुदतीनंतर कोणाचीही कसलीही हरकत, तक्रार चालणार नाही, विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे, ही जाहीर ३१/१२/२०२५

सही/-
ॲड. श्री. एस. एस. कोकाटे
(ॲडव्होकेट व नोटरी),
ॲड. श्री. घेवारे केदार एन.
जिल्हा व सत्र न्यायालय,
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर



**मुळ रजि. खरेदीखत हरवले बाबतची जाहीर नोटीस**

तमाम लोकास विशेषतः बार्शी शहर तथा ता बार्शी, जि. सोलापूर व शहर बार्शी व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, सौ. शैलजा मारुती जगताप, यांच्याकडून मौजे बार्शी येथील जुना गट नं. ८१२ याचा नवीन गट नं. ८१८ त्यापैकी प्लॉट नं. ४ पैकी पश्चिम बाजूचा प्लॉट याचे क्षेत्रफळ ६९.७० चौमी. यामध्ये ४९.०८ चौमी बांधकाम याबाबतचा रजि. खरेदीदस्त नं. १८१/२०१२/बरस, दि. १२/०१/२०१२ हा मूळ दस्त व त्याची सूची २ व पावती बार्शी बसस्टॅन्ड येथील परिसरात बँकेच्या कामासाठी जात असताना दि. २८/१२/२०२५ रोजी दुपारी १२.३० वा. च्या सुमारास हरवलेले आहे. त्याबाबत त्यांनी शोधाशोध केली असता सापडून आलेले नाही.

सौ. शैलजा मारुती जगताप यांना सदर जागा कर्ज प्रकरण करून बँकेकडे तारण ठेवण्याकरिता मूळ रजि. खरेदीदस्त नं. १८१/२०१२/बरस, व त्याची सूची २ आवश्यक आहे. परंतु सदर खरेदीखत मूळ दस्त व त्याची पावती, सूची २ हरवल्याने यदाकदाचित कोणास मिळाल्यास खालील दिलेल्या पत्यावरती संपर्क साधून आणून द्यावेत, अथवा आमचे अशील हे मूळ रजि. खरेदीखत दस्त आणि सूची २ ऐवजी दुय्यमप्रत आधारे कर्ज प्रकरण करतील. यदाकदाचित याबाबत कोणाची काही हरकत अथवा त्या प्लॉटबाबत हक्क, हितसंबंध लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसाचे आत आमचे वकिलांना खाली दिलेल्या पत्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा. अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही असे गृहीत धरून सदर मिळकत बँकेकडे तारण ठेवतील, नंतर कोणाची कसलीही हरकत आल्यास आमचे अशीलाच्या व बँकेच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत/फसवणूक होऊ नये या करिता हि जाहीर नोटीस दिली. दि. ३१/१२/२०२५.

अशिल
सौ. शैलजा मारुती जगताप

सही/-
ॲड. कुलदिप संजय क्षीरसागर,
ऑफिस पत्ता :- 'कुलदीप लिगल असोसिएट' गाळा नं. ५९, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉम्प्लेक्स, बार्शी. ता. बार्शी. जि. सोलापूर.
(अशिलातर्फे ॲडव्होकेट)



**डॉ. भाई गणपतराव देशमुख शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले**

**खुली जागा व दोन मजली इमारत भाडे तत्वावर देणेबाबत**

डॉ. भाई गणपतराव देशमुख शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्या., सांगोले. ता. सांगोला. जि. सोलापूर. या संस्थेच्या मालकी हक्काची राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ लगत असलेली व संस्थेच्या वजन काट्याच्या पूर्वेकडील रस्त्यालगतची जागा अंदाजे ४ एकर १० गुंठे व दर्शनी ७५० फुट असलेली खुली जागा एकरमध्ये किंवा गुंठ्यामध्ये किंवा ठराविक मोजमापामध्ये व्यवसायासाठी भाडे तत्वावर देणे आहे.

तसेच संस्थेच्या प्रवेश द्वाराच्या पश्चिमेस संस्थेच्या मालकी हक्काची रस्त्यालगतची दोन मजली आर.सी.सी. इमारत, कारपेट एरिया ३८०० स्क्वे. फुट मॉलसाठी किंवा इतर व्यवसायासाठी योग्य अशी इमारत भाडे तत्वावर देणे आहे.

वरील दोन्ही जागा मागणीचे स्वतंत्र अर्ज डिपॉझिट व मासिक किंवा वार्षिक भाडे इ.सह संस्थेच्या कार्यालयात दि. १०/०१/२०२६ पर्यंत जमा करावेत. जागेसंदर्भातील सर्व माहिती, नकाशे, संस्थेच्या कार्यालयात ११ ते ५ या वेळेत पहावयास मिळतील. खुली जागा व इमारत भाडयाने देणे/अर्ज स्विकारणे अथवा नाकारणे याचे सर्व अधिकार संस्थेने स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

सही/-
कार्यकारी संचालक
डॉ. भाई गणपतराव देशमुख शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्या., सांगोले


### कौटुंबिक वादातून मारहाण

**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

मुरारजी पेठ परिसरात घरातील नासधुसीवरून झालेल्या वादाचे रूपांतर मारहाणीत झाले. फौजदार चावडी पोलीस ठाण्यात परस्परांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत जावेद शफरोद्दिन वजन (वय २६, रा. हाजी हजरत खान चाळ, मुरारजी पेठ) यांनी दि.२८ डिसेंबर रोजी सायंकाळी मुरारजी पेठेत फिर्यादीचा आतेभाऊ खुद्दुस शेख हा घरात झालेल्या नासधुसीच्या कारणावरून वाद घालत असताना हा प्रकार घडला. यावेळी आरोपी मलंग जमादार (रा. रामवाडी, सोलापूर) याने शिवीगाळ करत मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद केले. दुसरा आरोपी वसीम जमादारने फिर्यादीस जखमी केल्याचे म्हटले आहे. दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल खाटमोड करीत आहेत.


**Dr. Bhai Ganpatrao Deshmukh Shetakari Sahakari Soot Girni Ltd., Sangole.**
Sangole, Dist Solapur (413307) Maharashtra
Ph No 8262915456, 94523065608
Mail :- shecospin@gmail.com

**Wanted**

Application are invited for the post of "Accountant" for reputed spinning Mill working with 41616 spindles.

| | |
|---|---|
| **Qualification** | M.Com / B.Com GDC&A |
| **Experience** | Minimum 10 years in spinning mill. |

Please apply within 07 days with full details of qualifications, Experience, salary drawn and expected.

Sd/-
**The Chairman, Vic. Chairman**
Dr. Bhai Ganpatrao Deshmukh Shetakari Sahakari Soot Girni Ltd., Sangole.

**Place :- Sangola**
**Date:- 01/01/2026**



**डॉ. भाई गणपतराव देशमुख शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्यादित, सांगोले**

**गोडावूनसाठी तीन बिल्डींग भाडे तत्वावर देणेबाबत**

डॉ. भाई गणपतराव देशमुख शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्या., सांगोले जि. सोलापूर या संस्थेच्या मालकी हक्काची युनिट नं. १ फॅक्टरी बिल्डींगच्या पाठीमागील बाजूस असलेल्या सहा मीटर उंचीच्या तीन बिल्डींग गोडावूनसाठी भाडेतत्वार देणे आहे. त्यांची साईज खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | लांबी | रूंदी | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| १. | जिनिंग मशिनरी बिल्डींग | ३८ मी. | १० मी. | ३८० स्क्वे.मी. |
| २. | बेलींग प्रेस बिल्डींग | २४ मी. | १० मी. | २४० स्क्वे.मी. |
| ३. | पाला हाऊस बिल्डींग | २४ मी. | ८.५ मी. | २०४ स्क्वे.मी. |

तीन्ही बिल्डींग आर.सी.सी. व विट बांधकामात केल्या आहेत. वरील बाजूस लोखंडी ट्रेसेस व ए.सी. शीट बसविले आहेत. बिल्डींगच्या सभोवती कॉंक्रीटचे पटांगण व रस्ते आहेत. अशा तीन बिल्डींग गोडावूनसाठी भाडे तत्वावर देणे आहे.

वरील बिल्डींग मागणीचे अर्ज, डिपॉझिट व मासिक भाडे इ.सह संस्थेच्या कार्यालयात १०/०१/२०२६ पर्यंत जमा करावेत. बिल्डींगसंबंधी सर्व माहिती, नकाशे संस्थेच्या कार्यालयात ११ ते ५ या वेळेस पहावयास मिळतील. बिल्डींग भाड्याने देणे/अर्ज स्विकारणे अथवा नाकारणे याचे सर्व अधिकार संस्थेने स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

सही/-
कार्यकारी संचालक
डॉ. भाई गणपतराव देशमुख शेतकरी सहकारी सूत गिरणी मर्या., सांगोले



**बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra**
प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**नियम - ८ (१)**
**ताबा सूचना**

याद्वारे, अधोस्वाक्षरीकर्ता, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत बँक ऑफ महाराष्ट्रचा अधिकृत अधिकारी असून, कलम 13 च्या उप-कलम (१२) अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 3 सह वाचन करून प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, दिनांक 13/10/2025 रोजी मागणी सूचना जारी केली होती, ज्यामध्ये खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जामीनदारांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण देय रक्कम परत करण्याची मागणी करण्यात आली होती

कर्जदार रक्कम परत करण्यास अयशस्वी ठरल्यामुळे, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, अधोस्वाक्षरीकर्त्याने कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (4) अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियम, 2002 च्या नियम 8 सह वाचन करून त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, दिनांक 23/12/2025 रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी या मालमत्तांशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तांशी केलेला कोणताही व्यवहार बँक ऑफ महाराष्ट्रच्या वर नमूद केलेल्या रकमेच्या भाराच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्ता सोडवण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- धाराशिव**<br>**कर्जदार -**<br>**1. मे. साई सहारा पशुखाद्य.**<br>त्याच्या मालकाद्वारे प्रतिनिधित्व सौ. अर्चना जीवन पवार मु.पो. रुईभर धाराशिव 413501<br>**2.** श्री.जीवन विठ्ठल पवार मु.पो. रुईभर धाराशिव 413501<br>**3.** माधव उत्तमराव उगिले 130, रो-हाऊस क्रमांक 4, माणिक चौक, धाराशिव | **प्राथमिक सुरक्षा :**<br>स्टॉक आणि खातेपुस्तकातील कर्जांचे गहाण.<br>**तारण सुरक्षा:**<br>श्री. जीवन विठ्ठल पवार यांच्या मालकीच्या, ग्रामपंचायत घर क्रमांक 1028, रुईभर, धाराशिव येथील निवासी मालमत्तेचे नोंदणीकृत गहाणखत. मालमत्तेचे क्षेत्रफळ 202.41 चौरस मीटर आहे.<br>**चतुःसीमा खालीलप्रमाणे:** - पूर्व - रस्ता, पश्चिम - जीवन विठ्ठल पवार यांची मालमत्ता, दक्षिण - निलावती वडवले, उत्तर :- उस्मानाबाद बेंबळी रस्ता | **मागणी सूचना:**<br>दिनांक: 13/10/2025.<br>**खात्यातील शिल्लक:**<br>रु. 24,29,196.92/- + न लावलेले व्याज : रु. 74,000.08/- एकूण: रु. 25,03,197.00/- (पंचवीस लाख तीन हजार एकशे सत्याण्णव रुपये फक्त)<br>**सांकेतिक ताबा दिनांक :**<br>23/12/2025 |

ठिकाण - सोलापूर
दिनांक - २३/१२/२०२५

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि
प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# अर्जुन एरिगासीला विश्वकांस्यपदक

## जागतिक ब्लिट्झ बुद्धिबळ

## कार्लसनला विक्रमी ९वे विश्वविजेतेपद

◆ **दोहा, ३१ डिसेंबर**

जागतिक ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेत नॉर्वेच्या मॅग्नस कार्लसनने विक्रमी नववे विजेतेपद पटकावले. स्पर्धेच्या सुरुवातीच्या फेऱ्यांमधील पराभवानंतर आपले जेतेपद कायम राखत कार्लसनने विक्रमी नववे विजेतेपद जिंकले.

प्रथम विश्वमानांकित कार्लसनने विजेतेपदाच्या लढतीत उझबेकिस्तानच्या ग्रॅण्डमास्टर नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्हला २.५-१.५ ने पराभूत करून, गत आठवड्यात जिंकलेल्या विश्व जलद सुवर्णपदकात ब्लिट्झ विजेतेपदाची भर घालत पुन्हा एकदा आपल्या अखरेच्या डावातील प्रतिभेचे दर्शन घडवले.

१९ फेऱ्यांच्या पात्रता स्विस फेरीत निर्दोष कामगिरी करणाऱ्या भारतीय ग्रॅण्डमास्टर अर्जुन एरिगासीला उपांत्य फेरीत मोठ्या निराशेचा सामना करावा लागला व त्याला जागतिक ब्लिट्झ स्पर्धेत कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. २२ वर्षीय अर्जुन एरिगासीने मिळवलेल्या तिसऱ्या स्थानामुळे त्याला केवळ ब्लिट्झ आणि रॅपिड कांस्यपदकच मिळाले नाही, तर तो महान विश्वनाथन् आनंदनंतर जागतिक ब्लिट्झ पदक जिंकणारा भारताचा दुसरा पुरुष बुद्धिबळपटू ठरला.





१९व्या फेरीत अब्दुसत्तोरोव्हविरुद्धच्या बरोबरीमुळे कार्लसन (१३.५ गुण) आणि उझबेक खेळाडू (१३ गुण) या दोघांनी मंगळवारी उपांत्य फेरीत शेवटची दोन स्थाने मिळवली, तर एरिगासी (१५ गुण) आघाडीवर होता आणि दुसऱ्या स्थानी अमेरिकन जीएम फॅबियानो कारुआना (१४ गुण) होता. त्यानंतर कार्लसनने कारुआनाला ३-१ ने हरवून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले, तर अब्दुसत्तोरोवने एरिगासीवर उपांत्य फेरीत २.५-०.५ असा निर्णायक विजय मिळवला.

ही माझ्यासाठी खूप कठीण स्पर्धा होती. निकाल काहीही लागला असता, पण जेव्हा आम्ही बाद फेरीत पोहोचलो, तेव्हा मी विचार केला की मी याचा खरोखर आनंद घेतला पाहिजे, आणि तेच कामी आले, असे रॅपिड आणि ब्लिट्झ दोन्हीमध्ये सुवर्णपदक जिंकलेल्या कार्लसनने फिडेल सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

### पंतप्रधान मोदींनी केले एरिगासीचे कौतुक

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी भारतीय ग्रॅण्डमास्टर अर्जुन एरिगासीचे दोहा येथे झालेल्या जागतिक ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेत कांस्यपदक जिंकल्याबद्दल अभिनंदन केले . हे यश या खेळात देशाने केलेल्या जलद प्रगतीचे प्रतिबिंब असल्याचे मोदी यांनी म्हटले.

'बुद्धिबळात भारताची प्रगती सुरूच आहे! दोहा येथील जागतिक ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेत कांस्यपदक जिंकल्याबद्दल अर्जुन एरिगासीचे अभिनंदन, त्याने अलीकडेच विश्व जलद बुद्धिबळ स्पर्धेतही कांस्यपदक जिंकले होते. त्याचे कौशल्य, संयम आणि आवड अनुकरणीय आहे. त्याचे यश आपल्या तरुणांना प्रेरणा देत राहील. त्याला माझ्या खूप खूप शुभेच्छा, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. पंतप्रधानांनी रविवारी ओपन आणि महिला गटात अनुक्रमे जागतिक रॅपिड कांस्यपदक जिंकल्याबद्दल एरिगैसी आणि ग्रँडमास्टर कोनेरू हम्पी यांचे अभिनंदन केले होते. हम्पीने २०१९ मध्ये पहिले जागतिक जलद बुद्धिबळ विजेतेपद जिंकले होते व गत वर्षी हीच कामगिरी पुन्हा केली होती.



## नू.म.वि. शिशु शाळेमध्ये क्रीडा महोत्सव उत्साहात

**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

नू.म.वि. शिशु शाळेमध्ये क्रीडा महोत्सव उत्साहात साजरा करण्यात झाला. ह.दे. प्रशालेचे क्रीडा पर्यवेक्षक भानुदास बनसोडे, शाळा समितीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन, मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी व्यासपीठावर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते क्रीडा ज्योतीचे उद्घाटन झाले.

मुख्याध्यापिका कुलकर्णी यांनी प्रास्ताविकातून खेळाचे महत्व, उपलब्ध साहित्यातून विद्यार्थ्यांनी खेळावे असे खेळ क्रीडा महोत्सवाच्या निमित्ताने शाळेत घेणार आहोत, यातून मुले आनंदी समाधानी आणि शारीरिक हालचालीमुळे होणाऱ्या खेळातून शारीरिक वाढ याचे महत्त्व सांगितले. प्रमुख पाहुण्यांनी मैदानी खेळ व आहाराबद्दल विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

देशभक्तीपर गीतांवरती सर्व विद्यार्थ्यांनी कवायतीचे प्रकार सादर केले. रंगीबेरंगी फुगे आकाशात सोडून क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन संपन्न झाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्पर्धा प्रमुख कांचन कुलकर्णी आणि अंकिता कुलकर्णी आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकिता कुलकर्णी यांनी केले.

## एमआयटी 'व्हिजिएस तरंग' क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात व्हीजिएस सोलापूरचे यश



**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

एमआयटी 'व्हिजिएस तरंग २०२५' या शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलने यश संपादन केले. सांस्कृतिक विभागात मोनोक्ट स्पर्धेत विराट रूपनार याने प्रथम क्रमांक व कीर्तिराज शिंदे याने उपविजेतेपद मिळवले. ४०० मीटर धावणेत हर्षल नागणे प्रथम तर श्रावणी चटके ही द्वितीय आली. २०० मीटर स्पर्धेत वीरा भोंगे हिने द्वितीय स्थान मिळविले. एकल गायन स्पर्धेत श्रावणी साळुंके हिने प्रथम क्रमांक मिळवला. सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे पारितोषिक वितरण प्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे, टी-२० क्रिकेट विश्वचषक विजेत्या दृष्टीहीन भारतीय महिला संघाच्या उपकर्णधार गंगा कदम व माईर्स एमआयटी संस्थेच्या विश्वस्त व म हासचिव आणि एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती चाटे-कराड, संचालक राघवेंद्र चाटे, स्ट्रॅटेजी अँड ऑपरेशन्स यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका रेखा पाटील यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले.

## अक्कलकोटमध्ये १९ जानेवारीपासून राज्य सॉप्टबॉल स्पर्धा

**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान अक्कलकोट व सोलापूर मनपा जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने ज्युनियर मुले व मुली राज्यस्तरीय सॉफ्टबॉल स्पर्धेचे आयोजन १९ ते २१ जानेवारी दरम्यान राजेफत्तेसिंह मैदान अक्कलकोट येथे केले आहे

या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून विविध जिल्ह्यातील सुमारे ९०० खेळाडू पंच, पदाधिकारी, प्रशिक्षक व्यवस्थापक, जिल्हा सचिव उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेसाठी ४ मैदान तयार करण्यात आली आहेत. ही स्पर्धा साखळी व बाद पद्धतीने होणार आहे. या स्पर्धेतील सर्व खेळाडूंची निवास व भोजन व्यवस्था ही श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान यांच्यावतीने करण्यात आलेली आहे.



या स्पर्धेचे आयोजन व नियोजन समितीचे अध्यक्ष श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे नगराध्यक्ष विद्यमान नगरसेवक महेशजी इंगळे, सॉफ्टबॉलचे सचिव प्रा. संतोष खेंडे , उपाध्यक्ष वसीम शेख, मारुती घोडके , खजिनदार गंगाराम घोडके, परमेश्वर व्हसुरे, संचालक श्रीधर गायकवाड, रवींद्र चव्हाण, प्रबुद्ध चिंचोलीकर , संतोष पाटील, प्रशांत कदम, सिताराम भांड, सागर जगझाप, महादेव वाघमारे, समर्थ आहेरवाडी, अनिकेत कांबळे हे करीत आहेत.

## आयर्नमन' डॉ. नवदीप लोकरे यांचा प्रेरणादायी पराक्रम

**बार्शी, दि. ३१ डिसेंबर-**

बार्शी शहराचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्वल करणारा अभिमानास्पद पराक्रम ऑर्थोपेडिक तज्ञ डॉ. नवदीप लोकरे यांनी केला आहे. गोवा येथे नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय 'आयर्नमन ट्रायथलॉन' स्पर्धेत त्यांनी यशस्वी कामगिरी करत बार्शीचे प्रथम डॉक्टर 'आयर्नमन' होण्याचा बहुमान मिळविला आहे.

'आयर्नमन' ही जगातील सर्वात कठीण मानल्या जाणाऱ्या क्रीडा स्पर्धांपैकी एक असून या स्पर्धेची सुरुवात गोवा येथील दमट वातावरणात मिरामार बीच येथून झाली. या स्पर्धेत १.९ कि.मी. समुद्रात पोहणे, ९० कि.मी. सायकलिंग, २१.१ कि.मी. मॅरेथॉन धावणे असा अत्यंत खडतर ट्रायथलॉन प्रकार समाविष्ट होता.





## सिल्व्हर ज्युबिली हायस्कूलमध्ये क्रीडा सप्ताहास सुरुवात

**बार्शी दि.३१ डिसेंबर-**

के.एल.ई. सोसायटी संचलित सिल्व्हर ज्युबिली हायस्कूलमध्ये क्रीडा सप्ताहास सुरुवात झाली. याचे उद्घाटन मुख्याध्यापक अनिरुद्ध चाटी, उपमुख्याध्यापक गोदापुरे, पर्यवेक्षिका सौ.विश्वेकर यांच्या हस्ते झाले. प्रारंभी सहशिक्षिका सौ. वालवाडकर यांच्या हस्ते मैदानाची पूजा करण्यात आली.

त्यानंतर डॉजबॉल, लंगडधाव, लिंबू चमचा, ५० मीटरधावणे, जंपरेस, स्लो सायकल रेस, हॅन्ड क्रिकेट विविध मैदानी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. सामन्यांचे समालोचन सहशिक्षक श्री होनराव, श्री पोमाजी, श्री चौधरी यांनी केले. श्री मुरकुटे यांनी आभार मानले. क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी क्रीडा विभाग प्रमुख हेमंत गाढवे, क्रीडाशिक्षक राहुल मुनाळे, गणेश ऐनापुरे यांचे मार्गदर्शन लाभले.




## राज्य कराटे स्पर्धेत थोरात अकॅडमीला २६ पदके

**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

वर्ल्ड जापनीज शोतोकान कराटे ऑर्गनायझेशन तर्फे लातूर येथे झालेल्या १२ व्या राज्य कराटे स्पर्धेत सोलापूरच्या १८ स्पर्धकानी आपआपल्या वजनी व वयोगटात ६ सुवर्ण, ४ रौप्य व १६ कांस्यपदके अशी २६ पदके पटकवून स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचा सांघिक चषक पटकविला. त्यांना मुख्य कराटे प्रशिक्षिका व आंतरराष्ट्रीय पंच शिहान अनुराधा महादेव थोरात, (ब्लॅक बेल्ट फिफ्थ डिग्री) यांचे मार्गदर्शन लाभले.

**काता व कुमिते या प्रकारातील विजयी स्पर्धक** : सर्वज्ञा व्यंकटेश गुंडेली, शिवप्रिया सिद्राम येलदी, विश्वराज कृष्णदेवराय गरड (२ सुवर्ण ),ऋतुराज सुशांत बामणे, अक्षय अनिल निंबाळकर (रौप्य), राजवीर सुशांत बामणे(कांस्य, रौप्य), विहारिका विशाल पवार, ऋतुजा तुकाराम मळगे (२ कांस्य), आरुषी अमीत कांबळे, अरफा अल्ताफहुसेन जमादार, वेदिका मुकुंद कांबळे, विराज अनिल निंबाळकर, अंजेनेय जगदीश हलकुडे, मयुरेश नरसय्या गुंटूक, वेदांत सचिन खोकले, वेदांत राजेंद्रप्रसाद कुसमा, मनोज प्रसन्न कांबळे, दिलनवाज इलाही पठाण (कांस्य).

## माजी ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू डॅमियन मार्टिन रुग्णालयात

## महत्त्वाचे

### प्रज्वल देवला बंगळुरू ओपनसाठी वाईल्ड कार्ड

**बंगळुरू** : भारतीय टेनिसपटू प्रज्ज्वल देवला ५ ते ११ जानेवारी दरम्यान येथे खेळल्या जाणाऱ्या बंगळुरू ओपन टेनिसच्या १०व्या आवृत्तीसाठी वाईल्ड कार्ड देण्यात आले आहे. प्रज्ज्वल सध्या चांगल्या फॉर्ममध्ये आहे व त्याने गत महिन्यात भुवनेश्वर येथे झालेल्या आयटीएफ वर्ल्ड टेनिस टूर १५ स्पर्धेत पुरुष एकेरीचे विजेतेपद पटकावले होते. बंगळुरू ओपन एटीपी चॅलेंजर स्पर्धेत, विशेषतः माझ्या गृहराज्यात खेळणे हा माझ्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. या स्पर्धेने आम्हाला सातत्याने बलाढ्य आंतरराष्ट्रीय प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध स्वतःची कसोटी घेण्यासाठी जागतिक दर्जाचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे, असे प्रज्ज्वल म्हणाला. प्रज्ज्वलच्या समर्पण व मेहनतीमुळे तो बंगळुरू ओपन २०२६ साठी वाईल्ड कार्ड मिळवण्यास पात्र आहे, असे बंगळुरू ओपनचे स्पर्धा संचालक सुनील यजमान म्हणाले.

### माजी ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू डॅमियन मार्टिन रुग्णालयात

**ब्रिस्बेन** : ऑस्ट्रेलियासाठी ६७ कसोटी सामने खेळलेला माजी क्रिकेटपटू डॅमियन मार्टिन ब्रिस्बेनच्या रुग्णालयात गंभीर अवस्थेत आहे, असे ऑस्ट्रेलियन माध्यमांनी बुधवारी वृत्त दिले. ५४ वर्षीय माजी उजव्या हाताचा फलंदाज गत काही दिवसांपासून आजारी होते, आणि नाईन न्यूजपेपर्सने दिलेल्या वृत्तानुसार, ते कृत्रिम कोमात असून मेनिंजायटीस या आजाराशी झुंज देत आहे. 'डॅमियन मार्टिनसाठी खूप प्रेम आणि प्रार्थना पाठवत आहे. खंबीर राहा आणि लढत राहा, महान खेळाडू. कुटुंबाला प्रेम,' असे माजी कसोटी संघातील सहकारी डॅरेन लेहमनने समाज माध्यमावर लिहिले. डॅमियन मार्टिन यांच्यावर सर्वोत्तम उपचार सुरू आहेत. बरेच लोक त्यांच्या प्रार्थना आणि शुभेच्छा पाठवत आहेत, असे जवळचा मित्र व ऑस्ट्रेलियाचा माजी कसोटी यष्टिरक्षक अॅडम गिलख्रिस्ट म्हणाला. मार्टिन लवकर बरा व्हावा अशी सदिच्छा क्रिकेट ऑस्ट्रेलियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी टॉड ग्रीनबर्ग यांनी व्यक्त केली.

### पाकिस्तानचा शाहीन आफ्रिदी बिग बॅशमधून मायदेशी परतणार

**कराची** : पाकिस्तानचा अनुभवी डावखुरा वेगवान गोलंदाज शाहीन शाह आफ्रिदी बुधवारी ऑस्ट्रेलियातून मायदेशी परतणार आहे. पुढील वर्षीच्या सुरुवातीला भारत आणि श्रीलंकेत होणाऱ्या टी-२० विश्वचषकासाठी त्याच्या उपलब्धतेबद्दल शंका निर्माण झाली आहे. बिग बॅश लीग (बीबीएल) मध्ये ब्रिस्बेन हीट संघाकडून क्षेत्ररक्षण करताना गुडघ्याला दुखापत झाल्यामुळे पीसीबीने शाहीनला लाहोरमधील हाय परफॉर्मन्स सेंटरमध्ये उपचार व पुनर्वसनासाठी बोलावले आहे. बीबीएलमधील पहिल्याच सहभागात संघर्ष करणाऱ्या शाहीनला, श्रीलंकेतील कसोटी सामन्यात क्षेत्ररक्षण करताना झालेल्या दुखापतीनंतर गुडघ्यावर शस्त्रक्रिया करावी लागल्याने २०२१-२२ मध्ये क्रिकेटपासून बराच काळ दूर राहावे लागले होते. मी लवकरच मैदानावर परत येईन, असे शाहीनने म्हटले आहे. शाहीनने ब्रिस्बेन हीटसाठी चार सामने खेळले. दुखापत होण्यापूर्वीच शाहीनचा श्रीलंकेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेसाठी (७-११ जानेवारी) पाकिस्तान संघात समावेश करण्यात आला नव्हता.

### आंद्रे डी ग्रास टाटा मुंबई मॅराथॉनचा सदिच्छादूत

**मुंबई** : दोन वेळा ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता धावपटू आंद्रे डी ग्रासची बुधवारी येथे १८ जानेवारी रोजी होणाऱ्या टाटा मुंबई मॅराथॉनच्या २१ व्या आवृत्तीसाठी आंतरराष्ट्रीय कार्यक्रमाचा सदिच्छा दूत म्हणून नियुक्ती करण्यात आली. आपल्या पिढीतील सर्वात यशस्वी धावपटूंपैकी एक असलेल्या डी ग्रासची उपस्थिती व प्रेरणा या वर्ल्ड अॅथलेटिक्स गोल्ड लेबल शर्यतीला लाभणार आहे. आज, डी ग्रास जागतिक अॅथ्लेटिक्समधील दिग्गजांमध्ये गणला जातो, त्याच्या नावावर सात ऑलिम्पिक पदकांची विलक्षण कामगिरी आहे, यात टोकियो ऑलिम्पिकमधील पुरुषांच्या २०० मीटर शर्यतीत व पॅरिस २०२४ मधील ४ बाय १०० मीटर रिलेमध्ये सुवर्णपदकांचा समावेश आहे. 'धावणे शिस्त, आत्मविश्वास व लवचिकता शिकवते. ही मूल्ये शर्यत संपल्यानंतरही तुमच्यासोबत राहतात. टाटा मुंबई मॅराथॉन लोकांना एकत्र आणण्याची, धैर्य वाढवण्याची आणि प्रत्येकाला त्यांच्या ध्येयांच्या दिशेने पहिले पाऊल टाकण्यास प्रोत्साहित करण्याची खेळाची शक्ती दर्शवते,'' असे डी ग्रास म्हणाला.

### तीन भारतीयांचा फिफा पंचांच्या यादीत समावेश

**नवी दिल्ली** : जागतिक फुटबॉल नियामक संस्थेने (फिफा) का महिलेसह तीन भारतीयांचा आपल्या पंचांच्या यादीत समावेश केला आहे, अशी माहिती भारतीय फुटबॉल महासंघाने बुधवारी दिली. गुजरातच्या रचना कमानी यांचा २०२६ साठीच्या फिफा महिला पंचांच्या यादीत समावेश करण्यात आला आहे, तर अश्विन कुमार (पुदुचेरी) आणि आदित्य पुरकायस्थ (दिल्ली) यांचा पुरुषांच्या यादीत समावेश झाला आहे. कुमार आणि पुरकायस्थ यांनी मलेशियातील क्वालालंपूर येथे एएफसी रेफ्री अकादमीचा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे, तर रचना सध्या हाच अभ्यासक्रम करत आहे, असे अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने सांगितले.

## अजित शिंदे महाराष्ट्र खो-खो पुरुष संघाचे सहाय्यक प्रशिक्षक

**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

सोलापूर अॅम्युचर खो-खो असोसिएशनचे सदस्य व पंच मंडळ सदस्य अजित शिंदे यांची महाराष्ट्र पुरुष खो-खो संघाच्या सहाय्यक प्रशिक्षपदी निवड झाल्याचे महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस डॉ. चंद्रजित जाधव यांनी कळविले आहे. त्यांच्या निवडीबद्दल महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे उपाध्यक्ष व जिल्हाध्यक्ष महेश गादेकर यांनी सत्कार केला. यावेळी सोलापूर अॅम्युचर खो-खो असोसिएशनचे उपाध्यक्ष सुनील चव्हाण व सचिव उमाकांत गायकवाड उपस्थित होते. श्री. शिंदे यांनी यापूर्वी राज्य निवड समितीवर तसेच सोलापूर जिल्हा पुरुष संघाचे दोन वेळा प्रशिक्षकपद भूषविले आहे. ते उत्कर्ष क्रीडा मंडळाचे सचिव असुन उत्कर्ष क्रीडा मंडळाच्या खेळाडूंना प्रशिक्षण देत आहेत. बीड येथे १ जानेवारीपासून सुरु होणाऱ्या स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिरात ते महाराष्ट्र संघास मार्गदर्शन करतील. त्यानंतर ११ ते १५ जानेवारी दरम्यान काजीपेठ (तेलंगणा) येथे होणाऱ्या ५८व्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्राचे संघ भाग घेणार आहेत.



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### महात्मा विद्यामंदिरचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**
महात्मा विद्या मंदिर येथे शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या दिपप्रज्वलाने झाली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्था अध्यक्ष शंकर चौगुले, शारदा चौगुले, सविता गायकवाड, चव्हाण, खुळे होते. स्नेहसंमेलनात विविध कार्यक्रम सादर करण्यात आले पारंपरिक वेशभूषेत विविध लोकगीत गोंधळ गीत शेतकरी गीत पोवाडे रिमिक्स गीत लावणी या गाण्यावरती बहारदार नृत्य सादर केले. छावा या गीतावर विद्यार्थ्यांनी सादर केलेले नाटकातील अभिजयाने शिक्षकांची माने जिंकली एका विद्यार्थिनीने आई हे गीत सादर केले. दहावीच्या विद्यार्थ्यांनी मतदान गीतासाठी नाटक सादर केले.



### सोमनाग प्रशालेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**
सुनील नगर येथील सोमनाग प्रशाला येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले प्रतिमेचे पूजन सविता गायकवाड तर कार्यक्रमाचे उद्घाटन संस्था सदस्य नागराज चौगुले यांच्या हस्ते करण्यात आले. वार्षिक स्नेहसंमेलनाची सुरुवात दहावीच्या विद्यार्थिनींकडून श्री गणेशाच्या नृत्याने झाली. यावेळी मुख्याध्यापक शारदा चौगुले यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्था अध्यक्ष शंकर चौगुले, सौरभ चौगुले, अमर चौगुले, रेणुक चौगुले उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक शहाजी नीळ यांनी शाळेच्या प्रगतीचा लेखाजोखा मांडला. आठवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी सादर केलेली छावा चित्रपटातील छत्रपती संभाजी महाराजांचे पात्र सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. अजिंक्य पाटील यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन गुर्रम व सुरवसे आणि दहावी वर्गातील जानकी गायकवाड, गायत्री जहागीरदार, कोंडूर व श्रीवेणी कुचन या विद्यार्थ्यांनी केले.



### मराठी विज्ञान परिषदेमार्फत गणित व्याख्यानाचे आयोजन

**बार्शी, दि. ३१ डिसेंबर-**
गणित विषयाची शालेय स्तरावर आवड निर्माण झाल्यास तो अधिक मनोरंजक पद्धतीने शिकता येतो, असे विचार सुहास हालकुडे यांनी शाह कन्या प्रशालेमध्ये गणित विषयावरील आयोजित व्याख्यानामध्ये व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विज्ञान परिषदेचे अनिल बंडेवार होते. प्रास्ताविक समर्थ क्लासचे संचालक विनायक देशपांडे यांनी केले. या व्याख्यानात संख्यांचे तोंडी वर्ग काढणे, जन्म तारखेवरुन जन्मदिवस सांगणे, घराच्या दरवाजे व खिडक्यांची संख्या सांगणे, सहज आकडेमोड कशी करावी यासारखी गणिती कौशल्ये हालकुडे यांनी विद्यार्थिनींना समजावून सांगितली. विद्यार्थिनींनी अतिशय उत्साहाने यावेळी आपला कृतियुक्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमास सुरेश परदेशी, संस्था सचिव चिन्मय वालवडकर, संचालिका वैष्णवी हातोळकर, उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गणित शिक्षक संदेश घाडगे, ज्योती अग्रवाल, व मराठी विज्ञान परिषदेच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

## निधन वृत्त...

### कमळाबाई वड्डेपल्ली



**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**
रामलाल चौक येथील नरसिंग गिरजी मिल चाळ येथील कमळाबाई रामकृष्ण वड्डेपल्ली यांचे ३१ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९७ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे.

### गौराबाई शिंदे



**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**
महात्मा फुले नगर येथील रहिवासी गौराबाई विठ्ठल शिंदे (वय ६५) यांचे निधन झाले आहे. प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्यामागे मुलगा, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. गुरुवार दि. १ जानेवारी रोजी सकाळी ९.३० वाजता मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार होणार आहेत.

### श्याम बासुतकर



**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**
अशोक चौक, भाजी मार्केटमधील बोली मंगल कार्याजवळील रहिवाशी श्याम मल्लिकार्जुन बासुतकर (वय ७३) यांचे दि. ३१ डिसेंबर रोजी १२.४० वाजता दीर्घ आजाराने रुग्णालयात निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, चार मुली, सुना, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

# श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर जतन व संवर्धन कामांचा घेतला आढावा

### मंदिर समिती सदस्यांनी केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३१ डिसेंबर -**
श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिर व पंढरपूर शहरातील परिवार देवतांच्या मंदिरांचे जतन, संवर्धन व जिर्णोद्धाराची कामे शासन निधीतून पुरातत्व विभागामार्फत दि. १६ डिसेंबर २०२३ पासून सुरू करण्यात आली आहेत. सदर आराखड्यातील पहिल्या टप्प्यातील विठ्ठल गाभारा, रूक्मिणी गाभारा, बाजीराव पडसाळी तसेच विठ्ठल सभामंडप येथील कामे पूर्णत्वास आली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

आराखड्यातील सर्व कामे गुणवत्तापूर्ण व विहित कालावधीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने दिनांक ३० डिसेंबर रोजी मंदिर समिती, पुरातत्व विभाग व ठेकेदार यांच्या समवेत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अनुषंगाने मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या समवेत सुरू असलेल्या व प्रस्तावित कामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

यावेळी कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, प्रभारी व्यवस्थापक संदेश भोसले, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख पृथ्वीराज राऊत, संजय कोकीळ, बलभिम पावले, वास्तुविशारद श्रीमती तेजस्विनी आफळे तसेच संबंधित ठेकेदारांचे प्रतिनिधी उपस्थित होते. श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरातील व परिसरातील परिवार देवतांच्या पूर्णत्वास आलेल्या मंदिरांची उर्वरित कामे तातडीने पूर्ण करून भाविकांना दर्शनासाठी लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याबाबत यावेळी



सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच पंढरपूर शहर व परिसरातील सर्व परिवार देवतांच्या मंदिरांचे जतन व संवर्धनाची कामे नियोजित पद्धतीने करण्याबाबत ठेकेदारांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

#### व्यंकटेश मंदिराच्या कामाचा घेतला आढावा

बाजीराव पडसाळी येथील श्री व्यंकटेश मंदिराच्या कामाचाही आढावा घेण्यात आला असून सदर मंदिराचे काम अंतिम टप्प्यात असल्याची माहिती देण्यात आली. यासोबतच जतन व संवर्धनाच्या कामांसाठी आवश्यक ते मनुष्यबळ वाढवून कामांचा वेग वाढविण्याच्या सूचना ठेकेदारांना देण्यात आल्या.

#### पावसाळ्यापूर्वी वॉटरप्रुफिंगची कामे पूर्ण करण्याच्या सूचना

पावसाळ्यापूर्वी सर्व वॉटरप्रुफिंगची कामे पूर्ण करण्याबाबत विशेष दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मंदिर जतन व संवर्धनाची सर्व कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण पूर्ण करण्याबाबत पुरातत्व विभागास सूचित करण्यात आले असून, सर्व कामांचा लवकरच विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आढावा घेतला जाणार आहे.

# मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियानाला ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**
ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून प्रामुख्याने काम करणाऱ्या ग्रामपंचायतीस कामगिरीनुसार प्रोत्साहित करून त्याची कार्यक्षमता वाढविण्याकरिता उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदासाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून तालुका, जिल्हा, महसूल विभाग व राज्य अशा चार स्तरावर प्रोत्साहन देण्याकरिता राज्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्यास संदर्भाधिन आसन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. या अभियानाचा कालावधी १० सप्टेंबर ते ३१ डिसेंबर असा निश्चित करण्यात आला होता. अभियानाचा शुभारंस १७ सप्टेंबरपासून सुरू झाला आहे. मात्र अभियानाच्या सुरुवातीच्या कालावधीत राज्यात उदभवलेली पूरपरिस्थिती तसेच स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाल्यामुळे अभियानाच्या अमलबजावणीवर परीणाम झाली आहे. त्यामुळे राज्यातील ग्रामपंचायतींना या अभियानात प्रभावी सहभागाची संधी मिळावी व अभियानात सुरु असलेल्या उपक्रमाची पूर्तता करता यावी, म्हणून २०२५-१२ या वर्षाकरिता या अभियानाचा कालावधी वाढविण्यात आल्याचे सांगण्यात आले.

#### ग्रामपंचायतींना कालावधी मिळणार

मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियानाच्या स्पर्धेतील ग्रामपंचायतीना पूर व निवडणूकामुळे कमी कालावधी मिळाला आहे. त्यामुळे शासनाने ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ करून ग्रामपंचायतीना संधी दिली आहे.

**- सूर्यकांत भुजबळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत विभाग, जि.प. सोलापूर**

# लोकसहभागातून, पंचायतराज अभियान यशस्वी करा

### सरपंच भरत क्षीरसागर

#### कातेवाडी येथे पंचायतराज अभियानाची जनजागृती रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**कुरूल, दि. ३१ डिसेंबर-**
गाव समृद्ध झाल्याशिवाय जिल्हा व राज्य समृद्ध होऊ शकत नाही. त्यामुळे ग्रामस्थांनी लोकसहभाग वाढवून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान यशस्वी करावे, असे आवाहन कातेवाडी ग्राम पंचायतीचे सरपंच भरत क्षीरसागर यांनी केले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत जिल्हा परिषद सोलापूर, पंचायत समिती मोहोळ व ग्रामपंचायत कातेवाडी तसेच हनुमान भजनी मंडळी कातेवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने कातेवाडी गावातून पंचायत राज अभियानाची जनजागृती व प्रबोधन रॅली काढण्यात आली. त्यानंतर ग्रामपंचायत प्रांगणात आयोजित जनजागृती कार्यक्रमात ते बोलत होते.



सोलापूर जिल्ह्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान यशस्वी करण्यासाठी ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग आवश्यक असून स्वच्छ, समृद्ध व सक्षम ग्रामपंचायत निर्माण करणे, स्वच्छतेबरोबरच पर्यावरण संवर्धन, लोकवर्गणी आणि पाण्याचे योग्य व्यवस्थापन यासाठी योगदान देणे गरजेचे असल्याचे सरपंच क्षीरसागर यांनी सांगितले. यावेळी सरपंच भरत अशोक क्षीरसागर, उपसरपंच दशरथ मासाळ, भारत धोटे, सचिन गोवर्धनकर, बंडू सुतार, भगवान क्षीरसागर, भालचंद्र क्षीरसागर, ज्ञानेश्वर जमदाडे, शिवाजी क्षीरसागर, बाळासाहेब क्षीरसागर, अविनाश क्षीरसागर, अमर मासाळ, रामचंद्र मासाळ, बजरंग मासाळ, सावकार साळुंखे उपस्थित होते.



# 'संतांचे विचार मनुष्यासाठी संजीवनी'

**तभा वृत्तसेवा**
**करकंब, दि. ३१ डिसेंबर-**
श्री.चौंडेश्वरी पौष पौर्णिमा नारदीय कीर्तन महोत्सव करकंब येथे प्रतिवर्षाप्रमाणे सुरू असलेल्या तिसऱ्या कीर्तन पुष्पामध्ये हभप वेदश्री ओक व इतर मान्यवरांच्या हस्ते आई चौंडेश्वरी मातेची पूजा आणि दीपप्रज्वलन करून कीर्तनाला सुरुवात झाली.

पूर्वरंगामध्ये हभप वेदश्री ओक यांनी संत आत्माराम यांच्या त्या दिवसाची सोय करी मन त्या दिवसाची सोय या सुंदर अभंगावर निरुपण करताना सध्या प्रत्येकाच्या जीवनामध्ये धडपड सुरू आहे. शेवटी साध्यपण काही होत नाही. त्यामुळे जीवन निरस होत असताना आपल्या जीवनात संजीवनी प्राप्त करायची असेल तर तासनतास टीव्ही पुढे न बसता पूर्वापार चालत आलेल्या संतांच्या विचारांची आणि ईश्वराच्या नामस्मरणाची आवड निर्माण झाली पाहिजे. संत वचनाप्रमाणे आपलं जीवन व्यतीत केले तर निश्चितच संसार सुखाचा होईलच पण जीवनाचेही सार्थक झाल्याशिवाय राहणार नाही. जन्म मरणाची भिती नष्ट करायची असेल तर नामस्मरण अतिशय महत्त्वाचे आहे.उत्तर रंगांमध्ये पंढरपूरचे वैभव विठूरायामुळे आहे पण विजयनगरच्या सम्राट राजाने विठूरायाला आपल्या नगरात आणलं तेंव्हा संत एकनाथ महाराजांचे वडील संत भानुदास महाराजांनी परत पंढरीनगरीत कसं आणल यावर सुंदर दृष्टांत देऊन सर्व करकंबकरांना मंत्रमुग्ध केले.

# बार्शीत मायबोलीचा परिवार मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३१ डिसेंबर-**
बार्शीच्या सांस्कृतिक विश्वात वैशिष्ट्यपूर्ण स्थान असलेल्या मायबोली सांस्कृतिक मंडळाचा परिवार मेळावा नुकताच मोरया फंक्शन हॉल येथे संपन्न झाला. मेळाव्यामध्ये मंडळातील सदस्यांचे विविध गुणदर्शन आणि परिवारातील गुणवंतांचा सन्मान असा कार्यक्रम होता.

मंडळाचे संस्थापक अध्यक्ष विजयकुमार माढेकर आणि ज्ञानोबा माऊली यांच्या प्रतिमांचे पूजन आणि दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली.



अध्यक्ष मुकुंदराज कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. ज्ञानेश्वरी पोळ हिने भरतनाट्यातून गणेश वंदना सादर केली. निर्भय अणवेकर, मनवा पुजारी, अन्वित कुलकर्णी, आरोही पवार या बालकलाकारांनी गीत, नृत्य, कथाकथन इत्यादी विविध प्रकार प्रभावीपणे सादर केल्यानंतर ज्येष्ठ सदस्यांनी विविध, गाजलेली हिंदी, मराठी गीते कराओकेच्या साथीने सादर करुन श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. सचिव डॉ. प्रशांत मोहिरे, डॉ. वैशाली मोहिरे आणि शिल्पा माढेकर यांनी सूत्रसंचालन केले.

मायबोली परिवारातील गुणवंत विद्यार्थी, ज्येष्ठांनाही सन्मानित करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर उपाध्यक्ष जवाहर माढेकर, अरुण शहा, कोषाध्यक्ष व्यंकटेश कुलकर्णी, सुनील पाटील, जितेंद्र माढेकर, राजेंद्र श्रीश्रीमाळ, अमिता कुलकर्णी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी निलेश माढेकर, पल्लवी माढेकर, सुमन चंद्रशेखर, प्रमोदिनी कोठारी, तृप्ती माढेकर, प्रणाली शेटे, प्रेम स्वामी यांनी परिश्रम घेतले. ध्वनीव्यवस्था विशाल कोटगुंड यांनी चोख ठेवली होती.



### जिल्हास्तरीय स्काऊट आणि गाईड मेळाव्यात जिजाऊ गुरुकुलचे यश

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ३१ डिसेंबर-**
तालुक्यातील चारे येथे नुकत्याच संपन्न झालेल्या 'भारत स्काऊट गाईड कब बुलबुल जिल्हा मेळाव्यात खांडवी येथील जिजाऊ गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली.

शोभायात्रा स्पर्धेत स्काऊट विभागाने 'पोतराज' या विषयावर अत्यंत जिवंत सादरीकरण करुन उपस्थितांची मने जिंकली आणि प्रथम क्रमांक पटकावला. गाईड विभागानेही याच विषयावर तृतीय क्रमांक मिळविले. इयत्ता ९वी मधील तनुजा बजरंग चोरमुले हिने 'बेस्ट गाईड' स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवून शाळेचा गौरव वाढवला. तसेच शुभम बाबर (इयत्ता ९वी) याने वक्तृत्व स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावले. यशासाठी विद्यार्थ्यांना गाईड कॅप्टन आरती दास (जगताप) आणि स्काऊट मास्टर गणेश वडेकर यांचे मार्गदर्शन लाभले. या यशोशिखराबद्दल शाळेच्यावतीने सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचा व मार्गदर्शकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संभाजी घाडगे, सचिव वर्षा घाडगे, प्रशासकीय अधिकारी किशोर कदम, डायरेक्टर संदेश कदम, फिजिकल कोर्स मार्गदर्शक जे. बी. शिंदे उपस्थित होते.

# भगिरथ भालकेंच्या 'त्या' भाषणाबद्दल होतेय उलटसुलट चर्चा

## पंढरपुरात उमटताहेत संमिश्र प्रतिक्रिया

**तभा वृत्तसेवा। महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.३१ डिसेंबर-**
पंढरपूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी डॉ.प्रणिता भालकेंनी विजय संपादन केल्यानंतर झालेल्या विराट सभेला संबोधित करताना त्यांचे पती तथा विठ्ठल कारखान्याचे माजी अध्यक्ष भगिरथ भालकेंनी केलेल्या भाषणांबद्दल पंढरपूरकरात उलटसुलट चर्चा झडू लागली आहे. नागरिकांतून संमिश्र प्रतक्रिया उमटत आहेत.

पंढरपूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी डॉ.प्रणिता भालकेंनी मोठ्या मताधिक्यांनी एकहाती विजय मिळविला. त्यांच्या या विजयानंतर मतमोजणी केंद्रापासून ते येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत जंगी विजयी रॅली झाली. या रॅलीची सांगता येथील शिवतीर्थावर सभेने झाली. यावेळी श्री.भालके यांनी जबराट भाषण ठोकले. भाषणाचा सारा रोष माजी आमदार प्रशांत परिचारकांवर टिकाटिप्पणी करण्यावर होता. वास्तविक पाहता पंढरपूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी झालेल्या या



निवडणूकीत पंढरपूरवासियांनी (स्व.) भारतनाना भालकें आणि त्यांच्या स्नुषा डॉ.प्रणिता भालके यांना डोळ्या समोर ठेवून मतदान केले. या निवडणूकीत भगिरथ भालकेंना कुठेही पंढरपूरकरांनी केंद्रस्थानी ठेवले नाही. तरी देखील जणू आपणच आमदार झालो या अविर्भावात विजयी रॅलीनंतर त्यांनी जे टिका करीत भाषण केले त्याबद्दल सर्वच स्तरातून संमिश्र सूर उमटत आहे.

वास्तविक पंढरपूरचा विकास, त्यासाठीचा रोडमॅप याबद्दल बोलणे अपेक्षित होते. एकमेकांच्या पायात पाय पेक्षा एकमेकांच्या हातात हात घेऊन काम करण्याबद्दलचे भाषण अपेक्षित असल्याचे पंढरपुरातील नागरिकांतून बोलत आहेत.

#### स्व.नानांवरील टिका परिचारकांना पडली महागात

नगरपरिषद निवडणूकीच्या प्रचारादरम्यान (स्व.) भालकेंचा परिचारकांकडून करण्यात आलेला एकेरी उल्लेख, त्यांच्यावरची टिका माजी आमदार प्रशांत परिचारकांना चांगलीच महागात पडली. पंढरपूरकरांना परिचारकांनी मरण पावलेल्या भारतनाना भालकेंवर केलेली टिका रुचली नाही. त्यामुळेच ऐन निवडणूकीत पंढरपूरकरांची सहानभुती डॉ.प्रणिता भालकेंच्या पारड्यात पडली. त्यामुळेच डॉ.भालकेंची नगराध्यक्षपदाची निवड काहीसी सुकर झाली.

#### गल्लीबोळांतून चर्चेत 'त्या' भाषणाचाच विषय

डॉ.प्रणिता भालके या नगराध्यपदी निवडून आल्याने त्यांचे पती भगिरथ भालके यांना निश्चित आनंद झाला असेल. मात्र विजयाने माजायचे नाही आणि पराजयाने खचावयाचे नाही हे आपल्या विजयाच्या आनंदात भालके विसरुनच गेले. त्यामुळेच विजयी सभेत काही नको ते बोलून गेले. त्यांच्या भाषणा दरम्यान टवाळखोर उनाड समर्थक नागरिकांनी जरी भालकेंनी केलेल्या भडक वक्तव्यांबद्दल टाळ्या,शिट्या मारुन त्यांचे समर्थन केले असले तरी सर्वसामान्य हुशार पंढरपूरकरांना भाषणातील बेताल वक्तव्ये कशी रुचणार असा देखील सवाल सर्वसामान्य पंढरपूरकरांतून चर्चिला जात असल्याचे ऐकावयास मिळत आहे.

### शेळगी शिवयोग धाम येथे आज श्री वीरभद्रेश्वर यात्रा महोत्सव

**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**
शेळगी येथील श्री शिवयोग वाम यथ प्रतीवर्षाप्रमाण श्री वीरभद्रश्वर यात्रा महोत्सव साजरा होणार आहे. या महोत्सवाचे दिव्यसन्निध्य परम पूज्य 'शिवाचार्यरत्न श्री.ष. ब्र. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी (श्रीगुरु संस्थान मठ, गौडगांव) यांचे लाभणार आहे. असे शिवयोगधाम सेवा समितीचे अध्यक्ष राजशेखर हत्ती यांनी कळविले आहे. या निमित्ताने गुरुवार दिनांक १ जानेवारी २०२६ रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार दिनांक १ जानेवारी रोजी सकाळी ७ वाजता श्री रुद्राभिषेक, महाआरती व ध्वजारोहण होईल. सकाळी ८ वाजता अग्नी प्रज्वलन, सकाळी ९ वाजता उत्सवमूर्तीचे आगमन (श्री चौडप्पा भैरामडगी यांच्या घरापासून) आणि सकाळी १० वाजता पारंपरिक सवाद्यासह मिरवणूक निघणार आहे. त्यानंतर अभिषेक, महाआरती व महाप्रसाद होणार आहे. महाप्रसाद सेवेचे आयोजन संगप्पा बिराजदार परिवार, शेळगी यांच्या वतीने करण्यात आले आहे. या यात्रा महोत्सवाचे आयोजन श्री वीरभद्रेश्वर यात्रा महोत्सव कमिटी, शेळगी यांच्या वतीने करण्यात आले असून महोत्सवाचे अध्यक्ष एन. डी. जावळे व महिला अध्यक्षा शोभा कागवाड आहेत.

# चिप्पा यांच्या अर्जात 'ज चा न' झाल्याने विरोधकांची हरकत

## निवडणूक कार्यालयात प्रवेश करणाऱ्या भाजपा शहराध्यक्ष तडवळकरांना गेटवर अडवले

## ढकला ढकलीसह प्रचंड गोंधळाची स्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

प्रभाग क्रमांक १३ चे भारतीय जनता पार्टीचे उमेदवार विजय भुमय्या चिप्पा यांच्या बी फॉर्मवर ज ऐवजी न दिसल्याने विरोधकांनी हरकत घेतली. त्यावर स्पष्टीकरण देण्यासाठी नॉर्थकोट निवडणूक कार्यालयात येणाऱ्या भाजपा शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांना नॉर्थकोटच्या मुख्य प्रवेशद्वारावर विरोधी कार्यकर्त्यांनी आडविले. यावेळी प्रचंड गदारोळ, ढकलाढकली आणि गोंधळाची स्थिती निर्माण झाली. त्याही परिस्थितीत धावत पळत जाऊन अखेर कार्यालयात गेले. रोहिणी तडवळकर यांनी निवडणूक कार्यालयात प्रवेश केला. अखेर चिप्पा यांचा अर्ज वैध झाल्याचे सांगण्यात आले.

सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी भाजपचे उमेदवार विजय चिप्पा यांनी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय क्रमांक चार येथे प्रभाग १३ मध्ये उमेदवारी अर्ज दाखल केला होता. सायंकाळी त्याची आज छाननी होती. यावेळी विरोधकांनी विजय ऐवजी विनय असे उमेदवारी अर्जावर नमूद आहे. त्या असे सांगत अर्जावर हरकत घेतली. ज्यांनी एबी फॉर्म दिला आहे. त्यांचीच बाजू ऐकून घेण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांना पाचारण केले. मात्र ते लांब असल्याने त्यांना या कार्यालयात येण्यास विलंब झाला. बाजू ऐकून घेण्यासाठी दिलेली वेळ संपली आहे. चिप्पा यांचा अर्ज बाद करावा. अशी मागणी विरोधकांनी केली. त्यानंतर अधिकाऱ्यांनी आणखीन दहा मिनिटांचा वेळ दिला. तरीही त्यांना कार्यालयात येण्यास वेळ झाला. अखेर काही वेळातच रोहिणी तडवळकर या नार्थकोटच्या मुख्य प्रवेशद्वारात दाखल झाल्या. मात्र येथे विरोधी कार्यकर्त्यांनी त्यांना अडवले. या ठिकाणी गोंधळाची स्थिती निम र्माण झाली. आणि ढकलाढकली व गदारोळ झाला. तशाही परिस्थितीत शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर या निवडणूक कार्यालयात पोहोचल्या. अँड संतोष नाव्हकर यांनी आपली बाजू मांडली आणि एफिडेविट सादर केले. अखेर चिप्पा यांचा अर्ज वैध झाल्याचे सांगण्यात आले.



### सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली दिलेला हा निर्णय : ॲड. अनिल वासम

भाजपचे उमेदवार विजय चिप्पा यांच्या बी फार्मवर विनय चिप्पा असे लिहिलेलं होतं. मात्र मतदार यादी मध्ये त्यांचे नाव विजय असे होते. जोडपत्र बदलता येत नाही. जोडपत्रावर विनय चीप्पा असे होते. त्यावर आम्ही आक्षेप नोंदवला. त्यावर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी विजय आणि विनय दोन्ही एकच व्यक्ती आहेत. हे ज्यांनी प्राधिकृत केले आहे. त्यांना पाचरण करण्यास सांगितले. त्यांचे प्राधिकृत व्यक्ती उशीर आले. त्यांना दिलेली वेळ संपली आहे. यांचा अर्ज अवैध करा. चिन्ह काढून घ्या त्यांना अपक्ष करा. अशी आम्ही मागणी केली. मात्र सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली हा निर्णय दिला गेला आहे. असा आरोप करत उच्च न्यायालयात धाव घेणार आहे. अशी माहिती विरोधी उमेदवाराचे वकील ॲड.अनिल वासम यांनी दिली.

### मुख्य प्रवेशद्वारात अडवल्यामुळे यायला थोडासा उशीर झाला : तडवळकर

भारतीय जनता पार्टीचे उमेदवार विजय चिप्पा यांच्या बी फार्मवर हस्ताक्षरामध्ये थोडा बदल झाला होता. यामुळे विजय ऐवजी विनय दिसू लागले होते. ज थोडासा वर आला होता. त्यावर विरोधकांनी हरकत घेतले होती. तो विनय नसून विजयच आहे. हे सांगण्यासाठी मी इथे आले होते. यासंबंधी अफेडेविट सादर केले. मला मुख्य प्रवेशद्वारात अडवल्यामुळे यायला थोडासा उशीर झाला. शहरातल्या कार्यकर्त्यांनी पॅनिक होण्याची गरज नाही. कार्यकर्त्यांनी संयम राखावा. गोंधळ करू नये. सर्व उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. अशी माहिती भाजपा शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांनी दिली.

### विरोधकांनी 'ध चा मा' केला : ॲड. संतोष नाव्हकर

भाजप उमेदवार विजय चिप्पा यांच्या बी फार्मवर नाव लिहिताना ज वर आला. त्यामुळे तो न दिसू लागला. एकंदरीत विरोधकांनी त्याचा ध चा मा केला. त्यावर हरकत घेतली होती. त्यानंतर न्यायालयात सुद्धा विनंती केली. जी काही चूक झाली आहे. ती दुरुस्त करण्यासाठी वेळ द्या. त्यासाठी संधी मिळायला हवी. न्यायालयाने विनंती मान्य केल्यानंतर पंधरा मिनिटांचा वेळ दिला. प्राधिकृत व्यक्ती स्वतः सांगत नाही. तोपर्यंत ते अर्ज वैध ठरत नव्हते. कोर्ट निर्णयापर्यंत येऊ शकत नव्हते. त्यामुळे त्यांना पाचरण करण्यात आले. त्यांना यायला उशीर झाला. त्यामुळे पुन्हा एकदा निर्णय घेण्यासाठी विरोधकांनी आग्रह केला. नैसर्गिक न्याय तत्वावर आम्हाला बाजू मांडण्याची संधी द्या. अशी मागणी केल्यानंतर न्यायालयाने वेळ वाढवून दिला. मात्र त्यांना अडवलं गेलं. मागणी करत राहिले वेळ संपली आहे, निर्णय द्या.असे सांगितले. एखादी व्यक्ती कोर्टासमोर आली नाही म्हणून त्यांच्या विरोधात निर्णय देणे असे नियमात नाही. हा मुद्दा ग्राह्य धरण्यात आला आणि उमेदवाराचा अर्ज वैध ठरवण्यात आला. अशी माहिती भाजपचे वकील ॲड. संतोष नाव्हकर यांनी दिली.



# वानकर परिवाराने केला भाजपमध्ये प्रवेश

## विकासाची काम आणि लोकांना दिलेली आश्वासन पूर्ण करण्यासाठी भाजपात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

प्रभागातील नागरिकांना जे आम्ही आश्वासन दिलेले आहेत हे काम करण्यासाठी निधीची खूप गरज असते. सातत्याने यापूर्वी आम्ही विरोधकाची भूमिका बजावलेली आहे. विकासाची काम आणि लोकांना दिलेली आश्वासन हे पूर्ण करण्यासाठी आम्ही भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला असल्याची माहिती माजी नगरसेवक गणेश वानकर यांनी बोलताना दिली.

शिवसेनेच्या माझ्या कोणत्याही सहकाऱ्यांवर मला टीका करायची नाहीये. मला सगळ्या पक्षाकडून ऑफर होती, सगळे पक्ष माझ्याकडे येऊन गेले आहेत. मी एका प्रभागापुरता मर्यादित नसून जिल्ह्याचे नेतृत्व म्हणून जिल्हाप्रमुख काम केलेला आहे. वानकर परिवाराला मानणारा वर्ग आम्ही भाजपमध्ये विलीन केला आहे.येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीमध्ये मी स्वतः फिरून भाजपला जास्तीत जास्त जागा कशा निवडून येतील यासाठी काम करेल. प्रभाग सहा मध्ये गणेश वानकर, सुनील खटके, मृण्मयी गवळी, सोनाली गायकवाड या उमेदवार असतील असेही वानकर यांनी सांगितले.यावेळी विठ्ठल वानकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### इच्छुक उमेदवारांची नाराजी दूर करणार

प्रभाग सहा मध्ये जे इच्छुक उमेदवार होते, त्यांची नाराजी दूर करू. ही निवडणूक विकासाच्या मुद्द्यावर आम्ही लढणार असून संपूर्ण पॅनल हा घवघवीत यश मिळवेल असा आम्हाला विश्वास आहे.

**- सुनील खटके**

### मिळालेल्या संधीच सोनं करू

जी संधी आम्हाला मिळालेली आहे. त्या संधीचं आम्ही सोनं करू. जे महिलांचे व प्रभागातील नागरिकांचे समस्या असतील ते येणाऱ्या काळात आम्ही सोडवू. रोजगाराची संधी ही निर्माण करू.

**- मृण्मयी गवळी**

## भारतीय जनता पार्टीचे उमेदवार

| प्रभाग | उमेदवाराचे पूर्ण नाव |
|---|---|
| प्रभाग १ | गौतम मधुकर कसचे<br>राजश्री अंबादास कणके<br>पूनम प्रभाकर काशीद<br>अविनाश महादेव पाटील |
| प्रभाग २ | नारायण दत्तात्रय बनसोडे<br>कल्पना ज्ञानेश्वर कारभारी<br>शालन शंकर शिंदे<br>किरण विजयकुमार देशमुख |
| प्रभाग ३ | राजकुमार पाटील<br>स्वाती दत्तात्रय बडगु<br>रंजिता सकलेश चाकोते<br>संजय बसप्पा कोळी |
| प्रभाग ४ | चंदना अजित गायकवाड<br>विनायक फकीर विटकर<br>ऐश्वर्या गणेश साखरे<br>अनंत जानेश्वर जाधव |
| प्रभाग ५ | समाधान रेवणसिद्ध आवळे<br>अलका आनंद भवर<br>मंदाकिनी तोडकरी<br>बिज्जू संगप्पा प्रधाने |
| प्रभाग ६ | सोनाली अर्जुन गायकवाड<br>सुनील पांडुरंग खटके<br>मृण्मयी महादेव गवळी<br>गणेश प्रकाश वानकर |
| प्रभाग ७ | आनंद दिगंबर कोलारकर<br>श्रद्धा किरण पवार<br>उत्तरा श्रेयश बचुटे बरडे<br>पद्माकर (नाना) केशव काळे |
| प्रभाग ८ | अमर मारुतीराव पुदाले<br>गीता गोविंद गवई<br>बबिता अनंतकुमार धुम्मा<br>गौरीशंकर उर्फ प्रवीण<br>काशिनाथ दर्गोपाटील |
| प्रभाग ९ | शेखर पांडुरंग इगे<br>कादंबरी प्रकाश मंजेली<br>पूजा श्रीकांत वाडेकर<br>मेघनाथ दत्तात्रय येमूल |
| प्रभाग १० | उज्वला अविनाश दासरी<br>दीपिका वासुदेव यलदंडी<br>सतीश नागनाथ शिरसिल्ला<br>प्रथमेश महेश कोठे |
| प्रभाग ११ | युवराज कोंडीबा सरवदे<br>शारदाबाई विजय रामपुरे<br>मीनाक्षी दत्तात्रय कडगंची<br>अजय चंद्रकांत पोन्नम |
| प्रभाग १२ | सिद्धेश्वर रामलू कमटम<br>सारिका सिद्धाराम खाजुर्गी<br>अर्चना वडनाल<br>विनायक रामकृष्ण कोंड्याल |
| प्रभाग १३ | सुनिता सुनील कामाठी<br>अंबिका हनमंतू चौगुले<br>सत्यनारायण रामय्या गुर्रम<br>विजय भूमय्या चिप्पा |

| प्रभाग | उमेदवाराचे पूर्ण नाव |
|---|---|
| प्रभाग १४ | विजयालक्ष्मी अनिल कंदलगी<br>चेतन गोपाळ पडवळकर<br>श्रद्धा सुनील साका<br>तुषार बंडोबा पवार |
| प्रभाग १५ | वैष्णवी अंबादास कुरगुळे<br>विजया नागेश खरात<br>विनोद धर्मा भोसले<br>श्रीदेवी जॉन फुलारे |
| प्रभाग १६ | रविकांत नंदकुमार कमलापुरे<br>श्वेता प्रशांत खरात<br>कल्पना संतोष कदम<br>दिलीप शंकरराव कोल्हे |
| प्रभाग १७ | निर्मला हरीश जंगम<br>भरतसिंग विठ्ठलसिंग बडूरवाले<br>जुगनुबाई अंबेवाले<br>रवी शंकरसिंग कैयावाले |
| प्रभाग १८ | श्रीकांचना रमेश यन्नम<br>राजश्री शिवशंकर दोडमनी<br>प्रशांत अनिल पल्ली<br>शिवानंद सिद्रामप्पा पाटील |
| प्रभाग १९ | कविता हिरालाल गज्जम<br>व्यंकटेश चंद्रय्या कोंडी<br>कलावती आनंद गदगे<br>बसवराज रामण्णा केंगनाळकर |
| प्रभाग २० | वहिदाबी युन्नुस शेख<br>पूजा दिनेश वाघमारे<br>जीशान म. सलीम सय्यद<br>अमीर सत्तार शेख |
| प्रभाग २१ | संगीता शिवाजी जाधव<br>शिवाजी उत्तमराव वाघमोडे<br>मंजेरी संकेत किल्लेदार<br>सात्विक प्रशांत बडवे |
| प्रभाग २२ | दत्तात्रय मरगु नडगिरी<br>अंबिका नागेश गायकवाड<br>चात्रली शिवराज गायकवाड<br>किसन लक्ष्मण जाधव |
| प्रभाग २३ | सत्यजित सुबोध वाघमोडे<br>आरती अक्षय वाकसे<br>ज्ञानेश्वरी महेश देवकर<br>राजशेखर मल्लिकार्जुन पाटील |
| प्रभाग २४ | मधुसूदन दिनेश जंगम<br>वनिता संतोष पाटील<br>अश्विनी मोहन चव्हाण<br>नरेंद्र गोविंद काळे |
| प्रभाग २५ | सुमन चाबुकस्वार<br>नागेश लक्ष्मण ताकमोगे<br>वैशाली अनिल भोपळे |
| प्रभाग २६ | संगीता शंकर जाधव<br>दीपक विजय जमादार<br>जयकुमार ब्रह्मदेव माने |

## वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार

रवींद्र खाजाप्पा गायकवाड अनुसूचित जाती (पुरुष), किरण विजय रुपनर ना. म. प्रवर्ग (महिला), शिलवंता श्रीकांत गायकवाड सर्वसाधारण (महिला), सुहास संजय सावंत सर्वसाधारण, शाहनवाज ईमामोद्दीन कंपली सर्वसाधारण, पल्लवी प्रवीण सुरवसे अनुसूचित जाती (महिला), मल्लिकार्जुन शरणय्या हिरेमठ ना. मा. प्रवर्ग, पूजा कुणाल धोत्रे सर्वसाधारण (महिला), धम्मपाल इराप्पा इंगळे सर्वसाधारण ,नागेश विलास पाटोळे अनुसूचित जाती (पुरुष), पौर्णिमा हरिजन सर्वसाधारण (महिला), रेणुका सचिन शिराळकर अनुसूचित जाती (महिला), कविता विजायनंद उघडे सर्वसाधारण (महिला), दीपक रतन गवळी अनुसूचित जाती (पुरुष), संकेत धर्मराज वाघमोडे सर्वसाधारण, कीर्तीपाल तुकाराम घोडकुंबे अनुसूचित जाती (पुरुष), सुषमा केवल फडतरे सर्वसाधारण (महिला), रमेश शिवाजी सुतकर सर्वसाधारण, सुभाष खंडेराव गायकवाड सर्वसाधारण, धर्मराज नंदकुमार डूरके अनुसूचित जाती (पुरुष), रमाबाई सिताराम कांबळे सर्वसाधारण (महिला), संगीता सुरवसे अनुसूचित जाती (महिला)

## बहुजन समाज पार्टीचे उमेदवार

| प्रभाग | उमेदवाराचे पूर्ण नाव |
|---|---|
| प्रभाग १ | बबलू सिद्राम गायकवाड, भागीरती राजेश शिंदे, शेहनाज अ.राजक मोमीन |
| प्रभाग ४ | रेशमा मारुफ मुल्ला, सुरेखा रेवनसिद्ध बाळशंकर |
| प्रभाग ५ | चंद्रशेखर भीमराव उघडे, दर्शना संदीप दुगाणे, प्रज्ञा प्रमोद लोंढे, महेश सुरेश मुंदडा |
| प्रभाग ६ | भाग्यश्री दीपक पांढरे, विनोद राहुल वाघमारे |
| प्रभाग २२ | श्रीकांत भिमया चलवादी, दीपक धर्मा बनसोडे, |
| प्रभाग २३ | जरग राहुल वैजनाथ, मनिकम्मा कपिलदेव कोळी |
| प्रभाग २६ | पल्लवी बलभीम कांबळे, सुहास गणपत सुरवसे |

# कांबळे खून खटल्यातील युवकाचा जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर-**

सुनील अनिल कांबळे वय ३२ रा महूद ता सांगोला जिल्हा सोलापूर याचा खून केल्याप्रकरणी अनिल उर्फ सोनू यशवंत चव्हाण वय-२४, रा महूद ता सांगोला जिल्हा सोलापूर यांस कोल्हापूर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शिवकुमार दिघे यांनी जामीन मंजूर केला.

यात हकीकत अशी की, दि ११ जुलै २०२४ रोजी सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास दत्तात्रय लोखंडे याने ओंकार पंडित यास मारहाण केली होती. त्यावेळी ओंकार याने त्याचा मित्र आरोपी ऋषिकेश शिरतोडे यास मारहाणीची घटना सांगितली होती त्याबाबत आरोपी ऋषिकेश शिरतोडे व अनिल चव्हाण याने गणेश लोखंडे यास ओंकार याला मारहाणीबाबतचा जाब विचारला त्यावेळी त्यांचे बाचाबाची झाली होती. त्यानंतर रात्री १०:०० वाजेच्या सुमारास ऋषिकेश शिरतोडे व अनिल चव्हाण हे महूद येथील समाज मंदिराकडे येऊन नागेश लोखंडे आणि सुनील कांबळे या दोघांना झालेल्या भांडणाचा राग मनात धरून तुम्हाला बघून घेतो, सोडत नाही असे म्हणून निघून गेले. त्यानंतर रात्री १०:१५ वाजेच्या सुमारास अनिल व इतर आरोपी हे धारदार हत्यारे घेऊन झालेल्या भांडणाचा राग मनात धरून सुनील कांबळे यांच्या डोक्यात मानेवर गंभीरवार करून त्यास जीवे ठार मारले. त्यानंतर ते सर्वजण योगेश काटे यांच्या गाडीवर बसून पळून गेले. घटनेबाबत निशा कांबळे हिने सांगोला पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यावर योगेश काटे यास अटक झाली होती.

आपणास जामीन मिळावा म्हणून अनिल याने पंढरपूर सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता. तो अर्ज न्यायालयाने फेटाळला होता. त्यावर अनिल याने ऍड रितेश थोबडे यांचेमार्फत कोल्हापूर उच्च न्यायालयात जामीन मिळणेसाठी अर्ज दाखल केला होता. अर्जाच्या सुनावणीच्या वेळी ॲड. रितेश थोबडे यांनी आपले युक्तीवादात, सदर गुन्ह्याचा तपास हा पूर्णत्वात आलेला आलेला असून दोषारोप पत्र देखील दाखल झालेले आहे त्यामुळे आरोपीस गजा आड ठेवल्याने कोणतीही फलनिष्पत्ती होणार नाही असा युक्तिवाद मांडला त्यावरून न्यायमूर्तींनी २० हजार रुपयाच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. यात अर्जदार आरोपीतर्फे ॲड. रितेश थोबडे यांनी तर सरकार तर्फे ॲड. पी. एस. राणे यांनी काम पाहिले.



सोलापूर :- शहरात सायंकाळी पहिली ख्रिस्त मंडळी फर्स्ट चर्च यांच्यावतीने नववर्षाच्या स्वागतासाठी सात रस्ता ते रंगभवन मार्गावर ख्रिस्त बांधवानी कॅन्डल रॅली काढली. (छायाचित्र : केवल तिवारी)







**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ डिसेंबर -**
एका गावातील २५ वर्षीय महिला (नाव व गाव गोपनीय) हिने दिलेल्या तक्रारीवरून एका तरुणाविरुद्ध कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडितेच्या तक्रारीनुसार, दि.१७ जानेवारी २०२५ ते १४ डिसेंबर २०२५ या कालावधीत एका गावातील एका तरुणाने लग्नाचे आमिष दाखवून तिला त्याच्या शेतातील घरात नेले. तेथे त्याने तिला शिवीगाळ करून मारहाण केली तसेच तिच्यावर लैंगिक अत्याचार केला, असा आरोप तक्रारीत नमूद आहे.



या प्रकरणी पीडितेने दि.३० डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ६४ (१), ६४ (२) (एम), ११५ (२), ३५२ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास कळंब पोलीस करीत आहेत.



### संक्षिप्त वृत्त...



## जि.प. शाळा इनगोदा येथे शालेय व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड

**परंडा, दि.३१ डिसेंबर -**
परंडा तालुक्यातील इनगोदा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शालेय व्यवस्थापन समितीची निवड प्रक्रिया पार पडली. यामध्ये सुदर्शन जगताप यांची अध्यक्षपदी तर बालाजी जगताप यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीसाठी मुख्याध्यापक, विद्यार्थी व पालकांची सभा घेण्यात आली होती. सभेत सर्वानुमते सुदर्शन जगताप यांची शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी, तर बालाजी जगताप यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. समितीच्या सचिवपदी शाळेचे मुख्याध्यापक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच समितीत सर्व समाजघटकांतील पालक सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे. नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्यांचा माजी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, पालकवर्ग व विद्यार्थ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.



## दिशा नागरी सहकारी पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन संपन्न

**तुळजापूर, दि.३१ डिसेंबर -**
येथील दिशा नागरी सहकारी संस्थेच्या शहर शाखेत संस्थेच्या या वर्षीच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन नुतन नगराध्यक्ष विनोद गंगणे यांच्या हस्ते करण्यात आले. तुळजाभवानी देवीच्या प्रतिमेच्या पूजनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. नूतन नगराध्यक्ष आणि नगरसेवकांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल चव्हाण यांनी केले तर आभार प्रदर्शन सरोजा माडजे यांनी केले. यावेळी संस्थेचे संचालक मेघराज पडवळ, आनंद कंदले, नागेश नाईक, मनोज माडजे, कौस्तुभ जेवळीकर, महादेव जाधव, अनंत कोंडो, संतोष इंगळे शंतनू वाघ यांची उपस्थिती होती.

## शुभम फाटक यांची ‘My Bharat’ उपक्रमात सहसंचालकपदी निवड

**वाशी, दि.३१ डिसेंबर -**
देशातील अत्यंत स्पर्धात्मक मानल्या जाणाऱ्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC) परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण करत शुभम विलास फाटक यांची केंद्र सरकारच्या ‘My Bharat’ या महत्त्वाकांक्षी उपक्रमात सहसंचालक (ssistant Director) पदी निवड झाली आहे. ‘My Bharat’ हा भारत सरकारचा युवकशक्तीला एकत्र आणणारा व त्यांना राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत सक्रिय सहभागासाठी प्रेरित करणारा अभिनव उपक्रम आहे. या पदावर कार्यरत राहून शुभम फाटक युवकांसाठी विविध विकास, प्रशिक्षण व नेतृत्व घडविणारे कार्यक्रम राबवणार आहेत. या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांची आई सुनीता फाटक, वडील डॉ. विलास फाटक, साक्षी फाटक, सर्जेराव फाटक, तसेच रामलिंग शेंडगे यांच्यासह वाशी येथील कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार व नागरिकांनी अभिमान व्यक्त केला आहे. या यशाचे श्रेय शुभम यांच्या कठोर परिश्रम, चिकाटी व सातत्याला दिले आहे.



## वाहतूक नियमभंगावर ३०९ कारवाया

**धाराशिव, दि.३१ डिसेंबर -**
धाराशिव शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांच्या संयुक्त कारवाईत ३० डिसेंबर रोजी महत्त्वाच्या रस्त्यांवर मोटार वाहन कायदा व नियमभंग प्रकरणी एकूण ३०९ कारवाया करण्यात आल्या. या कारवाईतून एकूण २,५३,९५० इतके तडजोड शुल्क वसूल करण्यात आले आहे.

### ५००१ जलकलश आणि २१०० साड्यांचे वाटप | जलयात्रेत शेकडो कुमारिका सुहासिनी महिलांचा सहभाग...

# आई राजा.. उदो.. उदोच्या जयघोषात तुळजाभवानीची जलयात्रा संपन्न

**हत्ती घोडे बैलगाड्या आणि विविध प्रकारचे बहुरूपी बाहुले हे जलयात्रेतील मुख्य आकर्षण... सेल्फी घेण्यासाठी गर्दी...**









**तभा वृत्तसेवा / सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.३१ डिसेंबर -**
साडेतीन शक्तीपीठातील एक पूर्ण पीठ असणाऱ्या आई तुळजाभवानी मातेच्या धाकट्या दसऱ्यात म्हणजे शाकंभरी नवरात्र महोत्सवातील मुख्य आकर्षण असतं ते जलयात्रा आई राजा उदो उदोच्या घोषणा देत मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात मोठ्या भक्तिभावाने दि.३१ डिसेंबर रोजी तुळजाभवानी मातेची जलयात्रा संपन्न झाली.

शाकंभरी नवरात्रातील पाचव्या माळेनिमित्त विविध धार्मिक विधी सोबतच पारंपरिक रूढी परंपरेने जल यात्रा काढली जाते पापणास तीर्थ येथील इंद्रायणी देवीची विधीवत पूजा करून पापणास कुंडातील पवित्र जलाचे पूजन शाकंभरी नवरात्र महोत्सवातील यजमान उल्हास कागदे आणि त्यांच्या पत्नी यांच्या हस्ते करण्यात आले.

शाकंभरी मातेची शाक प्रतिमा (भाजीपाला) व पापणास तीर्थ येथील पवित्र जल भरलेला जलयात्रेचा कलश आकर्षक आणि भाजीपाला आणि फळांसोबत फुले लावून सुंदर सजवलेल्या रथामध्ये बसवून गाजत वाजत ही जलयात्रा प्रथम छत्रपती शिवाजी महाराजांच्या चौकातून भव्य मिरवणूक भवानी रोड मार्गे मंदिरात जाते.

**शक्तीपीठात जल यात्रेच्या भव्य मिरवणुकीने सर्वत्र विविध वाद्यांच्या गजरात भक्तीमय आणि उत्साही वातावरण निर्मिती...**

यावेळी पंचक्रोशीतील सुहासिनी कुमारीका पवित्र पापनास तीर्थाचे जल कलशात घेऊन ते कलश डोक्यावर घेऊन या मिरवणुकीत सहभागी होतात. तसेच आराधी, वाघ्या मुरळी, वारुवाले, गोंधळी, विविध प्रकारचे बहुरूपी बाहुले, पताका दिंड्या, धनगरी ढोल, बँड, बँजो पथक, तुतारी, अद्यावत वाद्यांसह, पारंपारिक वाद्य, संबळ, नगारा यांच्या वाद्यांमध्ये ही मिरवणूक मोठ्या उत्साहात भक्ती भावाने गाजत वाजत मंदिराकडे निघते. मिरवणुकीत असणारे विविध प्रकारच्या बाहुल्यां समोर सेल्फी घेण्यासाठी भाविक भक्तांनी मोठी गर्दी केली होती. यावर्षी उत्सवातील शोभायात्रेमध्ये बैलगाड्या, घोडे हे जल यात्रेचे विशेष आकर्षण होते. देवीचे पारंपारिक वाद्य नगारा हा बैलगाडी मध्ये ठेवून नगारा वाजत गाजत असल्याचे सुंदर दृश्य भाविकांना पाहण्यास मिळाले.

प्रति वर्षाप्रमाणे तुळजाभवानी प्रक्षाळ मंडळाच्या वतीने सुहासिनी कुमारीका व आराधी महिलांना ५००१ कलशासोबत यावर्षी २१०० साड्यांचे वाटप केले गेले. तसेच प्रक्षाळ मंडळाचे कार्यकर्ते यांना मंडळाच्या वतीने विशेष ड्रेस कोड देण्यात आला होता.

### जलयात्रेत प्रशासनाचा हलगर्जीपणा चव्हाट्यावर...

शाकंभरी नवरात्र महोत्सवातील सर्वात महत्त्वाचा आणि सर्वात मोठ्या भव्य मिरवणूक असणाऱ्या जल यात्रेसाठी दीपक चौकात प्रशासनाने प्रशासनाच्या गाड्यासाठी राखीव जागेसाठी ठेवलेले बॅरिकेट जल यात्रेत काढले नव्हते त्यामुळे जल यात्रेला रोडच्या मधोमध असणाऱ्या बॅरिकेटच्या दोन्ही बाजूने मंदिराकडे जावे लागले. शासकीय गाड्यांसाठी रोडच्या मधोमध बॅरिकेट लावून गाड्या पार्किंग केल्या जातात यामुळे गेट पासून दीपक चौकापर्यंत नेहमीच वाहतूक कोंडी होत असते. तसेच जल यात्रा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ येईपर्यंत रोडच्या मध्यभागी लावलेल्या गाड्या काढण्यात आल्या नव्हत्या यावरून प्रशासनाचा हलगर्जीपणा चव्हाट्यावर आल्याचे निदर्शनास आले.

शेकडोंच्या संख्येने आलेल्या महिला सुवासिनी कुमारीकांनी पापनास तीर्थ येथील आणलेल्या पवित्र जलने तुळजाभवानी मंदिर धुवून घेतले. त्यानंतर मंदिर संस्थांच्या वतीने आलेल्या सर्व सुवासिनी आणि कुमारीकांची खना नारळाने ओटी भरली.

त्यानंतर आलेल्या सर्व जल यात्रेमध्ये सहभाग घेणारे भाविक भक्तांसाठी प्रक्षाळ मंडळाच्या वतीने भवानी रोड व त्यालगत असणाऱ्या भाजी मंडई येथे भव्य अन्नदान महाप्रसाद भोजनाची व्यवस्था केली होती.

या महाप्रसादाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला. जल यात्रेमध्ये तुळजाभवानी देवीचे मंहत तुकोजी बुवा, मंहत हिरोजी बुवा, महंत वाकोजी बुवा, तहसीलदार तथा मंदिर संस्थानचे व्यवस्थापक माया माने, प्रक्षाळ मंडळाचे अध्यक्ष विशाल रोचकरी, तिन्ही पुजारी मंडळाचे अध्यक्ष, विपीन शिंदे, अमर परमेश्वर, अनंत कोंडो, मंदिरचे धार्मिक सहाय्यक व्यवस्थापक अमोल भोसले, अनुप ढमाले, रामेश्वर वाले, राजकुमार भोसले, प्रवीण अमृतराव, अनिल चव्हाण, सिद्धेश्वर इंगोले, नागेश शितोळे, जयसिंग पाटील, महेंद्र आदमाने. भाविक भक्तांसोबत पुजारी, मंदिर कर्मचारी अधिकारी, प्रक्षाळ मंडळाचे पदाधिकारी सदस्य, महिला, सुहासिनी आणि कुमारीका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तिसरी बायको केल्याच्या कारणावरून ढोकीत हाणामारी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ डिसेंबर -**
राजेशनगर, ढोकी येथे तिसऱ्या विवाहास विरोध केल्याच्या कारणावरून झालेल्या मारहाणीप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत फिर्यादी अनिल उध्दव चव्हाण (वय ३५ वर्षे, रा. राजेशनगर पारधी पिडी, ढोकी, ता. जि. धाराशिव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि. २८ डिसेंबर २०२५ रोजी सायं. ८.०० वाजता आरोपी दादा उध्दव चव्हाण व सुनील उध्दव चव्हाण (रा. रोजश्वर पारधी पिडी, ढोकी) यांनी तिसरी बायको करण्यास का अडथळा आणतोस या कारणावरून शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी व काठीने मारहाण करून फिर्यादीस जखमी केले.

भांडण सोडविण्यासाठी फिर्यादीची पत्नी राणीबाई व अनुसया उर्फ चिंगीबाई आल्या असता, आरोपींनी त्यांनाही मारहाण केली. यामध्ये एकीच्या डाव्या हाताच्या खांद्याला फ्रॅक्चर होऊन गंभीर जखम झाली. आरोपींनी जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणी फिर्यादीने दि. ३० डिसेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## रोटरी क्लब धाराशिवकडून भटके, विमुक्त विकास प्रतिष्ठानला ४० हजारांची मदत

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ डिसेंबर -**
वंचित समाज घटकांच्या सर्वांगीण परिवर्तनासाठी रोटरी क्लब धाराशिवच्या माध्यमातून गेल्या तब्बल ३३ वर्षांपासून सामाजिक चळवळ सातत्याने सुरू आहे. या सामाजिक बांधिलकीचा भाग म्हणून रोटरी क्लब धाराशिवने भटके-विमुक्त विकास प्रतिष्ठान या संस्थेला ४० हजारांचा चा धनादेश प्रदान करून त्यांच्या समाजोपयोगी कार्याला मोलाचे बळ दिले.

भटके-विमुक्त विकास प्रतिष्ठानच्या वतीने यमगरवाडी सेवा प्रकल्प, पालावरच्या अभ्यासिका-शाळा तसेच भटके-विमुक्त विकास परिषद अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून दुर्लक्षित व उपेक्षित घटकांसाठी कार्य केले जाते. सध्या महाराष्ट्रभरात ५४ वस्त्यांवर पालावरच्या शाळा सुरू असून, या शाळांमधून मुलांना शिक्षणासोबतच संस्कार व व्यक्तिमत्त्व विकासाचे धडे दिले जात आहेत.



धाराशिव शहर व परिसरातील वासुदेव वस्ती, वडार वस्ती, बंजारा वस्ती, राजगोंड वस्ती तसेच येडशी परिसरात एकूण १६० विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ मिळत आहे. या विद्यार्थ्यांसाठी दरमहा खाऊ वाटपावर सुमारे १४ हजार रूपये खर्च होतो. पालावरच्या या शाळा वर्षातून दहा महिने नियमितपणे चालविल्या जातात. या उपक्रमासाठी आर्थिक हातभार म्हणून रोटरी क्लब धाराशिवने ४० हजारांचा धनादेश प्रदान केला.

यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष रंजीत रणदिवे, सचिव प्रदीप खामकर तसेच शहापूरकर उपस्थित होते.

## खंडोबा यात्रा शांततेत पार पाडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे : नगराध्यक्ष धरणे

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३१ डिसेंबर -**
नळदुर्ग-अणदूर येथील श्रीक्षेत्र मैलारपूर येथे होणारी श्री खंडोबा यात्रा सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी केले. नगरपालिकेच्या वतीने भाविकांसाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दि.३० डिसेंबर रोजी सायंकाळी श्रीक्षेत्र मैलारपूर येथील सभागृहात नळदुर्ग पोलीस ठाण्याच्या वतीने यात्रेनिमित्त मानकरी, प्रतिष्ठित नागरिक व विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष बसवराज धरणे होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते श्री खंडोबा देवाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर देवस्थान ट्रस्टच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना नगराध्यक्ष धरणे म्हणाले की, श्री खंडोबाची यात्रा ही सर्वांची असून तिची जबाबदारीही सामूहिक आहे. यात्रेस येणाऱ्या भाविकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी पोलीस प्रशासन, नगरपालिका, आरोग्य विभाग व मंदिर समिती यांच्यात समन्वय ठेवून नियोजन करण्यात आले आहे. नगरपालिकेच्या वतीने पिण्याचे पाणी, वीज, स्वच्छता व स्वच्छतागृहांची उत्तम व्यवस्था करण्यात आली असून यात्रा निर्विघ्न पार पडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



पोलीस निरीक्षक सचिन यादव यांनी यात्रेदरम्यान कोणतेही अवैध धंदे सुरू होणार नाहीत, याची दक्षता घेतली जाईल, असे सांगितले. कुठेही गैरप्रकार आढळल्यास नागरिकांनी त्वरित पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. ऐतिहासिक नळदुर्ग शहराच्या प्रतिमेला कुठलाही धक्का बसू नये, यासाठी सर्वांनी सतर्क राहावे, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी नगरसेवक दत्तात्रय दासकर, कमलाकर चव्हाण, संतोष पुदाले, धनराज मुळे यांनी मार्गदर्शन केले. देवस्थान ट्रस्टचे उपाध्यक्ष अविनाश मोकशे यांनी प्रास्ताविकात भाविकांसाठी पाणीपुरवठा, दर्शनरांग व मंदिर परिसरात सीसीटीव्ही व्यवस्था करण्यात आल्याची माहिती दिली.

या बैठकीस एमएसईबीचे अधिकारी, महामंडळाचे वाहतूक नियंत्रक, नगरपालिकेचे अधिकारी, शिवसेनेचे पदाधिकारी, देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी, कुस्ती आखाडा समितीचे सदस्य, पत्रकार व नागरिक उपस्थित होते.

## गोठ्यातून दोन म्हशी व रेडक चोरीस; अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ डिसेंबर -**
महादेववाडी शिवारातील एका गोठ्यातून दोन म्हशी व एक रेडक अशी एकूण ४४ हजार रूपये किमतीची जनावरे चोरीस गेल्याची घटना उघडकीस आली आहे.



याबाबत फिर्यादी रोहित किसन भुसारे (वय २५ वर्षे, रा. महादेववाडी, ता. जि. धाराशिव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि.२७ डिसेंबर रोजी सायं. ७ वा. ते दि.२८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७ वा. या कालावधीत अज्ञात व्यक्तीने त्यांच्या महादेववाडी शिवारातील गोठ्यातून दोन म्हशी व एक रेडक चोरून नेले.

या प्रकरणी फिर्यादीने दि.३० डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सुगडी बनवण्यात कुंभार दादा व्यस्त

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, ३१ डिसेंबर :** संक्रातीचा सण जवळ आल्यामुळे पारंपारिक व्यवसाय असणाऱ्या कुंभार समाजातील कारागीर सध्या सुगडे बनवण्याच्या काही

## संक्रातीसाठी सुगडीला विशेष महत्त्व

गडबडीत व आपल्या कामात व्यस्त असलेले दिसत आहेत. गावागावात जिथे कुंभार समाजाचे घर आहे व त्याचे पोट या व्यवसायावर अवलंबून आहे अशा ठिकाणी कुंभार दादा संक्रातीच्या सणासाठी लागणारे सुगडे बनवताना दिसत आहेत.

पूर्वी फुकट मिळणारे माती आता विकत घेऊन त्याचे नीटनेटकेपणा करून अंग मेहनतीने त्याचा चिखल करून मडके बनवत असतात त्यातच हिंदू धर्माचा पारंपारिक सण असलेल्या संक्रातीसाठी सुगडे वर्षातून एक वेळेस बनवताना दिसतात. गावा गावात कुंभाराच्या चाकावर फिरणारा चिकल व त्याला आकर्षक आकार देऊन सुगडी बनवताना कुंभार दादा व्यस्त आहेत.

चिखलातून साकारत असलेल्या सगळ्या पाहिलं की शेतकरी चालत आलेल्या पारंपारिक संक्रांतीच्या सणाची वर्षातून एक वेळेस आठवण येते. संक्रातीच्या



दिवशी हळदी, कुंकू, तिळगुळ वाटप तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये या सुगडीला विशेष धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व आहे. सध्या शिरूर अनंतपाळ तालुक्यातील मौजे थेरगाव येथील राजकुमार किसनराव निरुडे हे संक्रातीनिमित्त मडके व सुगडी बनवण्यात व्यस्त आहेत. सकाळपासून ते रात्री उशिरापर्यंत आपले सुगडी बनवण्याचे काम चालत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

या कामात त्यांची पत्नी रेणुकाबाई व मुलगा सतीश हे दोघेजण त्यांच्या कामात त्यांना मदत करत असल्याचे दिसून येत आहे. मुलगा सतीश हा मातीचाळून ते मातीत भिजून त्याला तुडवून त्याचा गोळा करून वडील राजकुमार यांना आणून देतो. त्या मातीला आकार देऊन झाल्यानंतर त्यांची पत्नी रेणुका ही तयार झालेल्या कच्च्या मडके व सुगडी यांना वाळवण्याचे काम करतात. या प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्वजण मिळून आवा (भट्टी) मध्ये व्यवस्थित रचून भाजण्याचे काम करतात. ही सामूहिक अंग मेहनत म्हणजे एकमेकांवर अवलंबून असलेला हा व्यवसाय आहे.

सुगडी तयार करण्याची प्रक्रिया अत्यंत कष्टाची व वेळ खाऊ आहे. यात योग्य मातीची निवड करणे, ती मळुन तयार करणे, तिला चाकावर ठेवून हळुवार आकार देणे, तिला सावलीत वाळवणे, या सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्व माल एकत्र करून आवा म्हणजे भट्टीत व्यवस्थीत रचुन भाजून घेणे.व्यवस्थीत भाजलेला माल विक्रीसाठी बाजारात आणले जाते. हे सर्व टप्पे अत्यंत काळजीपूर्वक पार पाडावी लागतात. प्रत्येक मडके व सुगडी यांच्यामध्ये कुंभार दादाची अंग मेहनत, अनुभव आणि पिढ्यानपिढ्याच्या अनुभवाचा वारसा उतरलेला असतो.

बदलत्या काळात प्लास्टिक आणि इतर साधनाची उपलब्धता असतानाही संक्रातीच्या सणाला आजही मातीच्याच सुगड्यांना विशेष महत्त्व देवून नागरिकाकडून मागणीला प्राधान्य दिले जाते. ही बाब कुंभार समाजातील कारागीर लोकांसाठी अभिमानाची आहे. पर्यावरण पूरक व निसर्गाशी नाते जपणारी ही कला आहे.

ही कला संक्रातीच्या सणामुळे टिकून असुन श्रम श्रद्धा आणि भारतीय संस्कृतीचे प्रतीक म्हणून संक्रातीसाठी लागणाऱ्या सुगडीला कलियुगात सुद्धा विशेष महत्त्व आहे.

# मास्टर दीनानाथ मंगेशकर यांचे योगदान प्रेरणादायी – प्रा. सबनीस




**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, ३१ डिसेंबर :** मास्टर दीनानाथ मंगेशकर यांचे संगीत व नाट्य क्षेत्रातील योगदान प्रेरणादायी असून अनेक संगीत नाटकांमधील त्यांच्या मुख्य भूमिका अविस्मरणीय असल्याचे प्रतिपादन संगीत विभागप्रमुख प्रा. दुर्गादास सबनीस यांनी केले.

निलंगा तालुक्यातील औराद शहाजनी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयात संगीत विभागाच्या वतीने मास्टर दीनानाथ मंगेशकर यांची जयंती साजरी करताना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे होते. याप्रसंगी पीपल्स महाविद्यालय, नांदेड येथील डॉ.अमोल काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे व डॉ.अमोल काळे यांनी मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. पुढे बोलताना प्रा.दुर्गादास सबनीस यांनी मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या बळवंत नाटक मंडळी अंतर्गत त्यांनी केलेल्या विविध नाटकांचे यशस्वी प्रयोग व अभिनय याबद्दल माहिती दिली. संगीत शाकुंतल या नाटकातील राजा दुष्यंत यांची भूमिका, संगीत सौभद्र या नाटकातील अर्जुन यांची भूमिका व तसेच मान-अपमान, राजसंन्यास, देशकंटक, रणदुमदुबी इत्यादी नाटकाचा आढावा उपस्थितांसमोर विशद केला.

याप्रसंगी डॉ.जाफर चौधरी, डॉ.विनोद जाधव, प्रा.आशिष खडकेश्वर, डॉ.सचिन हंचाटे, डॉ.नागनाथ तेलंगे, डॉ.अशोक नारनवरे, डॉ.आनंद मुसळे, प्रा.प्रमोद मरगणे, प्रा.दगडू मुंडे, प्रा.अभिजीत चवळे, विलासराव होटकर, विजयकुमार बाबछडे, रूपेश मोरे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# विश्वेश्वरय्या पब्लिक स्कूलच्या क्रीडा स्पर्धेचे शानदार उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. ३१ डिसेंबर :** अभ्यासासोबतच आजच्या काळात क्रीडा स्पर्धांना अनन्यसाधारण महत्त्व असून याच उद्देशाने विश्वेश्वरय्या पब्लिक स्कूल मध्ये वार्षिक क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन संत मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्याम भोसले यांच्या हस्ते दीप व क्रीडा मशाल प्रज्वलन करून करण्यात आले. शिरीष उटगे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. तर अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, महादेव खिचडे, जयशंकर हुरदळे, प्रभाकर लोहारे, सोमनाथ लोहारे, अमर हजारी तसेच शाळेचे प्राचार्य बसवराज धाराशिवे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध व भव्य संचलनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या रंगतदार नृत्यकलेने उपस्थित रसिकांची मने जिंकली. विविध आधुनिक व आकर्षक खेळांचा समावेश करण्यात आला असून या क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांसह शिक्षकांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतल्याचे दिसून येत आहे. शिक्षकांचा सहभाग विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. असे मत संस्थेचे संस्थाचालक बसवराज धाराशिवे यांनी यावेळी व्यक्त केले.

किशोर जेवे यांनी प्रास्ताविक केले तर सौ. सायला देशमुख यांनी उपस्थितांचे आभार मानले. या क्रीडा स्पर्धेत विविध मैदानी खेळांचे आयोजन करण्यात आले आहे.या स्पर्धेला उत्साहात सुरुवात झाली आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, संघभावना, शिस्त, आत्मविश्वास व खिलाडूवृत्तीचा विकास होईल, असा विश्वास व्यक्त केला.

# तुंगी शालेय समिती अध्यक्षपदी जाधव, उपाध्यक्षपदी पवार

**तभा वृत्तसेवा**

**औसा दि. ३१ डिसेंबर :** तालुक्यातील तुंगी बु. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय समितीच्या अध्यक्षपदी संतोष जाधव तर उपाध्यक्षपदी सुनील पवार यांची सलग सहाव्यांदा एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली. सेवानिवृत्त शिक्षक माधव सूर्यवंशी पालक सभेच्या अध्यक्षस्थानी होते. उपसरपंच बाजीराव विश्वनाथ जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.



संवर्ग निहाय व इयत्ता निहाय सुचक व अनुमोदक यांच्या वतीने व सर्वांच्या सहमतीने पालकामधून संतोष जाधव, सुनिल पवार, अमोल सूर्यवंशी, आदीनाथ कावळे, अमरजा ढोक, मनिषा चव्हाण, जयश्री पांचाळ, रेणूका घोगरे, इरफाना शेख यांची पालक सदस्य म्हणून निवड करण्यात आली. शिक्षक प्रतिनिधी म्हणून संजय जगताप यांची तर स्विकृत सदस्य म्हणून कु.प्राजक्ता विजय पांचाळ व अरहान युसुफ पटेल यांची विद्यार्थ्यांमधून निवड करण्यात आली.

संजय विभूते यांनी प्रास्ताविक केले तर संतोष जाधव यांनी मार्गदर्शन केले.भैरवनाथ चव्हाण उपस्थितांचे आभार मानले. शेषेराव कबाडे, सत्यवान कांबळे, लहुराज उस्तुरे,राजकुमार झिंगाडे, किसन विभूते, तानुबाई नाथजोगी, छाया फुलवरे यांनी पालकसभा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पुढाकार घेतला होता.

# मेट्रोब्रेन अबॅकस अकॅडमीच्या विद्यार्थ्यांचे यश



**वलांडी प्रतिनिधी**

**वलांडी :** देवणी तालुक्यातील वलांडी येथील लक्षवेध मेट्रोब्रेन अबॅकस अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी नववी राज्यस्तरीय परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी करत राज्यभरात अकॅडमीचे नाव उज्ज्वल केले आहे. विविध कॅटेगिरीमध्ये विद्यार्थ्यांनी प्रथम, द्वितीय क्रमांकासह उत्तेजनार्थ पारितोषिके पटकावून घवघवीत यश संपादन केले आहे.

या परीक्षेत मंजुषा ज्ञानेश्र्वर भंडारे (नववी कॅटेगिरी) - राज्यात द्वितीय क्रमांक, प्रसाद शिवहार नागलगावे (सहावी कॅटेगिरी) - राज्यात प्रथम क्रमांक, स्वरा दशरथ घंटे (पाचवी कॅटेगिरी) - राज्यात द्वितीय क्रमांक, पूर्वी रवी झिंगे (सातवी कॅटेगिरी) - राज्यात प्रथम क्रमांक, श्रुती बोडके (नववी कॅटेगिरी) - राज्यात द्वितीय क्रमांक तसेच विद्यार्थ्यांनी आपापल्या लेव्हलमधून उत्तेजनार्थ पारितोषिकेही मिळवली आहेत. यामध्ये अभिजीत हरिदास कवठाळे, समर्थ विजयकुमार लखणे, अनुराग बालाजी कारभारी, प्रणील योगेश थोरात, पुनम रवी झिंगे, आशिष शिवहार नागलगावे, प्रणव महेंद्र अंबुलगे, संस्कृती विष्णुदास भोसले, स्नेहा शिवकुमार करंडे, सृष्टी शिवकुमार करंडे, मल्हारी राम बालुरे, गायत्री श्याम बालुरे, वंश सुधीर टवानी, मनस्वी मनोज वाडिकर, कृष्णा योगेश थोरात व स्वरा दशरथ घंटे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

या सर्व विद्यार्थ्यांना शिक्षिका रचना दशरथ घंटे यांच्या मार्गदर्शनाखाली घडविण्याचे कार्य करण्यात आले. या उल्लेखनीय यशाबद्दल वलांडी परिसरासह देवणी तालुक्यातून शिक्षिका रचना घंटे यांचे विशेष कौतुक होत आहे.

# सेवानिवृत्तीनिमित्त सुरेश बोरोळे यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**

**देवणी, दि. ३१ डिसेंबर :** बोरोळ तालुका देवणी येथील रहिवासी रावणगाव ता. उदगीर येथील प्राथमीक शाळेत रुजू असलेले मु. अ. सुरेश बोरोळे शासनाच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले यांचा सेवानिवृत्ती व सेवापुर्ती गुणगौरव सोहळा संपन्न झाला. शिक्षक बोरोळे यांचा विविध मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये सहपत्नीक सत्कार व निरोप समारंभ देण्यात आला. यावेळी सत्कार करताना दवणहिप्परगा शाळेतील मुख्याध्यापक राजकुमार मुळखेडे, सुरेश पाटील, संजय खुळे, नवनाथ खुळे, शिवराज वाकडे, चंद्रकांत गरड, दत्ता हुरुचनाळे, व्यंकट आयनिले, शिवाजी बिरादार, सोपान काका सुर्यवंशी, श्रीकांत बिरादार प्रा राहुल बालुरे, सत्यदेव गरड, प्रमोद जवळदापके सह अदिंची उपस्थिती होती.

# वादविवाद स्पर्धेत ज्ञानसागर पब्लिक स्कूलचा संघ प्रथम

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर , दि. ३१ डिसेंबर :** कै . इंदिराबाई गंगाराम आकणगीरे वादविवाद स्पर्धा दि. ३० डिसेंबर रोजी श्रीराम विद्यालय रेणापुर येथे संपन्न झाली . स्पर्धेत ज्ञानसागर पब्लिक स्कूलचा संघ प्रथम आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रेणुका शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देविदासराव कुटवाड हे होते. प्रमुख अतिथी म्हणून राजकीय विश्र्लेषक तथा पत्रकार सुशील कुलकर्णी यांची उपस्थिती होती. व्यासपीठावर रेणुका शिक्षण संस्थेचे सचिव ॲड. पंडितराव उगीले, उपाध्यक्ष रविकांत अकनगिरे, कोषाध्यक्ष ज्ञानोबा बरुरे, सहसचिव विठ्ठलराव कटके, संचालक ओमप्रकाश गोडभरले, अनिताताई भातीकरे, दीपक गोडभरले, सुनील कुटवाड, नूतन नगराध्यक्ष शोभा अकनगिरे व नूतन सर्व नगरसेवक, प्राचार्य सिद्धेश्र्वर मामडगे, श्रीराम प्राथमिकचे मुख्याध्यापक सतीश मोरे, प्राध्यापक भरत धायगुडे यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी नूतन नगराध्यक्ष शोभा अकनगिरे व सर्व पक्षीय नूतन नगरसेवकाचा सत्कार संस्थेच्या वतीने करण्यात आला . या कार्यक्रमाचे प्रास्ताविक




ड. पंडितराव उगीले यांनी केले .याप्रसंगी सेवापुर्ती निमित्त व्यंकटराव अकनगिरे यांचा सपत्नीक संस्थेच्या वतीने सत्कार झाला.याप्रसंगी बोलताना सुशील कुलकर्णी म्हणाले की, गुणवत्तेची खरी ज्ञानगंगा ग्रामीण भागातील शाळांमधून वाहते आहे .संस्काराचे शिंपण खऱ्या अर्थाने या शाळेमध्ये होते. श्रीराम विद्यालय माणूस घडवून सुसंस्कार करणारे शैक्षणिक संकुल आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.


अध्यक्षीय मनोगत देविदासराव कुटवाड यांनी व्यक्त केले. वादविवाद स्पर्धेचे बक्षीस वितरण पंचायत समिती रेणापूरचे शिक्षण विस्तार अधिकारी सुदर्शन लहाने यांच्या हस्ते करण्यात आले. कै. इंदिराबाई गंगाराम अकनगिरे वादविवाद स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे सांघिक प्रथम - स्वराज पोफळे, दुर्गा चव्हाण - ज्ञानसागर पब्लिक स्कूल लातूर, १० हजार १०१ रु रोख व फिरता चषक, द्वितीय -श्रेया मोरे, नैतिक मोरे-रेणुका पब्लिक स्कूल रेणापूर- ७००१ रु स्मृती चिन्ह. तृतीय - श्रेयस शिंदे, भक्ती गरड - श्री केशवराज विद्यालय लातूर -५००१ रु रोख स्मृती चिन्ह, वैयक्तिक प्रथम -काजी सुजाउद्दीन -बाल विद्यामंदिर परभणी- ४००१ रु, स्मृती चिन्ह, द्वितीय - घोडके पूर्वी श्रीराम विद्यालय रेनापुर - ३००१ रु . स्मृती चिन्ह. तृतीय गार्गी शेळके ज्ञानप्रकाश बालविकास केंद्र लातूर - २००१ रु. उत्तेजनार्थ सायली पाडुळे -संभाजीराव बडगिरे विद्यालय ममदापूर -१००१ रु .उत्तेजनार्थ - द्वितीय - प्रांजली मिटकरी-सरस्वती माध्यमिक विद्यालय जानवळ १००१ रु. या स्पर्धेचे परीक्षण कांबळे, हलकुडे व लातूरकर यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख अमृतेश्वर स्वामी यांनी तर आभार प्रा. लहुकांत शेवाळे यांनी मानले.

# 'महाराष्ट्राचे पशुवैभव' व 'माफसू यशोगाथा'चे प्रकाशन

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ३१ डिसेंबर :** महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर (माफसू) यांच्या विस्तार संचालनालयाच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या 'महाराष्ट्राचे पशुवैभव' आणि 'माफसू यशोगाथा' या दोन महत्त्वपूर्ण पुस्तकांचे प्रकाशन नुकतेच पशुवैद्यक महाविद्यालय, उदगीर येथे आयोजित ३४ व्या राष्ट्रीय परोपजीवी शास्त्र परिषदेच्या समारोप प्रसंगी संपन्न झाले.

या प्रसंगी मा. डॉ. एन. रामास्वामी (सचिव, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्य विभाग, महाराष्ट्र राज्य), मा. डॉ. नितिन पाटील (कुलगुरू, माफसू, नागपूर), मा. डॉ. प्रविणकुमार देवरे (आयुक्त, पशुसंवर्धन), डॉ. सचिन बोंडे (संचालक, विस्तार शिक्षण, माफसू, नागपूर), डॉ. अनिल भिकाने ( माजी संचालक, विस्तार शिक्षण, माफसू), डॉ. ए. संगरन (चेन्नई), डॉ. अशोक देवंगरे (सहयोगी अधिष्ठाता) व डॉ. गोपाळ भारकड यांची प्रमुख उपस्थिती होती.




'महाराष्ट्राचे पशुवैभव' या पुस्तकांचे महाराष्ट्रातील एकूण १८ नोंदणीकृत पशुधन प्रजातींची सविस्तर शास्त्रीय माहिती समाविष्ट करण्यात आली आहे. यामध्ये ७ गोवंश, ४ म्हशी, ४ शेळ्या तसेच प्रत्येकी एक मेंढी, अश्व व वराह प्रजातींचा समावेश आहे. या प्रजातींची पैदास क्षेत्रे, शारीरिक गुणवैशिष्ट्ये, उत्पादन व प्रजनन गुणधर्म तसेच उपयुक्तता यांचा अभ्यासपूर्ण आढावा देण्यात आला आहे.

'माफसू यशोगाथा' या पुस्तकात माफसूच्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शन, प्रशिक्षण व प्रोत्साहनातून दुग्धव्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन, वराह पालन, मत्स्य व्यवसाय व प्रक्रिया उद्योगात यशस्वी ठरलेल्या ५२ उद्योजकांच्या प्रेरणादायी यशोगाथा समाविष्ट करण्यात आल्या आहेत. या यशोगाथा ग्रामीण उद्योजकतेसाठी मार्गदर्शक ठरणाऱ्या आहेत. या दोन्ही पुस्तकांचे मुख्य संपादक डॉ. अनिल भिकाने (माजी संचालक, विस्तार शिक्षण, माफसू) असून 'महाराष्ट्राचे पशुवैभव' या पुस्तकाच्या संपादनात डॉ. शैलेंद्र कुरळकर, डॉ. प्रविण बनकर, डॉ. गितांजली ढुमे व डॉ. सारीपुत लांडगे यांनी योगदान दिले आहे.

तर 'माफसू यशोगाथा २०२५' या पुस्तकाच्या संपादनात डॉ. बापूराव कदम, डॉ. अतुल ढोक, डॉ. गितांजली ढुमे, डॉ. विजयसिंह लोणकर, डॉ. तेजस शेंडे, डॉ. स्वप्नील घाटगे, डॉ. हेमंत गावंडे व डॉ. सारीपुत लांडगे यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

# पतीच्या निधनाची वार्ता कळताच पत्नीचेही निधन

**त.भा. वृत्तसेवा,**

**वलांडी, ३१ डिसेंबर :** सीमा भागातील भालकी तालुक्यातील सायगाव सर्कलमधील बोळेगाव येथे हृदयद्रावक घटना घडली असून पतीच्या निधनाची वार्ता कळताच पत्नीचेही निधन झाल्याने संपूर्ण गावासह परिसरात शोककळा पसरली आहे. बोळेगाव येथील रहिवासी विमलाबाई बाबुराव बिरादार (८०) व बाबुराव बिरादार (८५) या पती-पत्नीचे एकाच दिवसात निधन झाले.





मिळालेल्या माहितीनुसार, सोमवार, २९ डिसेंबर रोजी रात्री सुमारे ११ वाजता बाबुराव बिरादार यांचे निधन झाले. पतीच्या निधनाची माहिती मिळताच मानसिक धक्क्यामुळे मंगळवार, ३० डिसेंबर रोजी सकाळी ठीक ७ वाजता पत्नी विमलाबाई बिरादार यांचे राहत्या घरी निधन झाले.

एकाच दिवसात पती-पत्नीच्या निधनामुळे बोळेगाव गावासह परिसरात हळहळ व्यक्त होत असून सर्वत्र शोकमय वातावरण आहे. दोघांवरही मंगळवार, ३० डिसेंबर रोजी दुपारी ठीक २ वाजता बोळेगाव येथील साईबाबा मंदिराशेजारील निर्वाळी परिसरातील त्यांच्या स्वतःच्या शेतात अंतिम संस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्र्चात एक मुलगा, तीन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. दिनेश बिरादार यांचे ते आई-वडील होत. या दुर्दैवी घटनेमुळे गावाने एक आदर्श व संस्कारी दाम्पत्य गमावल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पेठसांगवी येथे मटका जुगारावर छापा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ डिसेंबर -**

लोहारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत जुगारविरोधी कारवाईदरम्यान पोलिसांनी मटका जुगारावर छापा टाकून एकास ताब्यात घेतले आहे.

दि.३० डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२.१० वाजण्याच्या सुमारास लोहारा पोलीस ठाण्याच्या पथकाने पेठसांगवी गावच्या वेशीजवळ छापा टाकला.



यावेळी आरोपी कलीम आलीमोद्दीन शेख (वय ३३, रा. पेठसांगवी, ता. उमरगा, जि. धाराशिव) हा कल्याण मटका जुगाराचे साहित्य व रोख रक्कम स्वतःच्या ताब्यात बाळगताना आढळून आला.

पोलिसांनी जुगाराचे साहित्य व एकूण २ हजार ९८० रुपयांची रक्कम जप्त केली असून आरोपीविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अन्वये लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.



# धाराशिव विमानतळ होणार विकासाचे 'रीजनल हब'

### मुख्यमंत्र्यांचे भक्कम सहकार्य : आ. राणादादा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ डिसेंबर -**



धाराशिव विमानतळ आता केवळ फ्लाइंग ट्रेनिंगपुरते मर्यादित न राहता मेंटेनन्स-रिपेअर-ओव्हरहॉल (MRO) प्रकल्प, प्रवासी विमानसेवा, पार्किंग सुविधा तसेच कृषी निर्यात कार्गो टर्मिनलसह बहुउद्देशीय विमानतळ म्हणून विकसित होणार आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे धाराशिव विमानतळ भविष्यात प्रादेशिक हवाई वाहतुकीचे महत्त्वाचे केंद्र (Regional Hub) ठरेल, असा ठाम विश्वास आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

मागील महिन्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धाराशिव विमानतळास भेट दिली असता, धावपट्टी विस्तारासंदर्भात सविस्तर व तांत्रिक मांडणी करण्यात आली होती. या मागणीचे गांभीर्य ओळखत मुख्यमंत्री फडणवीस यांनी तात्काळ महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या (MDC) व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांना व्यवहार्य प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर हिवाळी अधिवेशनादरम्यान नागपूर येथे संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली, असे आ. पाटील यांनी सांगितले. धावपट्टी विस्तारामुळे सध्या १,२१८ मीटर लांबीची धावपट्टी वाढवून ती तब्बल ३,५०० मीटर करण्यात येणार आहे. तसेच धावपट्टीची रुंदी ३० मीटरवरून ४५ मीटर केली जाणार असून मजबुती निर्देशांक (PCN) १० वरून ६० पर्यंत वाढवण्यात येणार आहे. त्यामुळे बोईंग ७३७, बोईंग ७७७ तसेच एअरबस ३२० व ३२१ सारखी मोठी व्यावसायिक विमाने धाराशिव येथे उतरू शकणार आहेत.

ऑगस्ट महिन्यात झालेल्या सामंजस्य करारानुसार केंद्र सरकारच्या 'उडान' योजनेअंतर्गत धाराशिव विमानतळ महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे हस्तांतरित करण्याचा शासन निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे प्रादेशिक हवाई वाहतुकीच्या दृष्टीने धाराशिवसाठी नवे पर्व सुरू होणार आहे.

### धाराशिवच्या विकासाला नवे पंख...

विमानतळ विस्तारामुळे धाराशिव जिल्ह्याच्या दळणवळण, औद्योगिक व आर्थिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे. प्रवासी विमानसेवा सुरू झाल्याने धाराशिवचा देशातील प्रमुख शहरांशी थेट संपर्क प्रस्थापित होईल. प्रस्तावित MRO सुविधांमुळे विमान दुरुस्ती क्षेत्रात मोठी गुंतवणूक आकर्षित होऊन तांत्रिक व कुशल युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. तसेच कृषी निर्यात कार्गो टर्मिनलमुळे शेतकऱ्यांचा शेतीमाल थेट हवाई मार्गे देश-विदेशात पोहोचणार असून त्यांना योग्य दर मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून धाराशिव विमानतळ संपूर्ण मराठवाड्याच्या विकासाचा 'गेमचेंजर' ठरेल, असे आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी स्पष्ट केले.

## नळदुर्गमध्ये लोकनियुक्त नगराध्यक्ष व नगरसेवकांचा विविध संस्थांच्या वतीने सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३१ डिसेंबर -**

नळदुर्ग नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष व सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचा नळदुर्ग शहरातील वल्लभ एंटरप्राइजेस, पाटील क्लिनिक, संजीवनी मेडिकल आणि दिशा नागरी सहकारी पतसंस्था (शाखा नळदुर्ग) यांच्या संयुक्त विद्यमाने सत्कार करण्यात आला.

यावेळी लोकनियुक्त नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्यासह नवनिर्वाचित नगरसेवक दत्तात्रय दासकर, नय्यर जहागीरदार, तानाजी जाधव, पांडुरंग पुदाले, मारुती खारवे, इमाम शेख, रीजवान काझी, गफुर कुरेशी, आकाश कुलकर्णी, तसेच नगरसेविका छमाबाई राठोड, सुमन ठाकुर, अपर्णा बेडगे, राणी शिवाजी सुरवसे, साक्षी नळदुर्गकर यांच्यासह सर्व नगरसेवक व नगरसेविकांचा सत्कार करण्यात आला.

या सत्कार समारंभात वल्लभ एंटरप्राइजेसचे हर्षल डुकरे, विशाल डुकरे, नळदुर्ग बसस्थानकातील वाहतूक नियंत्रक दीपक डुकरे, पाटील क्लिनिकचे डॉ. जितेंद्र पाटील, डॉ. स्वाती पाटील, संजीवनी मेडिकलचे संजय दशरथ जाधव, योगिता संजय जाधव, तसेच दिशा नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन डॉ. दिग्गज दापके-देशमुख, सचिव पंकज पडवळ व शाखा प्रमुख उमेश जाधव यांनी नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांचे अभिनंदन केले.

**▶▶ पक्षीय राजकारण बाजूला ठेवून नळदुर्ग शहराचा विकास करणार**
**▶▶ नळदुर्ग शहराचा कायापालट करण्याची नगराध्यक्षांची ग्वाही.**

याचवेळी दिशा नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने प्रकाशित वार्षिक दिनदर्शिका २०२६ चे प्रकाशन लोकनियुक्त नगराध्यक्ष बसवराज धरणे, नगरसेवक तानाजी जाधव, मारुती खारवे व इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

सत्काराला उत्तर देताना नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी सांगितले की, आमदार राणाजगजितसिंह पाटील व भाजपचे नेते सुनील चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सर्व नगरसेवकांना सोबत घेऊन नळदुर्ग शहराचा सर्वांगीण विकास करण्यात येईल. निवडणूक संपली असून आता पक्षीय राजकारण बाजूला ठेवून केवळ शहराच्या विकासावर लक्ष केंद्रित करून नळदुर्गचा कायापालट करण्यासाठी आम्ही पूर्ण ताकदीने काम करू, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास विलास येडगे, प्रभाकर घोडके, उमेश नाईक, बंडप्पा कसेकर, दिनेश बाळुरकर यांच्यासह दिशा नागरी सहकारी पतसंस्थेचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## वाशी शिवारातून पाणीबुडी मोटार चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ डिसेंबर -**

वाशी पोलीस ठाण्याच्या हद्दीत शेताजवळील तळ्यातून पाणीबुडी मोटार चोरीस गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी दत्ता अच्युत काकडे (वय ३५, रा. वाशी ता. वाशी जि. धाराशिव) यांची वाशी शिवारातील शेताजवळील तळ्यात बसवलेली सुदर्शन कंपनीची ३ एचपी क्षमतेची पाणीबुडी मोटार (किंमत अंदाजे १४ हजार ५०० रुपये) ही दि.२८ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ११ ते दि.२९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजण्याच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने चोरून नेली.

या घटनेबाबत फिर्यादीने दि. ३० डिसेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबर अहवालावरून वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## कळंबमधील शाळेत विद्यार्थ्यांसाठी सही-स्वाक्षरी कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.३१ डिसेंबर -**

कळंब जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आढाळा येथे उपक्रमशील मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी सही - स्वाक्षरी ही अभिनव कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वाक्षरीतून स्वतःचे व्यक्तिमत्त्व आणि आपली ओळख समजावून देणे होता.

कार्यशाळेत उपक्रमशील शिक्षक तुकाराम कऱ्हाळे आणि शिवनंदा स्वामी यांनी डिजिटल माध्यमाचा उपयोग करून भारतातील विविध क्षेत्रातील मान्यवरांची स्वाक्षरी विद्यार्थ्यांसमोर दाखवली. यात लोकनेते शरद पवार, गोपीनाथराव मुंडे, विलासराव देशमुख, प्रसिद्ध लेखक पु. ल. देशपांडे, व्यंगचित्रकार राज ठाकरे, माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, ज्येष्ठ अभिनेते आशोक सराफ, क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पंतप्रधान नरेंद्र मोदी, क्रिकेटपटू विराट कोहली यांचा समावेश होता.



कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी व्हाईट बोर्ड आणि फलकावर सुंदर स्वाक्षऱ्या केल्या. ज्यांच्या स्वाक्षरीमध्ये सुधारणा आवश्यक होती, त्यांना मार्गदर्शन देऊन त्यांचे कौशल्य सुधारले गेले. विद्यार्थ्यांनी प्रचंड उत्साह आणि आनंदात या अभिनव उपक्रमात सहभाग घेतला.

या कार्यशाळेसाठी शिवव्याख्याते महादेव खराटे, शिक्षक तुकाराम कऱ्हाळे, शिवनंदा स्वामी, बलभीम राऊत आणि स्वयंसेवक बापू हगारे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## जगदाळे महाविद्यालयात राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.३१ डिसेंबर -**

वाशी येथील कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयात कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे अंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी सोमनाथ घोलप यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक कदम, संयोजन समितीच्या अध्यक्ष प्रा. अश्विनी नवले यांच्यासह प्रा.डॉ. पार्थराज क्षीरसागर, प्रा. महादेव उंद्रे, प्रा.डॉ. महेश गुरमे, प्रा. लक्ष्मण धावारे, प्रा. प्रेरणा पाटील व प्रा. अशोक पाटील उपस्थित होते.

स्पर्धेचा विषय नवीन शैक्षणिक धोरण खरोखरच विद्यार्थ्यांच्या हिताचे आहे, नाही असा होता. या स्पर्धेत नम्रता चव्हाण (बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी) हिने प्रथम क्रमांक पटकावून ८,००० रुपये पारितोषिक मिळविले. गायकवाड क्षितिजा किरण हिला ५,००० रुपये द्वितीय पारितोषिक तर डोरले ईश्वरी हिला ३,००० रुपये तृतीय पारितोषिक देण्यात आले.

के.एस.के. महाविद्यालयाच्या कुमारी शितल चव्हाण व वाघमारे सिद्धार्थ यांना प्रत्येकी १,००० रुपये उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. उत्कृष्ट कामगिरीमुळे बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी यांनी सर्वसाधारण विजेतेपद मिळवत स्मृतीचषक पटकावला.

विजेत्या स्पर्धकांना श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचे खजिनदार जयकुमार बापू शितोळे यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

स्पर्धेसाठी भूम, बार्शी व बीड येथून स्पर्धक सहभागी झाले होते. परीक्षक म्हणून प्रा.डॉ.एम.एस. डिसले, सचिन छबिले व सुनील क्षीरसागर यांनी काम पाहिले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे मा. जयकुमार बापू शितोळे यांनी वादविवाद व वक्तृत्व स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांची जडणघडण होते व व्यक्तिमत्त्व विकासास चालना मिळते, असे प्रतिपादन केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. अशोक कदम यांनी स्पर्धकांनी विषयासंबंधी अचूक माहिती व सखोल ज्ञानासह स्पर्धेला सामोरे जावे, असा सल्ला दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अश्विनी नवले, सूत्रसंचालन प्रा. महादेव उंद्रे तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ. महेश गुरमे यांनी केले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी प्रा. कृष्णा थोरात, प्रा.डॉ. बलवान कांबळे, सोहेल शेख, नवनाथ निकम, मुकुंद कोळी व अजय जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.

## भ्रष्टाचार निर्मूलन समितीची २० जानेवारीला त्रैमासिक बैठक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ डिसेंबर -**

जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समिती, धाराशिव यांची ऑक्टोबर २०२५ ते डिसेंबर २०२५ या कालावधीतील त्रैमासिक बैठक मंगळवार, दि.२० जानेवारी २०२६ रोजी दुपारी ४ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आली आहे.

या बैठकीमध्ये नागरिकांच्या तक्रारी व अभिकथनांचा विचार करण्यात येणार आहे. भ्रष्टाचारासंबंधी तक्रार असलेल्या नागरिकांनी आवश्यक पुराव्यांसह तक्रारी सादर कराव्यात, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. तक्रारदारांनी संबंधित अधिकारी ज्या तालुक्यात कार्यरत आहेत, त्या तालुक्यातील तालुकास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे किंवा संबंधित विभागाच्या जिल्हा दक्षता समितीकडे प्रथम तक्रार दाखल करणे आवश्यक आहे. त्या स्तरावर कार्यवाही न झाल्यासच जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीकडे तक्रार सादर करता येणार आहे.

सर्व तक्रारींची प्राथमिक छाननी तालुका व जिल्हा दक्षता समितीमार्फत केली आहे.

## कळंबमध्ये व्यक्तिमत्व विकास व पर्यावरण विषयावर कार्यशाळा

### विद्यार्थ्यांना स्वावलंबी व उद्योजक बनवण्याचा मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.३१ डिसेंबर -**

कळंब येथे आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने व्यक्तिमत्व विकास व पर्यावरण या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

उद्घाटनाच्या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. हनुमंत सौदागर पाटील अध्यापक महाविद्यालय, केज) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, जीवनात यशस्वी होण्यासाठी अंतरबाह्य बदल होणे आवश्यक आहे. युवकांनो, स्वामी विवेकानंद यांसारख्या महापुरुषांच्या विचारांची जोपासना करून स्वतःमध्ये बदल घडवणे गरजेचे आहे.



कार्यशाळेची सुरुवात संस्थेचे संस्थापक पूज्य ज्ञानदेव मोहेकर गुरुजींच्या प्रतिमापूजन आणि दीपप्रज्वलनाने झाली. उपस्थित मान्यवरांचे स्वागत शाल, पुष्पहार व आदर्श मराठी व्याकरण व लेखन या पुस्तकाद्वारे करण्यात आले. उद्घाटक म्हणून ज्ञान प्रसारक मंडळ येरमाळा संस्थेचे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर उपस्थित होते.

कार्यशाळेत विद्यार्थ्यांना कौशल्य विकास, शेती व शेतीपूरक व्यवसाय, स्वावलंबी उद्योजकता या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. हनुमान बुधवंत यांनी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत शेती व प्रक्रिया उद्योगातून स्वतःचा व्यवसाय उभा करण्याचे मार्गदर्शन केले. यासोबतच, यशस्वी स्वयं उद्योजक कमल कुंभार यांनी लघु उद्योगाद्वारे ग्रामीण भागातील ३-४ हजार महिलांना रोजगार उपलब्ध करून दिल्याबाबत माहिती दिली. कार्यशाळेच्या प्रमुख उपस्थितींमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत भगवान, डॉ. संजय कांबळे, उपप्राचार्य के.डी. जाधव, प्रा. जयंत भोसले, तसेच अनेक शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

प्रास्ताविक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दादाराव गुंडरे, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.डॉ. दीपक सूर्यवंशी, आभार प्रदर्शन डॉ. श्रीकांत भोसले यांनी केले.

याप्रसंगी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्रबंधक हनुमंत जाधव, डॉ. परमेश्वर वाकडे, कमलाकर बंडगर, अर्जुन वाघमारे यांनी प्रयत्न केले.

# ४२ वर्षांनंतर पुन्हा भेटले शालेय मित्र; अणदूरमध्ये १९८३ दहावी बॅचचे भावनिक गेट-टुगेदर

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.३१ डिसेंबर -**

एखाद्या हिंदी चित्रपटालाही लाजवेल अशी हृद्य आणि भावनिक कथा अणदूर येथे घडली. अणदूर येथील जवाहर विद्यालयाच्या १९८३ च्या दहावी बॅचचे मित्र तब्बल ४२ वर्षांनंतर गेट-टुगेदरच्या निमित्ताने एकत्र आले. जुन्या आठवणींना उजाळा देत, हास्य-आनंद, भावनांचा आणि मैत्रीचा अविस्मरणीय दिवस त्यांनी एकत्र घालवला.

तांदुळवाडी येथील कल्याणम कृषी पर्यटन केंद्रात कुचकुचीत हुरड्याच्या साक्षीने हा गेट-टुगेदर उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी एकूण ६० मित्र उपस्थित होते. कोणी मुंबई, पुणे तर कोणी थेट कोकण, विदर्भातून खास या भेटीसाठी आले होते. कार्यक्रमाचे नियोजन अतिशय सुंदर व शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते.

प्रारंभी सर्व मित्रांचा परिचय सत्र पार पडले. त्यानंतर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या गेट-टुगेदरमध्ये केवळ आठवणींनाच उजाळा देण्यात आला नाही, तर भविष्यातील अनेक सकारात्मक निर्णयही घेण्यात आले. प्रत्येकाने आपल्या परीने एकमेकांना मदत करणे, मित्रांच्या मुलांच्या नोकऱ्या, विवाह जुळविण्यास हातभार लावणे, गरजू मित्रांना मदत करण्यासाठी एकत्र प्रयत्न करणे, असे सामाजिक व मैत्रीपूर्ण संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आले.



काही मित्र तब्बल ४२ वर्षांनंतर भेटत असल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद व कुतूहल ओसंडून वाहत होते. नाश्ता, हुरडा, स्नेहभोजन, गप्पांची मैफल व संगीत कार्यक्रमात दिवस कसा गेला हे कळलेच नाही. गेल्या त्या आठवणी, राहिले ते दिवस अशा भावना अनेकांनी व्यक्त केल्या. या मित्रमंडळातील अनेक जण उच्च पदांवरून सेवानिवृत्त झाले आहेत, तर काही आजही मोठ्या जबाबदाऱ्या सांभाळत कार्यरत आहेत. काही व्यापार-उद्योगात गुंतलेले असून अनेक जण आजोबा-नातवंडांच्या नात्यात रमलेले आहेत. आपल्या व्यस्त जीवनातून एक दिवस खास काढून भेटण्याची ओढ सर्वांनाच होती. अनेक वर्षांच्या विरहानंतर पुन्हा एकत्र आलेले हे ६० मित्र भविष्यात दरवर्षी असे गेट-टुगेदर आयोजित करण्याचा निर्धार करून एकमेकांना निरोप देत भावूक झाले.

हा गेट-टुगेदर यशस्वी करण्यासाठी रघुनाथ म्हमाणे, दीपक आलूरे, देवदत्त पाटील, मल्लिनाथ लंगडे, महादेव सोनटक्के, मनोहर घोडके, सिद्धू मुळे, काशिनाथ करपे, पप्पू कस्तुरे, गुरुनाथ मगे, विश्वराज बरबडे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमास १९८३ च्या दहावी बॅचचे दादाराव जाधवर, लक्ष्मण पाटील, व्यंकट पाटील, चंद्रहास पाटील, श्रीकृष्ण कुलकर्णी, प्रताप लामजने, डोंगरे, बचाटे, पाटील (हंगरगा), तुकाराम शिंदे, मोहन धरणे, रघुनाथ भिसे, प्रवीण मोकाशे, दत्ता जाधव, रवी नागुरे, अनिल मगतराव, चंद्रकांत सोनटक्के, डॉ. सतीश घुगे, शिवाजी जाधव यांच्यासह अनेक माजी विद्यार्थी उपस्थित होते.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बुधोडा येथील महसूल समाधान शिबिरास प्रतिसाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३१ डिसेंबर :** बुधोडा येथील बालाजी मंदिर परिसरात मंगळवार, दि. ३० डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गावातील दोन हजार नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला.

शिबिराचे उदघाटन निवासी नायब तहसीलदार खोंडे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच तुकाराम मिटापल्ले हे होते. यावेळी मंडळ अधिकारी विकास बिराजदार, ग्राम महसूल अधिकारी दत्ता शिंदे, महादेव मरे , उपसरपंच सुरेखा सातपुते, रवी चिलमे, अंगद पाटील, निवृत्ती अलगुले यांची प्रमुख उपस्थिती होती. या शिबिरात नागरिकांना विविध शासकीय विभागांमार्फत महत्वाच्या योजनांचा थेट लाभ देण्यात आला. यात संजय गांधी निराधार योजना, नवीन शिधा पत्रिका वितरण, ग्रामपंचायत विभागामार्फत आठ अ उतारे, रहिवासी दाखले, आरोग्य विभागामार्फत आयुष्यमान भारत कार्ड वाटप, तसेच कृषी विभागाच्याही विविध योजनांचा लाभ देण्यात आला. यावेळी महादेव सारगे, खडके, बालाजी पाखरे, राजू गायकवाड, लक्ष्मण कांबळे, लक्ष्मण कोलपाक आदी उपस्थित होते.



# लातूर शहर मनपात तिरंगी लढत

## ७० जागांसाठी ७५९ उमेदवार निवडणुकीच्या आखाड्यात

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३१ डिसेंबर :** लातूर शहर महानगरपालिकेच्या एकूण ७० जागांसाठी तब्बल ७५९ उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले आहेत. बुधवारी उमेदवारी अर्जाची छाननी प्रक्रिया सायंकाळी उशिरापर्यंत चालू होती. लातुरात अनेक नाट्यमय घडामोडीनंतर प्रारंभी महायुतीच्या शक्यतेने दुरंगी होण्याची चिन्हे असलेली ही निवडणूक आता तिरंगी होणार हे जवळजवळ स्पष्ट झाले आहे.

या निवडणुकीसाठी शेवटच्या क्षणापर्यंत भाजप आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची युती होईल, अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र, अपेक्षेप्रमाणे ही युती फिस्कटल्याने या ठिकाणी आता भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यांच्यात सरळ सरळ तिरंगी लढत होणार असल्याचे निश्चित झाले आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने या निवडणुकीत एकूण ६५ जागा स्वबळावर लढणार असल्याचे जाहीर केले असून त्याप्रमाणे उमेदवारही देण्यात आले आहेत. काँग्रेसने ५ जागा वंचित बहुजन आघाडीला सोडल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट या निवडणुकीत पूर्ण ताकदीनिशी ६० जागा लढवत आहे. तर भाजपने सर्वच्या सर्व ७० जागा लढवण्याचा निर्णय घेतला आहे.

या निवडणुकीसाठी भाजप आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने उमेदवारी देताना धक्कातंत्राचा अवलंब केल्याचे दृष्टीपथास आले आहे. भाजपने काही जुन्या, निष्ठावंताना डावलून पक्षात नवख्या आलेल्या चेहऱ्यांना उमेदवारी बहाल केली आहे. तर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने अनेक जुन्या चेहऱ्यांना जाणीवपूर्वक वगळून नव्या चेहऱ्यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे.

मनपा निवडणुकीत सगळ्यात जास्त नाराजांची संख्या अर्थातच सत्ताधारी भाजपमध्ये पाहायला मिळाली. पक्षनेत्यांकडून संभाव्य इच्छुक उमेदवारांना सबुरीचा सल्ला दिला गेला असला तरी आपल्याला डावलून नवख्याना उमेदवारी देण्यात आल्याचे शल्य अनेकांच्या मनात बोचत असल्याच्या प्रतिक्रिया सामान्य कार्यकर्त्यांतून ऐकायला येत आहेत.

पक्षाने पक्षात नव्याने आलेल्या चेहऱ्याना तात्काळ उमेदवारी न देता काही काळ त्यांना सामान्य कार्यकर्ता म्हणून पक्ष कळू द्यायला हवा होता, अशी अनेकांची मते आहेत.

या निवडणुकीच्या प्रभारीपदी पालकमंत्री शिवेंद्रसिंह भोसले यांची ऐनवेळी नियुक्ती करण्यात आली असली तरी तिकिटांसाठी कार्यकर्त्यात एवढी तीव्र स्पर्धा असताना पालकमंत्री अद्याप लातूरकडे फिरकले नसल्याबद्दलही कार्यकर्त्यात नाराजीचा सूर असल्याचे पाहायला मिळाले. त्याचप्रमाणे भाजपने या निवडणुकीत डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्याकडे सोपविण्यात आलेली निवडणूक प्रमुख पदाची जबाबदारी काढून घेतल्याबद्दल लिंगायत समाजातील कार्यकर्त्यांकडून तीव्र शब्दांत प्रतिक्रिया ऐकायला मिळाल्या.

भाजपने जाणीवपूर्वक या निवडणुकीच्या प्रवाहातून लिंगायतांना दुखावल्याचा आरोपही केला जात आहे. लिंगायतांना डावलण्याची जी चूक सत्तेच्या धुंदीत तत्कालीन भारतीय राष्ट्रीय काँग्रेसकडून घडत होती, ती चूक आता भाजपच्या नेत्यांकडून घडत असल्याची चर्चाही लातूरच्या राजकीय वर्तुळात केली जात आहे. त्यामुळे ही निवडणूक अखेरच्या क्षणी अतिशय अटीतटीची होण्याची चिन्हे दिसून येत आहेत.

# निरीक्षकांनी केली मनपा निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाची पाहणी



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३१ डिसेंबर :** लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीचे निरीक्षक तथा धाराशिव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनक घोष यांनी मंगळवारी मनपा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयाची पाहणी करून उपयुक्त सूचना केल्या.

मनपा निवडणुकीच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने धाराशिवचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. घोष यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. डॉ. घोष यांनी लातूर शहर मनपा निवडणूक शांततेत व ठरवून दिलेल्या आचारसंहितेत पार पडण्याच्या सूचना त्यांनी केल्या. ही निवडणूक पारदर्शक पद्धतीने पार पदवी. आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन केले जावे. निवडणुकीच्या काळात कुठलेही गैरप्रकार होणार नाहीत याची काळजी घेण्याचे आवाहन यावेळी डॉ. घोष यांनी केले.

या निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याचा मंगळवार हा अखेरचा दिवस होता. त्यामुळे निवडणूकीसाठीच्या चारही कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्यांची चांगलीच गर्दी झाली होती. त्या ठिकाणचीही डॉ. घोष यांनी पाहणी करून समाधान व्यक्त केले.

यावेळी त्यांच्यासमवेत मनपा आयुक्त मानसी मीना, अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, वसुधा फड यांची उपस्थिती होती.

# स्थापत्य अभियंता अनंत पाटील यांना ‘वास्तु विशारद’ पदवी प्रदान

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३१ डिसेंबर :** येथील सुप्रसिद्ध स्थापत्य अभियंता अनंत शिवाजीराव पाटील यांना वास्तु विशारद ही मानाची पदवी पुणे येथील ज्योतिष वास्तु विश्र्व संशोधन केंद्र या संस्थेच्या वतीने नुकतीच प्रदान करण्यात आली.



ज्योतिष वास्तु विश्व संशोधन केंद्र, पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या वास्तुशास्त्र विषयक परीक्षेत अनंत पाटील यांनी विशेष श्रेणीत यश संपादन केले.

गेल्या वीस वर्षांपासून ते लातूर शहरासह परिसरात वास्तुशास्त्रानुसार घरबांधणीचे नकाशे, मार्गदर्शन तसेच बांधकाम निर्मितीचे कार्य सातत्याने करीत आहेत. त्यांच्या स्थापत्य कौशल्यातून आजपर्यंत शेकडो आकर्षक व शास्त्रशुद्ध वास्तू साकार झाल्या असून त्यांनी वास्तुशास्त्रासोबतच अंकशास्त्र या विषयातही विशेष प्राविण्य मिळवले आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक कुटुंबांना वास्तुशास्त्राच्या दृष्टीने योग्य आणि समाधानकारक घरे लाभली आहेत.

या उल्लेखनीय यशाबद्दल स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रातील अभियंते, बांधकाम व्यवसायिक, निर्माते, कामगार तसेच नागरिकांकडून अनंत पाटील यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

# सायबर कायद्याचे ज्ञान मिळविणे काळाची गरज : न्या. डिगे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३१ डिसेंबर :** वेगाने बदलत जाणाऱ्या समाजात प्रत्येक व्यक्तीला आपली तसेच समाजाची होणारी संभाव्य आर्थिक लूट टाळण्यासाठी सायबर कायद्याचे ज्ञान असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन लातूरचे सुपुत्र तथा मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर बेंचचे न्या, शिवकुमार डिगे यांनी केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालय आणि दयानंद माजी विद्यार्थी फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या ‘सायबर क्रिमिनल कायदा व विश्लेषण’ या विषयावर व्याख्यान देताना न्या. डिगे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर बेल्लाळे हे होते. यावेळी दयानंद माजी विद्यार्थी फाऊंडेशनचे उपप्राचार्य भाऊसाहेब सरवदे, उमाकांत आंग्रे, संजय ढाले, प्रकाश देशमुख, माजी अध्यक्ष प्रा. डॉ. युवराज सारणीकर, कोषाध्यक्ष विजय किलचे, उपाध्यक्ष हणमंत गायकवाड, अनंत कासारखेडकर, पी.के. इंगळे, राम सगरे आदींची उपस्थिती होती.



न्या शिवकुमार डिगे यांनी सध्याचे युग हे प्रसारमाध्यमे आणि सोशल मीडियाचे युग असल्याचे सांगितले. आजच्या या युगात तरुणाईने सायबर गुन्ह्यांच्या वधात्या धोक्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. अन्न , वस्त्र , निवारा आणि आरोग्य या मूलभूत गरज आहेत. त्याचबरोबर भ्रमणध्वनी ही सुद्धा काळाची गरज बनले आहे. त्याचा उपयोग चांगल्या ज्ञानासाठी होणे आवश्यक आहे. परंतु चुकीच्या लिंक्स आणि प्रलोभनांना बळी पडल्यामुळे लाखो रुपयांची आर्थिक लूट होत आहे. त्यासाठी प्रत्येक सुजाण नागरिकाने सायबर कायद्याचे ज्ञान मिळवले पाहिजे.

प्राचार्य डॉ. बेल्लाळे यांनी आपल्या मनोगतात माजी विद्यार्थी फाऊंडेशनच्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमात खुशीग्राम प्रकल्प फाऊंडेशनचे मधुकर सोनवणे व वर्षाताई सोनवणे या दांपत्याचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. बळवंत सूर्यवंशी यांनी केले.

# ‘सहज सुचलं म्हणून’ पुस्तकाचे प्रकाशन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३१ डिसेंबर :** येथील व्ही.सी. पाटील औसेकर लिखित ’सहज सुचलं म्हणून’ या पुस्तकाचे प्रकाशन लातुरात उत्साहपूर्ण वातावरणात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

लातूर शहरातील हॉटेल अंजनी येथे पार पडलेल्या या पुस्तक प्रकाशन सोहळ्यास माजी प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, प्रा. शिवराज मोटेगावकर, माजी उपमहापौर चंद्रकांत बिराजदार, सेवालयाचे संस्थापक रवी बापटले, भाजपचे माजी शहर जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा बसवेश्र्वर, मातोश्री रत्नमाला पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी आपले विचार व्यक्त करताना प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी लेखकाची भूमिका ही समाजाला आरसा दाखविणारी साली पाहिजे असे सांगितले. सहज सुचलं या पुस्तकाच्या माध्यमातून लेखकाने मानवी जीवनातील सत्य, दाहकपणे मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

प्रा. शिवराज मोटेगावकर यांनी आपले विचार व्यक्त करताना सहज, सोप्या भाषेतील हे पुस्तक आपल्याला खूप आवडले आहे. लेखकाची नम्रता आणि त्यांचे सहज जगण्यातले विचार खूप काही सांगून जातात, असेही त्यांनी सांगितले. गुरुनाथ मगे यांनी प्रत्येकाने वेळात वेळ काढून एकदा तरी या पुस्तकाचे वाचन करावे,असे सांगितले. चंद्रकांत बिराजदार, रवी बापटले यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

लेखक व्ही.सी. पाटील यांनी या पुस्तकाच्या लेखनामागची संकल्पना विषादकेली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पी.सी. पाटील यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा. सुधीर गरड यांनी तर आभार निखिल पाटील यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिल्पा पाटील, निखिल पाटील, खांडेकर, जाधव, मळभागे, स्वामी यांनी परिश्रम घेतले.

# पाच दिवसांचा आठवडा ही मागणी मान्य करा,अन्यथा देशभरातील बँकिंग ठप्प करू

### बँक कर्मचाऱ्यांचे नेते कॉम्रेड दीपक माने यांचा इशारा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३१ डिसेंबर :** मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेली पाच दिवसाचा आठवडा ही बँक कर्मचाऱ्यांची मागणी केंद्र सरकारने तात्काळ मान्य करावी अन्यथा बँक कर्मचाऱ्यांना संपाची हाक देऊन देशभरातील बँकिंग ठप्प करावी लागेल असा इशारा बँक कर्मचाऱ्यांचे नेते कॉम्रेड दीपक माने यांनी दिला.

मागील काही वर्षात बँकांमध्ये कामाचा बोजा कैक पटीने वाढलेला आहे. आठ तासाचे कामाचे स्वरूप असतानाही दहा ते बारा तास बँकेत बसून तसेच सुट्टी दिवशीही बँकेत येऊन प्रलंबित कामे करावी लागत आहेत. बँकांचा व्यवसाय अनेक पटीने वाढलेला असताना सुद्धा कर्मचाऱ्यांची संख्या मात्र कमी होताना दिसत आहे ज्यामुळे बँक कर्मचारी प्रचंड तणावाखाली काम करीत आहेत. कामकाज व जीवन संतुलनाचा भाग म्हणून बँक कर्मचाऱ्यांना पाच दिवसांचा आठवडा म्हणूनच अत्यावश्यक झालेला आहे. परंतु असे असतानाही आयबीए व केंद्र सरकारकडून पाच दिवसाच्या आठवड्या बाबत कुठलेही सकारात्मक पाहून उचलले जात नाही व त्यासंदर्भात केवळ कर्मचाऱ्यांना आशेवरती ठेवले जात आहे. जर सरकारने याची वेळीच गंभीर दखल घेतली नाही तर संपाच्या माध्यमातून संपूर्ण बँकिंग ठप्प करू असा इशारा यावेळी बँक कर्मचाऱ्यांचे नेते कॉम्रेड दीपक माने यांनी दिला. यावेळी कॉ. सचिन नंदागवळे, कॉ. अंजली स्वामी, कॉ. केदार देशमुख, कॉ. विवेक पदरे, कॉ. परमेश्वर बडगिरे यासह लातूर शहर व परिसरातील ५० पेक्षा अधिक कर्मचारी उपस्थित होते.

# बाई-काकाजी पॉलिमर्स लि. कंपनीचा लिस्टिंग समारंभ थाटात

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३१ डिसेंबर :** येथील बाई- काकाजी पॉलिमर्स लि. या कंपनीने लातूर जिल्ह्यातील पहिली आयपीओधारक कंपनी होण्याचा मान पटकावला असून या कंपनीचा लिस्टिंग समारंभ बुधवारी सकाळी दहा वाजता लातूरच्या कार्निव्हल रिसॉर्टमध्ये शानदार सोहळ्यात पार पडला.

यावेळी राज्याचे उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक, माजी मंत्री आ. अमित देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. दीप प्रज्वलन आणि बाई-काकाजी यांच्या प्रतिमेच्या अभिवादनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी बाँबे स्टॉक एक्सचेंजचे राम गिरी, बँकिंग पार्टनर अभिजित पांडे, बाई -काकाजी ग्रुपचे प्रमुख बालकिशन मुंदडा, नरसिंगदास मुंदडा, दिलीप मुंदडा, हरिकिशन मुंदडा, प्रमोद मुंदडा, आकाश मुंदडा,अक्षय मुंदडा यांची प्रमुख उपस्थिती होती. एखाद्या कंपनीचे एक्सचेंजवर सार्वजनिकरित्या व्यवहार होण्याचा हा लिस्टिंग समारंभ मुंबई सारख्या महानगरात होत असतो. मात्र, बाई - काकाजी पॉलिमर्स लि. चा हा सोहळा विशेष करून लातूर शहरात घेण्याची आग्रही मागणी बाई - काकाजी समूहातर्फे लावून धरण्यात आल्याने हा सोहळा लातूरच्या उद्योजकीय विश्वात प्रथमच लातुरात पार पडला.

या सोहळ्याची सुरुवात सकाळी ठीक दहा वाजता राज्यमंत्री इंद्रनील नाईक व आ. अमित देशमुख यांच्या हस्ते घंटा वाजवून करण्यात आली. यावेळी आपले विचार व्यक्त करताना इंद्रनील नाईक यांनी बाई-काकाजी समूहाने आजपर्यंत कमावलेल्या सर्वांच्या विश्र्वासाच्या बळावर हा टप्पा गाठल्याचे सांगितले. भारताच्या एकूण जीडीपीत सर्वाधिक योगदान महाराष्ट्राचे राहत आले आहे. प्रत्येकाने शेअर बाजारातील ज्ञान संपादन करण्याचा प्रयत्न केल्यास महाराष्ट्राचा जीडीपीतील प्रथम क्रमांकचे योगदान यापुढेही कायम




राहू शकणार आहे. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालन्यानंतर सर्वात मोठी इंडस्ट्री लातुरात आहे. मुंदडा परिवाराच्या या कंपनीच्या माध्यमातून लातूरचे नाव आता उद्योग क्षेत्रात आघाडीवर पोहचण्यास मदत झाली आहे. विकासात उद्योग हा महत्वाचा कणा आहे. शासन कायम उद्योग धंद्यांना प्रोत्साहित करण्याचे काम करत असल्याचे सांगून नाईक यांनी बाई - काकाजी पॉलिमर्स लि. या कंपनीच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

आ. अमित देशमुख यांनी यावेळी बोलताना आजचा दिवस लातूरच्या उद्योजकीय क्षेत्रासाठी अतिशय आनंदाचा आणि अभिमानाचा असल्याचे सांगितले. आयपीओधारक कंपनीचा लिस्टिंग समारंभ लातूरमध्ये होण्याची ही पहिलीच वेळ आहे. लातूरच्या जडणघडणीत व्यापारी - उद्योजकांचे योगदान सर्वाधिक आहे.

### लातूरच्या उद्योजकीय विश्वात प्रथमच हा सोहळा लातुरात संपन्न

लातूरचे दुसरे नाव गुणवत्ता हे असून या गुणवत्तेच्या बळावरच ही कंपनी लिस्टिंग होतेय असे गौरवोद्गारही आ. देशमुख यांनी काढले. सगळ्यांच्या उचित योगदानामुळे लातूरच्या विकासाचा पाया मजबूत बनला आहे. स्व. विलासरावजी देशमुख आज आपल्यात असते तर त्यांनाही खूप आनंद झाला असता, ते मुंदडा परिवाराच्या पाठीशी कायम खंबीरपणे उभे राहिल्याची आठवणही आ. अमित देशमुख यांनी करून दिली. उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी नवीन उद्योगासाठी प्रयत्न करावा, असे आवाहनही आ. देशमुख यांनी केले.

बाई - काकाजी उद्योग समूहाचे प्रमुख बालकिशन मुंदडा यांनी आपल्या प्रास्ताविकात संघर्ष, अनुशासन आणि विश्र्वासाच्या बळावर आपल्या कंपनीने हे यश संपादन केले आहे. प्रामाणिकपणे कार्य केल्याने आज आपल्या उद्योग समूहाने भांडवली बाजारामध्ये पदार्पण केले आहे.

आजपासून ही कंपनी प्रत्येक गुंतवणूकदाराची आहे. गुंतवणूकदारांना त्यांनी केलेल्या गुंतवणुकीच्या परताव्याबद्दल त्यांनी खात्री दिली. उद्योग समूहाच्या या यशामागे एक समर्पित टीम असून हे सामूहिक यश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हरिकिशन मुंदडा यांनी यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना आजचा दिवस आपल्या कंपनीसाठी एक मैलाचा दगड ठरला असून ही एका नव्या जबाबदारीची सुरुवात असल्याचे आपण मानतो, असे सांगितले. बँकिंग पार्टनर अभिजित पांडे यांनी आपल्या मनोगतात बाई - काकाजी पॉलिमर्स लि . ही १४२ वी आयपीओ लिस्टेड कंपनी असल्याचे सांगितले. बीएसईचे राम गिरी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

या सोहळ्यास प्रदीप राठी, माने, लक्ष्मण मोरे, डॉ. अशोक पोद्दार, डॉ. चेतन सारडा, सीए प्रकाश कासट, लक्ष्मीकांत कर्वा, ॲड. संतोष गिल्डा, डॉ. संजय पौळ , डॉ. महिंद्रकर, अतुल देऊळगावकर, अशोक धूत, राधेश्याम धूत, फुलचंद काबरा, बाळू भंसाळी, ओमप्रकाश सारडा, रवींद्र भुतडा, चंदुलाल बलदवा, नितीन कलंत्री अनेक उद्योजक-विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.